दलित पँथर विशेषांक....
www.peoplespost.in
पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक २२ वा । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ जुलै २०२२



# पँथरची पन्नाशी!

पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ ।
अंक २२ । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ जुलै २०२२

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट | 8888541822

- **जाहिरात विभाग संपर्क**
  ९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

**अंकाची वार्षिक वर्गणी ६००/– रुपये फक्त**

- **द पीपल्स पोस्ट बँक अकाउंट डिटेल्स्**
  द पीपल्स पोस्ट : SBI Bank
  शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
  AC No. 37856373419
  IFSC CODE : SBIN0007919
  MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा


**संपादकीय :** लांडगा, कोल्हा आणि कोकराची गोष्ट – ३/ दलित पँथरचा उदय : एक सैद्धांतिक विश्लेषण – **डॉ. गोपाळ गुरु** – ५ / दलित पँथर : स्थापनेची तीन, तर फुटीची सत्तेचाळीस वर्षे – **संजय पवार** – ९ / चिनी कम पत्ती जादा – **उत्तम कांबळे** – १५ / पँथरने इंदिरा गांधींना रस्ता बदलायला लावला… – **नामदेव ढसाळ** – १९ / दलित पँथर : एक तुफान – **ज. वि. पवार** – २२ / दलित पँथर आणि मी – **मल्लिका अमर शेख** – २८ / पँथर चळवळीतील चढ उतार : एक चिकित्सा – **बी.व्ही. जोंधळे** – ३१ / दलित पँथरच्या पन्नाशीतील प्रेरणादायी परिषद – **डॉ. राजेंद्र गोणारकर** – ३६ / **मुलाखती :** जातीयवाद अजूनही आहे – **जी. के. एनेपुरे** – ३८ / पँथर अजूनही झेप घेण्यास सज्ज – **नानासाहेब भालेराव** – ४० / पुन्हा पँथर म्हणून जन्माला यावंसं वाटेल – **शंकरराव काकळीज** – ४३ / पँथरची आजही आवश्यकता – **फकिरा जगताप** – ४५ – **शब्दांकन : सतीश डोंगरे**

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# लांडगा, कोल्हा आणि कोकराची गोष्ट





आधुनिक काळातला हा लांडगा नदीच्या काठावर वरच्या बाजुने पाणी पित असतो... अहिंसा, समता, लोकशाही, शत प्रतिशत भाजप आणि घोषणांचा त्याच्यावरही परिणाम झालेला असतो... 'अब की बार देश पार' वगैरे वगैरे त्याच्याही कानावर काही येतच असतं... त्यानं स्वतः पंजा मारून तो कोणा कोकराच्या मानेत खुपसायचं बंद केलं... त्याऐवजी त्यानं सपोर्ट, सिस्टिम किंवा एजन्सी तयार केलीय... शिकार करण्यासाठी तो एजन्सी वापरतो... एजंटालाही थोडे फार देतो पाय, मुंडी, रक्ती, वजडी वगैरे... स्वतःला काळीज आवडतं म्हणून तो स्वतःकडेच ठेऊन घेतो... तर याची सपोर्ट सिस्टिम आहे कोल्हा... तो भक्ष्य कोल्ह्यापर्यंत नेतो... त्याबदल्यात त्याला खायला मिळतं... आणि इडी बीडी वगैरे अन्य प्राण्यांपासून संरक्षण मिळतं... लांडगा आशीर्वाद घेऊन उभा असल्यानं त्याला यापैकी कोणाची भीती नाही वाटत... भक्ष्य त्यांच्यापर्यंत नेलं की बस. सिक्युरिटीच सिक्युरिटी... तर नदीच्या काठावर उभा राहिलेला लांडगा खालच्या बाजुला पाणी पिण्यास आलेल्या कोल्ह्याला म्हणतो, भाऊ अरे माझ्या मालकीचं पाणी तू का उष्टे करतोस? कोकरू म्हणतं, दादा तुम्ही वरच्या बाजुला पाणी पिताय... तुम्ही उष्टे केलेलं आणि वरून खाली येणारं पाणीच पितोय मी... लांडगा पुन्हा गुरगुरतच म्हणतो, खाल-वरची आता करू नकोस सगळी नदी माझी झालीय... दाखवू माझी शक्ती असं म्हणत तो कोल्ह्याला खुणावतो... कोल्हा कोकराला लांडग्याच्या हवाली करतो... लांडगा इतका खूश होतो कोल्ह्यावर की म्हणतो, माग काय हवं ते... कोल्हा म्हणतो, दादा ती इडी, आय.टी.चे प्राणी आमच्या मागं खूप लागले आहेत... आमची जमात धोक्यात येत आहे, काही तरी करा... सुरक्षित, प्रतिष्ठेची जागा द्या... एक कोकरू नव्हे, तर अख्खा कळपच घेऊन आलोय... लांडगा तथास्तू म्हणतो... कोकरांचा मालक कळपातील दोन-चार शिल्लक कोकरे घेऊन आपल्यावर अन्याय कसा झाला, हे भाषणातून सांगण्यासाठी निघून जातो... इकडे लांडगा कोल्ह्याला प्रोत्साहन देण्यासाठी जंगलाचा मोठा ऐरिया देतो... लांडगा असलो तरी त्यागी आहे, असं म्हणत स्वतः छोटा ऐरिया घेतो... ही झाली जंगलातील गोष्ट...

या गोष्टीची रचना चालू असताना महाराष्ट्राच्या राजकारणात असंच काही घडत होतं... ते कसं घडलंय या कथेची संहिता कोणी लिहिली, संवाद कोणी म्हटले, नायक कोण, खलनायक कोण, स्थळ कोणतं, किती प्रवेश वगैरे वगैरे आता माता भवानीच्या महाराष्ट्राला सारं काही ठाऊक झालंय... आखाडा तोच होता... पैलवान बदलले होते... एरव्ही तेल लावून आखाड्यात उतरणाऱ्यांऐवजी दुसऱ्या पैलवानांनी तशी भूमिका केली... यापूर्वी शिवसेनेनं बंड करणाऱ्या पैलवानांपेक्षा हा पैलवान वेगळा होता. कुठेही गर्दीत, कोणत्याही गल्लीबोळात, सिग्नल असो वा नसो; पण आपली रिक्षा आरामात बाहेर काढण्याचा हा पट्टीचा ड्रायव्हर होता. रिक्षा ड्रायव्हरला जेवढे डावपेच ठाऊक असतात, तेवढे एकसंध किंवा सुट्ट्या गर्दीला ठाऊक नसतात. या अगोदरच्या पैलवानांनी आपलं आपलं बंड केलं होतं; पण नव्या पैलवानानं बंडाच्या वगैरे नादाला न लागता अख्खी विधिमंडळ आणि संसदीय शिवसेनाच हायजॅक करण्याचा प्रयत्न केला. आम्ही चाळीस म्हणजेच शिवसेना, असं ठासून सांगत भाजपशी घरोबा केला. अर्थात, भाजपला असा घरोबा काही नवा नाही. दोन-तीन डझन तर उंबऱ्याशी त्यांचा घरोबा आहे. वेगवेगळे उंबरठे आहेत. आंबेडकरवादी, जनतावादी, प्रादेशिकवादी असे किती तरी उंबरठे आहेत. उंबरटे हे आमचे वैभव आहे, असे सांगत हा पक्ष फिरत असतो. ज्या छोट्या-मोठ्या घराचा आपल्याला उपयोग आहे, असं त्याला वाटतं त्या घराचा उंबरठा तो पकडतो आणि पुढे ते घरच संपवतो. घराची डागडूजी होईल, कल्याणकारी गोष्टी मिळतील म्हणून उंबरठे मैत्रीचा हात पुढे करतात आणि हे हाताबरोबरच अख्खे घरच बळकावतात. या मोहिमेला त्यांनी सुंदर नाव दिलंय, 'सब का साथ, सबका विकास'.

तर शिवसेनेत असं काही तरी होणार याचा अंदाज सर्वांनाच होता. मी पुन्हः येणार अशी भल्या पहाटे ज्यांनी शपथ घेतली होती ते काही स्वस्थ बसणार नव्हते आणि त्यांना पुन्हः येण्यासाठी महाराष्ट्रात शिवसेनेशिवाय दुसरी शिडी नव्हती. यापूर्वी राष्ट्रवादीची शिडी वापरण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता; पण ती आठ-दहा तासच टिकली. तर आता दुसरी शिडी कोणती, याचा विचार गेले काही महिने हे करत होते. शिवसेना आपण फोडायची नाही, तर तिच्यातल्या शिलेदारांनाच त्यासाठी ताकद द्यायची. हॉर्लिक्सचा

डबा द्यायचा आणि अख्खी शिवसेनाच कमळाच्या सावलीत आणायची, असा हा डाव होता. इंग्रजीत त्याला प्लॉट म्हणतात. त्याचा अर्थ कट असा होतो. राजकारणात कटालाही प्रतिष्ठा असते. असे करणारा धुरंधर राजकारणी ठरतो. तो पुढे मोठा होतो, हेही नव्या कटवाल्यांना ठाऊकच असणार. एक-दोन-चार करत जवळपास चाळीस शिलेदारांना म्हणजे शिवसैनिकांना गळाला लावण्यात आले. विशेष म्हणजे, आमदारांनी स्वेच्छेने हा गळ घोषण देऊन राकट झालेल्या जीभेवर घेण्याचे ठरवले आणि शिवसेना म्हणजे विधिमंडळ शिवसेना मोकळी झाली. आता शिवसेना हे नाव, तिचे निवडणूक चिन्ह सारं काही हे चाळीस लोक मागतील यात शंकाच नाही. त्यांच्या या महान कामगिरीबद्दल भाजपनं खळखळ न करता मुख्यमंत्रिपद बहाल केलं आहे. दोन पावलं पुढं जायचं असेल, तर एक पाऊल मागं जात उपमुख्यमंत्रिपदावर समाधान मानलं आहे. मुख्यमंत्रिपदावर विराजमान झालेला माणूस एक पाऊल मागं कसा येईल, हे सत्ताकारणात कोणी विचारत नाही. काँग्रेसमध्येही असे नेते आहेतच की... आमदारपदावरून निवृत्त होऊन नगरसेवक बनलेले पण आपल्याकडेच होतेच की... प्रश्न पुढे-मागे येण्याचा नाही, तर मूळ ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी कोल्हे संपवण्याचा आहे. वाघाचं कोकरू बनलेल्या शिवसेनेला संपवण्याचा आहे. राजकारणात असा झगमगणारा गोल कोणी तरी तयार करतात आणि त्याला आकर्षित होऊन काही जण जातातही तेथे... पुढे त्यांचे काय होते, याला फक्त गोल साक्षी असतो.

भाजपचे हिंदू राष्ट्र २०२५ ला अस्तित्वात येणार, अशी घोषणा नागपूरवाल्यांनी केली आहे. तसे घडायचे असेल, तर फक्त हिंदुत्ववादी पक्ष शिल्लक असावा लागतो. गेली अडिच वर्षे कोण अस्सल हिंदुत्ववादी आणि कोण कम अस्सल हिंदुत्ववादी यावरच राजकारण तापले आहे. त्यातून बाहेर पडणाऱ्या वाफांमध्ये सामान्यांचे जगण्या-मरण्याचे प्रश्न बाजुला पडले आहेत किंवा त्यांनी ते विसरावेत यासाठीचे प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्रातल्या पडझडीच्या वेळी हिंदुत्ववादाचा मुद्दाच लावून धरण्यात आला. कोणाचे हिंदुत्व जहाल आहे, कुणाचे मवाळ झाले आहे, कोणाला अयोध्येत जायची घाई आहे, कोण मशिद पाडायला गेला, कोणाला रोखले, यावरच चर्चा घडवण्यात आली. हिंदुत्व ही अशी गोष्ट करण्यात आली, की एखादा कोण आहे याचं स्कॅनिंग करण्यासाठी हिंदुत्वाचं यंत्र वापरण्यात आलं. तसं तर ते देशभर वापरण्यात येतं. महाराष्ट्रातले कारभारी त्यात तज्ज्ञ आहेत. त्यांचं खूप मोठं प्रशिक्षण झालं आहे.

मूळ मुद्दा हा आहे, की हिंदुत्व म्हणजे नेमके काय आणि खरंच कोणा राजकारण्याचा त्याच्याशी संबंध आहे. ज्यांच्या घराला अनेक बिगरहिंदुत्ववादी उंबरठे आहेत, ते हिंदुत्ववादी कसे होतात? कोणी तरी हुतात्मा चौकात जाऊन प्रश्न विचारायला पाहिजे, की हिंदुत्व नेमकं काय असतं आणि आपण म्हणजे ते काय करत आहेत. भोंगा वाजवण्याला हिंदुत्व म्हणतात, मीच मशिद पाडली याला हिंदुत्व म्हणतात, दुसऱ्याच्या दारात हनुमान चालीसा वाचण्याला हिंदुत्व म्हणतात, भगवी पांघरण्याला हिंदुत्व म्हणतात, जुने वाडे उकरण्याला हिंदुत्व म्हणतात की अजून कशाला? याचे उत्तर द्यायला कोणीच येणार नाही. कारण हे सारे हिंदुत्वाच्या वर वाढलेल्या टरफलाशी खेळत आहेत. हिंदुत्वाशी खेळणे ही काही शिवथाळी मिळवण्याइतकी आणि आधार कार्ड मिळवण्याइतकी सोपी गोष्ट नाही.

तर आता शिवसेनेचे काय होणार, उद्धव ठाकरे यांचे काय होणार, हे प्रश्नही बंडवाल्यांनीच उपस्थित केले आहेत. तू मेरी नही होगी, तो किसी की भी नही होगी? असा बऱ्याच हिंदी सिनेमात डायलॉग असतो आणि याला ते प्रेम म्हणतात. इकडेही असेच आहे. शिवसेनेला भले मोठे भगदाड पाडण्यालाच हे शिवसेनाप्रेम किंवा शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांचे वारसदार म्हणतात. अर्थात, हे तत्त्वज्ञान तयार करण्याइतके कोणी रिक्षावाले विद्वान असत नाहीत. कुणी तरी हे तत्त्वज्ञान तयार केले आणि प्रामाणिक रिक्षावाल्याप्रमाणे हे वाहून नेत आहेत. रिक्षात एखाद्याने बॅग विसरली, की काही रिक्षावाले ते प्रवाशास परत करतात. प्रामणिक रिक्षावाले अशी किर्ती त्यांना लाभते. इथं थोडं वेगळं झालंय आणि ते म्हणजे शिवसेनेत मी नाही तर शिवसेना माझीच आहे आणि ती माझ्याच सातबाऱ्यावर कोरायची आहे. कोरीव काम करणारे त्यांच्या मदतीसाठी धाऊन आले. ते उच्चशिक्षित आहेत. प्रमाण मराठीचे अभ्यासक आहेत. त्यांनी स्क्रिप्ट केली आणि यांनी ती वापरली. शिवसेनेवर उलटवली. विरोधी पक्ष मुक्त भारताचे स्वप्न पाहणाऱ्यांनी पडद्यामागून आवाज दिला आणि यांनी ओठ हलवले. शिवसेना दूरवर फेकली गेली. आता ती पुन्हः फुलवायची असेल, तर उद्धव ठाकरेंना केवळ भाषण करून चालणार नाही. आताच्या आता राजीनामा देतो आणि आताच्या आता बॅगा भरून मातोश्रीवर जातो, असे म्हणूनही चालणार नाही. नव्या काळात सत्तेला प्रचंड महत्त्व प्राप्त झाले आहे. ती व्हायरल झाली आहे. कोरोनाचा व्हायरस जसा कुठेही शिरू शकतो, तसाच सत्तेचा व्हायरस आहे. मातोश्रीच्या भिंती अभेद्य आहेत, असा दावा करून चालणार नाही. कारण व्हायरस घुसलाच. यापुढील काळातही सत्तास्पर्धा आणखी तीव्र राहणार आहे. सत्तेच्या परीघाबाहेर घुटमळत राहिलेल्या अजून शेकडो जाती, गट आहेत. तेव्हा जेव्हा धडका मारायला लागतील किंवा शमूला संपवण्यासाठी जो कोणी त्यांचा उपयोग करून घेईल, तेव्हा तर स्पर्धा आणखी टोकदार होणार आहे. याविषयी शंका बाळगण्याचे कारण नाही. आघाडीत एखादा घटक गेला, की तो मोठा जसा होतो, तसा त्याच वेळी तो छोटाही होतो. सत्तेशिवाय जगण्याची सवय कुणाला नाही. संसदबाह्य राजकारण करण्याची हिम्मत कुणात उरलेली नाही. आघाडीतले घटक दिसायला मोठे आणि वापरायला छोटे असतात. शिवसेनेच्या लक्षात एव्हाना ही गोष्ट आली असेल. शिवसेनेचे बळ नेहमीच वेगळ्या गोष्टीत सामावले आहे. राजकारणात ज्यांना कधीच कोणी चेहरे दिले नाहीत, त्यांना ते शिवसेनेने दिले आहेत. रिक्षावाले, भाजीवाले, सुतार वगैरे त्यापैकी एक. आपण चेहरे दिले; पण विचार आणि बांधिलकी देण्यात कमी पडलो का, याचा विचार उरलीसुरली शिवसेना करेल अशी अपेक्षा आहे. मातोश्रीतून झुंजार शिवसैनिक बाहेर पडण्याच्या काळात कोल्हे कसे बाहेर पडले आणि लांडग्यांची कथा कशी चालवली. हे जे महाराष्ट्राला कळले ते शिवसेनेलाही कळलेच.

•••

# दलित पँथरचा उदय : एक सैद्धांतिक विश्लेषण

**भारतासंदर्भात बुद्धधर्माचे व जातीचे विश्लेषण जरूर व्हायला पाहिजे; परंतु या विश्लेषणाचा उद्देश मात्र समाजातील वर्गीय संबंध आणखी स्पष्ट व रेखीव कसे होतील, हा असला पाहिजे व हे दुय्यम विरोध मुख्य विरोधांशी समरस कसे होतील, हे बघावयास पाहिजे. या विचारांच्या धाग्याला धरून दलित व सवर्णातील पुरोगामी चळवळींचा व्यवहार व्हावयास पाहिजे. त्याचप्रमाणे त्यांचा संघर्ष राजकीय परिघात उभारला जाऊन जास्त तीव्र व्हायला पाहिजे. यातूनच पँथरच्या क्रांतीची योग्य दिशा सापडू शकते.**



डॉ. गोपाळ गुरू

### दलित पँथरचे कार्य

सुरुवातीच्या काळात पँथरने महाराष्ट्रामध्ये औरंगाबाद, मुंबई, पुणे व नाशिक इत्यादी ठिकाणी लढे उभारून दलित समाजातील विशेषतः तरुण मंडळींना दलित समाजातील प्रश्नांवर, उदा. दलितांवर होणारे जातीय हल्ले, इ. जागृत करण्याचा प्रयत्न केला. विशेषतः मुंबई शहरात पँथरने अनेक चळवळी उभारून महाराष्ट्राच्या राजकारणावर आपली छाप पाडली. उदा. १९७४ च्या महाराष्ट्र लोकसभा पोटनिवडणुकीमध्ये पँथरच्या राजकीय पाठिंब्यामुळे विरोधी पक्षाचा उमेदवार काँग्रेसच्या उमेदवाराला हरवून निवडून आला.

पँथर चळवळीच्या इतिहासातील आणखी महत्त्वाच्या घडामोडींपैकी एक म्हणजे जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली १९७४ मध्ये रेल्वे कामगारांचा देशव्यापी संप झाला. या संपाला नामदेव ढसाळ पँथरने पाठिंबा दिला होता. त्यामुळे पँथरची इतर पुरोगामी चळवळींच्या दृष्टीने विश्वासार्हता वाढली होती. पँथरच्या दृष्टीने दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पँथरने १९७८ मध्ये दिल्लीमध्ये मराठवाडा नामांतर प्रश्नावर प्रचंड मोर्चा काढून दिल्लीतील सत्ताधारी जनता पक्षाच्या पुढाऱ्यांना पँथरची व नामांतराच्या प्रश्नाची दखल घेण्यास भाग पाडले. या मोर्चातून ते एक गोष्ट साध्य करू शकले, ती म्हणजे पँथरचे राजकीय सामर्थ्य. या मोर्चात दलित तरुणांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता.

याशिवाय पँथरने अनेक छोट्या-मोठ्या प्रश्नांवर चळवळी उभारण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये प्रामुख्याने औरंगाबादमधील दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीवाढीचा प्रश्न पँथरने यशस्वीरीत्या सोडविण्याचा प्रयत्न केला. शिष्यवृत्तीवाढीसाठी पँथरने जवळजवळ दीड महिना विद्यार्थ्यांचे आंदोलन १९७३-१९७४ मध्ये चालविले




होते, त्याचप्रमाणे खेड्यांतून दलितांवर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडण्याचाही प्रयत्न पँथरने केला व अजूनही पँथरचे अनेक गट ते करताना आपण वृत्तपत्रांतून वाचतच असतो; परंतु सर्वसामान्यपणे आपणास असे दिसून येते, की पँथर ही आपले ध्येय पुरे करण्यामध्ये अपयशी ठरली. पँथरच्या अपयशाची खालीलप्रमाणे कारणे उद्‌भवतात.

### पँथरच्या वैचारिक भूमिकेतील उणिवा

दलित पँथरच्या पराभवाचे मुख्य कारण म्हणजे पँथरच्या वैचारिक भूमिकेतील उणिवा हे होय. या उणिवांमुळेच पँथर अपेक्षेप्रमाणे सर्व जातींतील दलितांना वर्गाच्या पातळीवर संघटित करून संघर्ष करू

शकली नाही. पँथरने आपल्या जाहीरनाम्यातच सर्व दलितांची चळवळ ही समाजरचनेतील मुख्य आर्थिक विरोधावर उभारण्याची आशा व्यक्त केली होती. याचबरोबर दलितांचा लढा उभारण्यासाठी सांस्कृतिक घटकांचासुद्धा वापर करण्याचा मनोदय पँथरने व्यक्त केला. उदा. बौद्ध धर्माचा वापर दलितांच्या प्रबोधनासाठी करण्याचा मनोदय पँथरच्या विचारांतून व्यक्त होत होता; परंतु बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञान व प्रतीकांमधून सर्व जातींतील लोकांची वर्गीय एकजूट कशी करता येईल याबद्दलची स्पष्टता पँथरच्या कार्यक्रमात आढळून येत नाही.

भारतासारख्या खंडप्राय दिसणाऱ्या समाजात वर्गीय पातळीवर संघर्ष उभारीत असताना परिवर्तनाच्या प्रक्रियेतील सांस्कृतिक घटकांचे महत्त्व लक्षात घेणे आवश्यक तर असतेच; परंतु त्याचबरोबर निकोपवर्गीय संघटना उभारीत असताना सांस्कृतिक घटकांबरोबरच वर्गीय जनसंघटन करण्याची क्षमता असलेल्या आर्थिक घटकांचा अग्रक्रमाने विचार करणे क्रमप्राप्त असते; परंतु ही अग्रक्रमाची भूमिका पँथर घेऊ शकली नाही. सांस्कृतिक घटकांचा तळाधार ऐतिहासिकदृष्ट्या बघितले तरी तो भौतिकच असतो; परंतु पँथरच्या अनेक नेत्यांनी ही भूमिका समजावून घेऊन मांडण्याचा प्रयत्न केला नाही. अलीकडे ढसाळांनी यासंदर्भात भूमिका घेतली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे, की अस्पृश्यता व नामांतर हा सुपरस्ट्रक्चरचा प्रश्न आहे; परंतु पुढे ते म्हणतात, बुद्धधर्माचा प्रसार करण्यासाठी असे केंद्र पाहिजे, की ज्यामधून सर्वसामान्यांचे प्रश्न सुटू शकतील. ते प्रचलित बुद्धधर्माचा दलितांकडून जो आचार होतो. त्याबद्दल नाखुश आहेत; परंतु जनसंघटन करण्यासाठी बुद्धधर्माचा कसा वापर करता येईल त्याबद्दल ढसाळ काही भूमिका स्पष्ट करत नाहीत. आर्थिक किंवा सांस्कृतिक प्रश्नांमधील अग्रक्रम न ठरविणे ही पँथरची सर्वांत मोठी वैचारिक उणीव होती. म्हणूनच या अस्पष्ट व तणावपूर्ण वैचारिक भूमिकेमुळे पँथरला दलितांच्या वर्गीय जुटीच्या दृष्टीने काहीच करता आले नाही.

**पँथरच्या विचार व व्यवहारात फरक**

पँथरने दलित मुक्तिसंग्रामासाठी जो आर्थिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आखला होता त्यापैकी जे काही प्रश्न पँथरने हाताळण्याचे प्रयत्न केले ते बहुतांशी सांस्कृतिक स्वरूपाचे होते. पँथरने आर्थिक स्वरूपाच्या प्रश्नांना उदा. शेतमजुरांच्या किमान वेतनाचा प्रश्न, जमिनीच्या वाटपाच्या व गायरान शेती वाटपाच्या प्रश्नांना बगल दिली. पँथरने सांस्कृतिक घटकांबरोबर हे मूलभूत प्रश्न घेतले असते, तर तिचा पाया जनसामान्यांत मजबूत होत गेला असता; परंतु पँथर ही सामान्यपणे शहरांपुरतीच मर्यादित राहिली. खेड्यापाड्यांतून पँथरने दलितांचे संघर्ष उभारल्याचे आठवत नाही. तेव्हा पँथर काहीशी शहरी व सांस्कृतिक स्वरूपाची राहिल्यामुळे व्यवहाराच्या दृष्टीने तिने आर्थिक प्रश्नांपासून फारकत घेतली. या फारकतीमुळे पँथरचा जनसामान्यांतील पाया व पाठिंबा हा संकुचित होत गेला.

पँथरच्या काही नेत्यांनी दलित तरुणांच्या बेकारीचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने थोडीफार आस्था दाखविली नाही, असे नाही; परंतु या बेकारीच्या प्रश्नांची सोडवणूक सामुदायिक संघर्ष उभारून न करता पँथरच्या नेत्यांनी स्वतःच्या वैयक्तिक ओळखीतून व प्रयत्नांतून ती करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे समाजातील मूलभूत विरोधांवर दलितांची सामुदायिक संघटना बांधण्याची गरज पँथरच्या दृष्टीने हळूहळू कमी होत गेली. यासंदर्भात ढसाळांनी अगदी अलीकडे खंत व्यक्त केली आहे. ते म्हणतात, ''दलित पँथर ही समाजातील सर्व दलितांना वर्गाच्या पातळीवर संघटित करू शकली नाही. याचा परिणाम असा झाला, की शासक वर्गाविरुद्ध संघर्ष उभारण्यासाठी जे समाजाचे पोलरायझेशन हवे होते. (वर्गविभाजन) ते पँथर करू शकली नाही.'' याचे मुख्य कारण म्हणजे पँथरच्या नेत्यांनी दलितांमधील संघर्षाची जाणीव गृहीत धरली होती, हे त्यांच्या क्रांतिकारी जाहीरनाम्यावरून स्पष्ट होते; परंतु वर्गसंघर्षाचा नियम असा आहे, की एखादा घटक कितीही शोषित-पीडित असला तरी त्याच्यामध्ये संघर्षासाठी आवश्यक असलेली शोषणाविरुद्धची जाणीव गृहीत धरून चालत नाही किंवा ती त्यामध्ये आपोआप निर्माण होत नाही, तर ही जाणीव या वर्गामध्ये जाणीवपूर्वक निर्माण करावयास पाहिजे. दलित समाजासंदर्भात ही जाणीव निर्माण होण्याची क्रांतिकारी प्रक्रिया पूर्ण व्हायला पाहिजे होती. ती पँथरकडून पूर्ण होऊ शकली नाही. थोडक्यात, पँथरने दलितांची क्रांती केवळ जाहीरनाम्यापुरतीच मर्यादित ठेवली, तिचे व्यवहारात रूपांतर केले नाही. ही पँथरची फार मोठी कमजोरी होती.



**अमेरिकेतील ब्लॅक पँथर चळवळीतील एक छायाचित्र.**

तसेच पोलरायझेशनच्या दृष्टीने मित्रांचे बहुमत वाढविण्यात व शत्रूला अल्पमतात आणण्यात पँथरला संपूर्णपणे अपयश आल्याचे आपणास दिसून येते. असे म्हटले जाते, की दलित पँथरच्या काही मंडळींनी सवर्णातील पुरोगामी चळवळींना दूषणे देण्याचा कार्यक्रम केला. त्यामुळे पुरोगामी सवर्ण तरुणांची मने दुखावली व दुभंगली. म्हणजे पँथर पुरोगामी चळवळीचा पाठिंबा गमावून बसली.

इतर पुरोगामी चळवळींचा पाठिंबा व सहानुभूती गमाविण्याचे दुसरे कारण म्हणजे पँथरच्या काही नेत्यांनी आपले नेतृत्व इतर पुरोगामी चळवळींनी स्वीकारावे असा आग्रह धरला. उदा. गुजरातमधील राखीव जागांच्या समर्थनार्थ जे सर्वपक्षीय प्रांतिक मेळावे झाले त्या मेळाव्यांत पँथरच्या काही नेत्यांनी असा आग्रह धरला की, ''या सर्वपक्षीय राखीव जागा बचाव आंदोलनाचे नेतृत्व पँथरच करू शकते आणि म्हणून इतरांनी पँथरचे नेतृत्व स्वीकारावे.'' अशा प्रकारची भूमिका कोल्हापूर येथील सर्वपक्षीय राखीव जागा बचाव मेळाव्यात काही पँथरच्या नेत्यांनी घेतली होती. याशिवाय पँथरला दलित समाजातील इतर जातींचा म्हणावा तसा पाठिंबा मिळू शकला नाही. त्याचे कारण म्हणजे पँथरची संकुचित व आग्रही भूमिका. या संदर्भात असे म्हटले जाते, की पँथरच्या काही नेत्यांनी अशी भूमिका घेतली, की जो बुद्धिस्ट तोच पँथर. सारांश, पँथरच्या नेत्यांनी पँथरची जनसामान्यांतील विश्वासार्हता व पाठिंबा मिळण्याऐवजी आपले नेतृत्व कसे शाबूत राहील एवढाच मर्यादित हेतू समोर ठेवला. त्यामुळे दलित लोकांचे इतर जातींतील समान समस्या असलेल्या लोकांशी अभिसरण झाले नाही व त्यातून एक व्यापक चळवळ निर्माण होऊ शकली नाही. किंबहुना, दलितांची चळवळ ही जातीच्या संकुचित पायावर उभारली जावी यातच पँथरच्या काही नेत्यांचे वैयक्तिक हितसंबंध गुंतलेले आहेत, असे वाटते. म्हणजे पँथरच्या नेत्यांच्या काम करण्याच्या पद्धतीमध्ये व रिपब्लिकन नेत्यांच्या काम करण्याच्या पद्धतीमध्ये फारसा फरक नाही. यामुळेच दलित पँथरमध्ये विघटन झाले.

**पँथरचे विघटन**

पँथरच्या जाहीरनाम्याचे व्यापक स्वरूप लक्षात घेऊन व पँथरची सुरुवातीच्या काळातील आंदोलने बघून असे वाटत होते, की पँथर ही एक लढाऊ व प्रतिकारक्षम अशी संघटना म्हणून दलितांच्या प्रश्नांचा वाचा फोडील. त्यादृष्टीने पँथरने मुंबई, पुणे, नाशिक व औरंगाबाद येथे चळवळी केल्या. ती महाराष्ट्रातून गुजरात, उत्तर प्रदेशात व पंजाबपर्यंत पोहोचली; परंतु महाराष्ट्राच्या बाबतीत बोलावयाचे झाल्यास इथे ही चळवळ इतकी विघटित झाली, की ती जवळजवळ खंडित झाल्यासारखीच आहे.

पँथरमध्ये फूट पाडण्याची प्रामुख्याने दोन कारणे संभवतात. त्यापैकी एक कारण हे वैचारिक स्वरूपाचे आहे, तर दुसरे पँथरच्या नेतृत्वाशी निगडित आहे. खरे पाहिले, तर विचारांच्या पातळीवरील फूट ही पँथरमध्ये सुरुवातीपासूनच होती; परंतु ती फूट उघडउघड अभिव्यक्त झाली नव्हती एवढेच. या फुटीतील एक गट हा आंबेडकरवादाला कमी न लेखता मार्क्सवादाकडे झुकलेला. या गटाचे नेतृत्व नामदेव ढसाळांकडे होते. या गटाची भूमिका अशी होती, की समाजातील वास्तव समजावून घेण्यासाठी जातीबरोबर वर्गाचासुद्धा विचार व्हावयास पाहिजे. त्याचप्रमाणे काँग्रेसी राज्य ही दलितांचे दमन करणारी यंत्रणा असल्यामुळे पँथर काँग्रेसशी युती करणार नाही, अशी ढसाळ गटाची भूमिका होती. दलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी वर्गीय पातळीवर संघर्ष उभारावा लागेल, अशी या गटाची धारणा होती. म्हणजे ढसाळांनी पायाला तसेच इमल्याला परिवर्तनाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचे मानले होते; परंतु पँथरचे दुसरे नेते राजा ढाले यांची भूमिका मात्र ढसाळांच्या भूमिकेपेक्षा बरीचशी वेगळी व एकांगी होती. ढालेंच्या मते, भारतामध्ये दलितमुक्तीच्या दृष्टीने किंवा समाजपरिवर्तनासाठी आर्थिक प्रश्नांपेक्षा सांस्कृतिक प्रश्न महत्त्वाचे आहेत. म्हणजे सामाजिक बदलासाठी धर्मांतरासारखे उपायच महत्त्वाचे आहेत. अशा तऱ्हेने पँथरमध्ये सिद्धांताच्या पातळीवर १९७८ मध्ये दोन गट पडले. नंतर ढालेंनी मास मुव्हमेंट नावाची संघटना काढली. जिचे उद्दिष्ट स्वाभाविकपणे देशात बुद्ध धर्माच्या आधारे सांस्कृतिक क्रांती घडवून आणणे हे आहे.

याशिवाय, पँथरच्या फुटीचे दुसरे कारण सांगत असताना असा युक्तिवाद केला जातो, की पँथरच्या काही नेत्यांच्या काम करण्याच्या पद्धतीमुळेसुद्धा पँथरमध्ये फूट पडली. ढसाळांच्या मते, काही पँथरची मंडळी हुकूमशाही पद्धतीने वागत होती. त्यामुळे संघटना ज्या लोकशाही पद्धतीने चालावयास पाहिजे होती त्या पद्धतीचा संकोच झाला व शेवटी १९७८ मध्ये पँथर फुटली.

## बाहेरील शक्ती व पँथरमधील फूट

याशिवाय आपणास असे दिसेल, की बाहेरच्या शक्तींनीसुद्धा पँथरच्या विघटनामध्ये हातभार लावला. असे म्हटले जाते, की ''दलित चळवळ सबळ होऊ नये, तिने योग्य ध्येयधोरणे स्वीकारू नयेत, ती गतिमान होऊ नये, तिला आघात करण्याची शक्ती प्राप्त होऊ नये, ती फुटावी, तिची शक्ती परस्परांत लढण्यात खर्च व्हावी, तिला क्रांतिकारी आशय आणि कार्यक्रम प्राप्त होऊ नये, ती सत्तेच्या राजकारणात योग्य दिशेने जाऊ नये, यासाठी दलित पँथर विरोधी शक्तीने अनेक पातळ्यांवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पद्धतीने काम करून पँथर फोडली.'' शिवाय दलित पँथरची शक्ती निष्प्रभ करण्यासाठी काही राजकीय पक्षांनी पँथरच्या नेत्यांना प्रलोभने दाखवून पँथर मोडीत काढण्याचा प्रयत्न केला व ते यशस्वीसुद्धा झाले. सारांश, पँथरच्या नेत्यांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा व आपसातील हेव्यादाव्यांमुळे पँथरची वाट लागली. अशा या विघटनामुळे व कार्य करण्याच्या सदोष पद्धतीमुळे पँथर दलित समाजाला आपल्या राजकीय प्रभावाखाली आणू शकली नाही. त्यामुळे पँथरने सुरुवातीलाच ठरविल्याप्रमाणे ती राजकारणात रिपब्लिकन नेत्यांचा, तसेच काँग्रेसचा पराभव करू शकली नाही. या शक्तींना पँथर शह देऊ शकली नाही, हे पँथरच्या विधानसभा व लोकसभा निवडणुकीमध्ये झालेल्या पराभवावरून सिद्ध होते. दलितांनी पँथरला मतदान करण्याऐवजी काँग्रेसला मतदान केले, हे १९८० च्या विधानसभा व लोकसभा निवडणुकीवरून सिद्ध होते.




**पँथरच्या मोर्चाचे छायाचित्र**

**पँथरचे भवितव्य**

अशा परिस्थितीत पँथरलाच नव्हे, तर समाजातील इतर पुरोगामी चळवळींना (त्या खऱ्या अर्थाने पुरोगामी असतील, असे मी समजतो.) पुन्हा कृतिशील व कार्यक्षम करण्यासाठी या चळवळींनी एक स्पष्ट व वैश्विक स्वरूपाची विचारपद्धती अंगीकारावयास पाहिजे. या पद्धतीप्रमाणे आर्थिक अगोदर की सांस्कृतिक अगोदर, अशा प्रकारचा आग्रह न धरता सुरुवातीला शोषितांचा लढा उभारण्यासाठी या दोन्हीही घटकांचा वापर एक डावपेचाचा भाग म्हणूनच करावयास पाहिजे. नंतर लढ्याच्या ओघात काही गोष्टी, ज्या सुरुवातीला आग्रही वाटतात त्या निकालात निघतील व सांस्कृतिक घटकांचे सामाजिक व आर्थिक तळाधार स्पष्ट होतील व त्यातून मग सर्वहारांची व्यापक चळवळ उभारणे शक्य होईल.

अशा प्रकारची भूमिका स्वीकारली म्हणजे आपण सांस्कृतिक घटकांना लढ्याच्या प्रक्रियेमध्ये कमी लेखतो अशातला भाग नाही. केवळ सांस्कृतिक क्रांतीचा आग्रह धरणाऱ्या दलित नेत्यांनी हे लक्षात ठेवावयास पाहिजे, की क्रांती सकृत्‌दर्शनी सांस्कृतिक स्वरूपाची जरी दिसत असली, तरी तिला राजकीय पदर असतो. जेव्हा या चळवळीच्या राजकीय पदराची जाणीव होते तेव्हा सांस्कृतिक घटकांची प्रबोधनासाठी तेवढी गरज उरत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळसुद्धा सुरुवातीला सांस्कृतिक स्वरूपाची वाटत होती. मात्र, १९३० च्या पुढे जेव्हा या चळवळीला राजकीय आशय प्राप्त झाला तेव्हा बाबासाहेबांनी सांस्कृतिक घटकांचा आग्रह सोडल्याचे दिसून येते. शिवाय बाबासाहेबांच्या लढ्याच्या प्रक्रियेमध्ये त्यांच्या चळवळीचा सामाजिक व आर्थिक संदर्भ १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पार्टीच्या स्थापनेपर्यंत स्पष्ट झाला होता. बाबासाहेबांनी दलितांचे राजकीय प्रबोधन करण्यासाठीच प्रारंभी सांस्कृतिक घटकांचा उपयोग करून घेतला, हे यावरून स्पष्ट होते.

भारतासंदर्भात बुद्धधर्माचे व जातीचे विश्लेषण जरूर व्हायला पाहिजे; परंतु या विश्लेषणाचा उद्देश मात्र समाजातील वर्गीय संबंध आणखी स्पष्ट व रेखीव कसे होतील, हा असला पाहिजे व हे दुय्यम विरोध मुख्य विरोधांशी समरस कसे होतील, हे बघावयास पाहिजे. या विचारांच्या धाग्याला धरून दलित व सवर्णातील पुरोगामी चळवळींचा व्यवहार व्हावयास पाहिजे. त्याचप्रमाणे त्यांचा संघर्ष राजकीय परिघात उभारला जाऊन जास्त तीव्र व्हायला पाहिजे. यातूनच पँथरच्या क्रांतीची योग्य दिशा सापडू शकते.

शिवाय सुरुवातीलाच ढसाळ यांनी सुचविल्याप्रमाणे बुद्धधर्माचे एक केंद्र असावयास पाहिजे; परंतु या केंद्राचा हेतू लोकांना बुद्धधर्माचे क्रांतिकारी स्वरूप, जे बाबासाहेबांना अभिप्रेत होते, ते समजावून द्यायला पाहिजे. उदा. दलितांनी सम्यक क्रांतीच्या संकल्पासाठी बुद्धधर्मातील त्रिशरण-पंचशीलाचे नवे विश्लेषण द्यायला पाहिजे, ज्यामधून सर्व जातींतील शोषित एकत्र येतील. त्रिशरणाचा अर्थ, स्थूलमानाने, समता, स्वतंत्रता व बंधुता, असा लावावयास पाहिजे. कारण यामध्ये सर्वहारांच्या मुक्तीचा कार्यक्रम आहे. पंचशीलाच्या आचरणाचा आग्रह न धरता पंचशील ही वैयक्तिक बाब समजावी. असे झाल्यास दलितांच्या लढ्यास संघटित शक्ती प्राप्त होईल व ती पुन्हा कृतिशील बनू शकेल. ●●●

**(लेखक राजकीय विचारवंत व इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली जर्नलचे संपादक आहेत.)**




दलित पँथरच्या आंदोलनातील एक छायाचित्र

# दलित पँथर : स्थापनेची तीन, तर फुटीची सत्तेचाळीस वर्षे

**दलित पँथरची स्थापना ७२ सालातली आणि या संघटनेचे संस्थापक नसलेले; पण या संघटनेचे सर्वांत लोकप्रिय व संघटनेचा चेहरा बनलेले राजा ढाले यांनी स्वत:च दलित पँथर मार्च ७७ मध्ये बरखास्त करून मास मुव्हमेंट नावाची नवी संघटना पँथर्ससोबत सुरू केली! ७२ ते ७७ हा म्हटला तर सहा वर्षांचा काळ; पण ७५ च्या आणीबाणीचे १९ महिने वजा केले, तर जेमतेम अडीच वर्षेच पँथर कार्यरत राहिली! पण या अडीच वर्षांवर आज पन्नास वर्षांनंतरही चर्चा, वाद, आरोप, प्रत्यारोप चालूच आहेत!**



संजय पवार

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जगात एखाद्या वावटळीप्रमाणे येऊन गेलेली आक्रमक, लढाऊ, तरुण संघटना म्हणजे दलित पँथर!

तत्कालीन राजकीय पक्ष, संघटना यांच्यासाठी आकर्षणाचा विषय ठरलेली व आपल्या आधिपत्याखाली घेण्यासाठी हपापलेले, आसुसलेले हे सर्व पक्ष, संघटना या सर्वांनी मिळून अवघ्या तीन वर्षांत या धगधगत्या अग्निकुंडासारख्या दलित पँथरला गिळंकृत करून असा ढेकर दिला, ज्याची गुंज या संघटनेच्या पन्नाशीतही ऐकू येतेय!

दलित पँथर हे त्या काळाचे (६० आणि ७० चे दशक) अपत्यही म्हणता येईल. आज सर्वत्र रूढ झालेली साठोत्तरी ही साहित्यासंबंधातील संज्ञा, त्यावेळी केवळ मुंबई, महाराष्ट्र, मराठीपुरतीच मर्यादित नव्हती, तर ती सर्व प्रमुख भारतीय भाषांसह, जगभरातील छोट्या-मोठ्या देशांत, तेथील भाषांतही रूढ झाली होती.

ही संज्ञा साहित्याच्या सोबतीनेच सर्व ललित कला, दृश्य कला, आविष्काराच्या सर्व माध्यमांत लागू झाली. ते दशकच जगभर सांस्कृतिक, सामाजिक राजकीय उलथापालथीचे होते. प्रस्थापित व्यवस्थेविरोधात जगभरातच प्रामुख्याने तरुण पिढीने बंडखोरी आरंभली होती. साहित्य, चित्र, नाट्य, चित्रपट, सामाजिक वा राजकीय परिवर्तन, अशा सर्वच क्षेत्रांत बंडखोरीचे लोण पसरले होते. एखाद्या साचलेल्या शेवाळयुक्त डबक्यात नेम धरून दगड मारावा आणि शेवाळ, साचलेपण दूर करून पाणी स्वच्छ, खळाळते व प्रवाही करतानाच ते नव्या वळणाने नवनवे प्रदेश ओलिताखाली आणेल, अशी एक सुस्पष्ट धारणा या बंडखोरीमागे होती.


**...विघातक जसे घडले, तसेच विधायकही घडले**

प्रस्थापित सर्व मूल्यव्यवस्थांना धडका मारायचे काम जगभरच्या तरुणांनी सुरू केले होते. हे तरुण लादलेल्या युद्धाने, सक्तीच्या लष्कर भरतीने जसे नैराश्यात गेले होते, तसेच प्रस्थापित व्यवस्था फक्त सुस्त अजगरासारखी आपल्या आयुष्याला वेटोळे घालून बसलीय, हे त्यांना तीव्रतेने जाणवले. त्यांनी सर्वप्रथम या मूल्यव्यवस्थेच्या सुस्त

अजगरालाच ढोसायला सुरुवात केली. त्याला जखमी करत प्रसंगी रक्तबंबाळ करत त्याच्या वेटोळ्यातून बाहेर पडायचा आश्वासक प्रयत्न करू लागली. त्यासाठी तिने नवनवीन विचारधारा, जीवनशैलींना स्वीकारले, तसेच पराकोटीची व्यसनाधीनता, गुंडगिरी, हिप्पी, जिप्सी संस्कृतीचा अंगीकार करत गेली. यातून विघातक जसे घडले, तसेच विधायकही घडले.

विघातकात व्यसनाधीनता, आरोग्य हेळसांड, अपमृत्यू तसेच नागरी जीवनात वाढलेली गुन्हेगारी, नैराश्य यामुळे आत्ममग्न तसेच नकारात्मक विचार गर्तेत अडकत मनोविकारांची वाढ होत गेली. पर्यायाने मनोरुग्ण वाढले. हे प्रामुख्याने श्रीमंत देश व युरोपातील देशांत मोठ्या प्रमाणावर घडले.

तुलनेने आशियाई देश ज्यांना हजारो वर्षांची परंपरा आहे. लग्न, कुटुंबसंस्था, रूढी, परंपरा, अध्यात्म, ज्योतिष, धर्म, जात यांच्या चिरेबंदी बांधणीत समाज बांधला गेलेला आहे. त्यामुळे व्यक्ती सुटी न होता कुटुंबात, समाजातच राहत असल्याने टोकाच्या स्वैराचाराला थोडा लगाम बसला. प्रस्थापित व्यवस्थेबाबत चीड असली तरी त्याचा उद्रेक नव्हता झाला.


बाबूराव बागूल

परिणामी अमेरिका, युरोपात जसे वा ज्या प्रमाणात घडले तसे आपल्या देशात, प्रदेशात घडले नाही. आवाज उठला, बंडखोरीही झाली, ती सफल-विफल दोन्ही झाली तरीही देश विकसनशील संज्ञेत बसत असल्याने राज्यकर्त्यांनीही बंडखोरी अराजकतेकडेच काय; पण मर्यादित पडझडीपलीकडे जाणार नाही, याची काळजी घेतली होतीच!

**...पण बाबासाहेबांच्या राजीनाम्याचा उल्लेखही होत नाही!**

संविधाननिर्मितीत गुंतलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर ५० साली जबाबदारीतून थोडे मुक्त झाले आणि त्यांनी पुन्हा आपल्या मूळ अस्पृश्यतेविरुद्धचा लढा, जातीयतेविरुद्धतेचा, ब्राह्मणी पुरोहितशाहीविरोधातला एल्गार पुन्हा तीव्र केला.संविधानामार्फत अस्पृश्यता, जातीयता याचे कायद्याने उच्चाटन करतानाच या वर्गाला आरक्षणातून समानसंधीसाठी विशेष संधी दिली. हिंदू कोड बिलातून हिंदू स्त्रियांची गुलामी दूर केली; पण नेहरूंनी हिंदू जातीयवाद्यांच्या दबावाला बळी पडून हिंदू कोड बिल अर्धवटच आणले. तेव्हा बाबासाहेबांनी सरळ आपल्या कायदेमंत्रिपदाचा राजीनामा दिला. तत्त्वासाठी राजीनामा देणाऱ्या मंत्र्यांची उदाहरणे दिली जातात तेव्हा सी.डी. देशमुख व लाल बहादूर शास्त्री यांची नावे घेतली जातात; पण बाबासाहेबांच्या राजीनाम्याचा उल्लेखही होत नाही!

१९३५ साली येवला येथे बाबासाहेबांनी घोषणा केली होती, की मी हिंदू धर्मात जन्मलो तरी हिंदू धर्मात मरणार नाही! या घोषणेनंतरही इथल्या सनातन धर्मवाद्यांना प्रतिसाद द्यावासा वाटला नाही. तेव्हा जगातील सर्व धर्म, पंथ यांचा अभ्यास करून बाबासाहेबांनी भारतातच जन्मलेला, जगभर प्रसार झालेला; पण इथेच गाडल्या गेलेल्या बुद्ध धर्माचे पुनरुज्जीवन करून १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपूर येथे सामूहिक धर्मांतर केले! अनेक वर्षांपासून अनेक शारीरिक व्याधींशी झुंझत राहिलेल्या बाबासाहेबांचे धर्मांतरानंतर अवघ्या दोनच महिन्यांत, ६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले. साठोत्तरी पर्वाच्या सुरुवातीआधीची ही सर्वात मोठी अहिंसक धर्मक्रांती होती. जी दलित पँथरच्या जन्मास प्रेरणादायी ठरली. मात्र, हीच धर्मक्रांती पँथरच्या विभाजन व नंतर विलयास कारणीभूत ठरवली गेली.

**बाबूराव बागूल हे पहिल्या पिढीचे नायक**

दलित पँथरच्या जन्माआधीची व साठोत्तरी पर्वाच्या सुरुवातीची

## साठोत्तरी पर्वाच्या आधीची सर्वांत मोठी भाषिक व राजकीय लढाई

आता पृथ्वीच्या नकाशावरून आपण भारताच्या व तिथून महाराष्ट्राच्या नकाशावर स्थिरावूया. साठच्या दशकात स्वातंत्र्य मिळून जवळपास दहा-बारा वर्षे झाली होती. स्वातंत्र्यानंतर वर्षाच्या आतच गांधी हत्या झाल्याने गांधी व्यक्ती म्हणून संपली; पण विचार अधिक रुजत गेले, त्याचवेळी काँग्रेस नामक स्वातंत्र्य चळवळीचे राजकीय पक्षात रूपांतर झाले होते. पन्नास साली भारताने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली गठित घटना समितीने तयार केलेल्या राज्यघटनेचा स्वीकार केला गेला. संसदीय बहुपक्षीय लोकशाही, धर्मनिरपेक्षता, 'एक व्यक्ती एक मत' या तत्त्वानुसार संसदीय लोकशाही, देशाचा कारभार लोकसभा, राज्यसभेद्वारे, तर राज्यांचा विधानसभेद्वारे. काही राज्यांत राज्यसभेच्या धर्तीवर विधान परिषदांची सभागृहेही स्थापली गेली. भारतीय राज्यघटना स्वीकारासोबतच भाषावार प्रांतरचनाही लागू झाली. या स्थित्यंतरात अनेक राज्यांत संघर्ष उभे राहिले. राज्यांचे आकार, राजधानी, भाषा, सीमावर्ती प्रदेश असे अनेक प्रश्न उभे राहिले, आंदोलने झाली. गुजरात, महाराष्ट्र या भाषावार प्रांतरचनेत द्वैभाषिक ठेवलेल्या राज्याबद्दल महाराष्ट्रात तीव्र असंतोष निर्माण झाला. यातूनच मुंबईसह महाराष्ट्राची मागणी करणारे संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन झाले. ज्यात १०५ हुतात्मे झाले. नेहरू व काँग्रेसबद्दल प्रचंड राग मराठी भाषकांत होता, ज्याला चूड देण्याचे काम संयुक्त महाराष्ट्र समितीने केले. या समितीचे नेतृत्व आचार्य अत्रे, कॉ. डांगे, एस.एम. जोशी, केशवराव जेधे, सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे, अशा दिग्गजांनी केले आणि त्याला अमरशेख, अण्णा भाऊ साठे अशा शाहिरांनी आपल्या शाहिरीने, लेखणीने, वाणीने इतक्या उंचीला नेले, की शेवटी १ मे १९६० रोजी द्विभाषिक विभक्त करून मुंबईसह महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली; परंतु त्यावेळी अनिर्णीत राहिलेले सीमा प्रश्न आजही तसेच आहेत. साठोत्तरी पर्वाच्या आधीची ही सर्वांत मोठी भाषिक व राजकीय लढाई होती.


ही पार्श्वभूमी मुद्दाम जितकी संक्षिप्ततेत सांगता येईल, ती सांगितली. कारण दलित पँथरचे जे कुणी संस्थापक होते ते तरुण होते. प्रस्थापित व्यवस्थेवर नाराज होते; पण मुख्यत: ते साहित्य चळवळीतले होते! तेव्हा दलित साहित्य या संज्ञेचा जन्मही नव्हता झाला. म.भि. चिटणीस, बाबूराव बागूल हे लिहीत होते. ते चर्चितही होते; पण त्याला लेबल नव्हते, उलट अण्णा भाऊ साठेंप्रमाणे बाबूरावांवरही कम्युनिस्ट हा शिक्का बसला होता. खरं तर ही तत्कालीन दलित लेखक, विचारवंत हे सर्व आंबेडकरवादी; पण रिपब्लिकन पक्षाची (तेव्हा व आताही!) राजकीय ताकद, धोरणे, वैचारिक समज या सर्वांना कधीच जवळची वाटली नाही. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर देशभर साहित्य, कला आदी क्षेत्रांवरला कम्युनिस्ट, विशेषत: मार्क्सवादी प्रभाव महाराष्ट्रावरही पडला. हिंदी सिनेसृष्टीसारख्या त्या वेळच्या तद्दन व्यावसायिक सिनेमातही के.ए. अब्बास, राज कपूर, कैफी आजमी, साहिर लुधियानवी, मंटो, अशा अनेकांवर हा प्रभाव होता व बरीच वर्षे इप्टा या नाट्यसंस्थेद्वारे नाट्यक्षेत्रावरही हा प्रभाव टिकून होता. साहजिकच देशातील इतर सर्व जाती-धर्मांतील तरुणांप्रमाणेच हा मार्क्सवादी प्रभाव त्या वेळच्या जन्माने दलित तरुण/प्रौढ लेखकांवरही पडला. बाबूराव बागूल हे त्या पहिल्या पिढीचे नायक म्हणता येतील.

**अनेक तरुण समाजवादी, कम्युनिस्ट विचारांकडे आकर्षित**

साठोत्तरी व्यवस्थापरिवर्तन विचारांचा महाराष्ट्रात सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात लक्षणीय प्रभाव पडला. सत्ताधारी राजकीय पक्ष म्हणून काँग्रेसकडे देशभर बहुमत होते व तो पक्ष विचारांपेक्षा आता सत्तासंपादन व सत्ताभोग व सत्तेद्वारे दमन, अशा चक्रात अडकला होता. त्याला प्रतिक्रिया म्हणून अनेक तरुण समाजवादी, कम्युनिस्ट विचारांकडे आकर्षित झाले. या तरुणांमध्ये सामाजिक न्यायासाठी तळमळ निर्माण झाली. अनेकांनी शिक्षण अर्धवट सोडून दलित आदिवासींमध्ये काम करायला सुरुवात केली. याचे टोक बंगालमध्ये नक्षलवादाच्या जन्मापर्यंत गेले. ज्याची सावली महाराष्ट्रावरही पडली. तरीही महाराष्ट्रात साठोत्तरी उद्रेकाची ठळक लक्षणे मुख्यत्वे साहित्य, नाट्य व काही अंशी चित्रपटांत दिसून आली.

**ब्राह्मणीछाप आणि अभिजनवृत्ती अदृश्यस्वरूपात कायम राहिली!**

मराठी साहित्यात पारंपरिक साहित्यावर सदाशिव पेठेचा शिक्का होता. मूलत: मनोरंजन, स्मरणरंजन व कल्पनारम्यता यात अडकलेल्या साहित्याला सत्यकथा या मासिकाने छेद देत स्वत:चा असा एक नवा तोंडवळा दिला. त्यात प्रयोगशीलता असली तरी त्यामागे असलेला ब्राह्मणीछाप आणि अभिजनवृत्ती अदृश्यस्वरूपात कायम राहिली! त्यामुळे या प्रयोगशील सत्यकथेविरोधातच तरुण साहित्यिकांनी बंड केले. अशोक शहाणे, नेमाडे, मनोहर ओक, गुरूनाथ धुरी, कोलटकर, यांच्याबरोबरीनेच राजा ढाले, दया पवार, अर्जुन डांगळे, प्रल्हाद चेंदवणकर, ज.वि. पवार, नामदेव ढसाळ हेही होते. या तरुणांना नव्या परिवर्तनवादी, व्यवस्थाविरोधी विचारांनी भारून टाकले होते. त्यामुळे समांतर चाललेल्या सामाजिक चळवळींच्या प्रभावाने हे तरुण जातीधर्मांच्या भिंती ओलांडून सत्यकथेच्या विरोधात एकत्र झाले आणि त्यांनी सत्यकथेची जाहीर होळी सत्यकथेच्या कार्यालयाखालीच केली (बंडखोरांचा उत्साह इतका होता, की ते जमले सगळे; पण होळी करायला सत्यकथेचा अंकच कुणाकडे नव्हता! शेवटी सत्यकथेचे संस्थापक संपादक




श्री.पु. भागवत यांनीच एक अंक या होळीसाठी दिला!)

साठोत्तरी साहित्य चळवळीने जोर धरलेला असतानाच यात कार्यरत; पण जन्माने दलित तरुणांना त्यावेळी देशभरातून येणाऱ्या दलित अत्याचारांच्या बातम्यांनी अस्वस्थ केले. साहित्य चळवळीतले दलितेतर मित्र जाती-धर्मांपलिकडे जाऊन संवेदनशील व जातिअंताची भाषा बोलत असले, तरी तो त्यांचा प्राधान्यक्रम नव्हता.त्याचवेळी सामाजिक, राजकीय क्षेत्रांत कार्यरत समाजवादी, कम्युनिस्ट तरुणांत दलित प्रश्नांवर मतमतांतरे होती. समाजवादी गांधी विचाराने हृदयपरिवर्तन, लोकशाही पद्धतीने आंदोलने वगैरेवर निष्ठा ठेवून होते, तर कम्युनिस्टांना वर्णसंघर्षापेक्षा वर्गसंघर्ष महत्त्वाचा वाटत होता. आर्थिक समानता आली, की जाती नष्ट होतील या सिद्धांतावर ते ठाम होते.

साहित्य चळवळीतले जन्माने दलित तरुण या सर्व विचारधारांशी परिचित असले, काही त्यात कार्यरत असले, तरी त्यांचा मूळ वैचारिक पिंड हा आंबेडकरवादावर पोसलेला होता. त्यामुळे त्यांच्यात अस्वस्थता होती. खरे तर रिपब्लिकन पक्ष व नेतृत्व सक्षम असते, तर बरेच प्रश्न सुटले असते; पण या साहित्यिक तरुणांचा राग आंबेडकरी राजकीय नेतृत्वावरही तीव्र होता.

**सत्ताधाऱ्यांसह सर्वांचेच धाबे दणाणले!**

या अस्वस्थतेत एक ठिणगी पडली ती ७२ साली संसदेत मांडण्यात आलेल्या पेरूमल कमिटीच्या अहवालात ४५ ते ७० या तीन दशकांत देशभर दलितांवर झालेल्या अत्याचारांची जी आकडेवारी दिली

होती, ती पाहून सत्ताधाऱ्यांसह सर्वांचेच धाबे दणाणले. विरोधी पक्षांसह साठोत्तरी सर्व चळवळींनी या अत्याचारांवर विविध मार्गांनी प्रतिक्रिया द्यायला सुरुवात केली. देशभरातील दलित अत्याचारांच्या आकडेवारीत अर्थातच महाराष्ट्रातीलही आकडेवारी होती.

या आकडेवारीने अस्वस्थ साठोत्तरी साहित्य चळवळीतले राजा ढाले, ज.वि. पवार, दया पवार, अर्जुन डांगळे, प्रल्हाद चेंदवणकर, उमाकांत रणधीर, लतीफ खाटीक, असे जन्माने दलित तरुण जे आपापल्या गावाकडून शिक्षण व नोकरीसाठी मुंबई महानगरात स्थलांतरित झाले होते, त्यांना गावगाड्यातील जगणे आठवले आणि आता शब्दांचीच शस्त्रे नाहीत, तर खरी शस्त्रे घेऊन मैदानात उतरावे, अशा निर्णयाप्रत आले.

या आक्रमक प्रतिक्रियेला कदाचित त्यावेळी मुंबईत बाळ ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना ही संघटना मराठी माणसांच्या न्याय्य हक्कांसाठी रस्त्यावर उतरून राडेबाज पद्धतीने सक्रिय होती, ज्यात मराठी म्हणून अनेक बौद्ध तरुणांसह हिंदू मागास व बहुजन जातींतील तरुणांचा सहभाग होता. ठाकरेशैली ही फॅसिस्टांच्या जवळ जाणारी. सत्ताधारी काँग्रेसने तिला कम्युनिस्टांविरोधात वापरून एकेकाळचा लाल गिरणगाव भगवा करून टाकला!

**या सर्व बाबी रक्त तापवणाऱ्याच...**

सेनेच्या राडेबाजीच्या कारणांपेक्षा दलित तरुणांना प्रक्षुब्ध करणारी कारणे अधिक संयुक्तिक होती. कारण मराठी माणसांना नोकऱ्यांत स्थान न मिळणे यापेक्षा गावगाड्यातला दलितांवरला सामूहिक बहिष्कार, वस्त्या पेटवणे, स्त्रियांवर बलात्कार, नग्नधिंड, दलित पाणवठ्यावर मानवी विष्ठा टाकणे, अशा अमानवी, संविधान व भारतीय दंड संहितेखाली गुन्हे नोंद व्हावीत, अशा घटना होऊनही पोलीस यंत्रणा सवर्णांना पाठीशी घालून दलित वस्त्यांनाच कायद्याचा बडगा दाखवीत होती. या सर्व बाबी रक्त तापवणाऱ्याच होत्या. तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सुरुवातीपासूनच्या सर्व लढ्यांचा इतिहास हा अहिंसक, सनदशीर आणि समतेचा हात पुढे करणाराच होता. तोच आदर्श या तरुण पिढीतही होता. त्यामुळे थेट अरे ला कारे करण्याची काही गटांची खुमखुमी चर्चेअंती शांत करण्यात आली. त्यात आणखी एका दूरगामी परिणामाचा विचारही होता; तो असा एखाद्या ठिकाणी हल्ला करता येईल; पण हल्ला करून निघून गेल्यावर तिथल्या स्थानिक दलित वस्तीला गावकऱ्यांनी हररोज लक्ष्य केले असते; पण या मंथनातूच आता गप्प बसायचे नाही. हल्ला करायचा नाही; पण जाब विचारायचा, पोलिसांना कार्यवाही करायला लावायची, गुन्हे नोंद करायला लावायची व विधिमंडळासह सरकारवरही दबाव आणायचा. त्यासाठी समविचारी पक्ष, संघटना यांचीही मदत घ्यायची; पण नेतृत्व आपण करायचे.

याच विचाराने मुंबईत राजा ढाले यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील वडाळा येथील सिद्धार्थ विहार हॉस्टेलमधून युवक आघाडी कार्यरत होती. याच काळात पुण्यासह सर्व महाराष्ट्रात मुख्यत: समाजवादी विचारांच्या तरुणांनी युवक क्रांती दल (युक्रांद) स्थापन केले होते व तेही सर्व प्रकारच्या विषमतेविरोधात लढत होते, संघटन करत होते.

पेरूमल अहवालानंतर काहीच दिवसांनी पुणे जिल्ह्यातील बावडा या गावी सवर्णांनी अस्पृश्यांवर बहिष्कार घातला, तर परभणीतील ब्राह्मणगावात सवर्णांच्या विहिरीवर दोन बौद्ध स्त्रियांनी पाणी पिऊन ती बाटवली म्हणून त्या दोघींना नग्न करून बाभळीचे फटके देत त्यांची गावभर धिंड काढली.

## बहुधा त्यांचे मेंदूही व्हाइटवॉश केले गेले होते

आजवर बेदखल झालेल्या घटनांची नोंद दलित तरुण घेऊ लागला. तो आता प्रतिकार करू लागला. घटनास्थळी धाऊन जाऊ लागला, पोलिसांना गुन्हे नोंदवून घ्यायला लावू लागला, तसाच गाव, जिल्हा प्रशासन, पोलीस ते थेट मंत्रालयावर धडकू लागला. निवेदनांचा पाऊस पाडू लागला. सत्ताधाऱ्यांविरुद्ध 'जबाब दे' आंदोलन करू लागला. संविधान, कायद्याचा कीस पाडत खटले लढू लागला. आता चपलेने विंचू मारावा तसा दलित मरणार नाही, अशा आत्मसन्मानाने प्रेरित होऊन तो अन्यायाविरोधात उभा राहिला. आता त्याला संघटनेची गरज भासू लागली. कारण प्रस्थापित रिपब्लिकन पुढाऱ्यांवर त्यांचा विश्वास नाही, तर रागच होता. कारण त्यातले अनेक काँग्रेसवासी होऊन टोपीपासून बुटापर्यंत पांढरेधोप तर झालेच होते; पण बहुधा त्यांचे मेंदूही व्हाइटवॉश केले गेले होते. साहित्य चळवळीतील दलित तरुण या अत्याचाराबद्दल संवेदना दाखवायचे, प्रसंगी मोर्चात यायचे; पण काही जण सरकारी नोकरीमुळे थेट सहभाग टाळत होते, तर बाबूराव बागूलांसारख्यांना या तरुणांची शासन असमर्थ ठरले, तर आम्ही कायदा हातात घेऊ, ही भूमिका भाषेसहितच नापसंत पडली व ते या सर्व कृतींपासून लांब राहिले.

**इथूनच सुरू होते दलित पँथरच्या जन्माची कहाणी!**

जगप्रसिद्ध राशोमान चित्रपटाच्या कथेसारखी दलित पँथरच्या जन्माची व निर्वाणाची कहाणी अनेक जण अनेक प्रकारे कथन करताहेत.

जुलै ७२ हे दलित पँथरचे जन्मसाल बहुतेक मान्य करतात; पण तारखेवर वाद आहेत! ठिकाणावर वाद आहेत. नामकरणावर वाद आहेत. संस्थापकांसह सदस्यांवर वाद आहेत. धोरणे, कार्यक्रम आंदोलने यावर वाद आहेत. पँथर बरखास्तीवरून वाद आहेत. पँथरच्या पुनरुज्जीवनावरून वाद आहेत. व्यक्तींवरून वाद, त्यांच्या लिखित, मौखिक वक्तव्यावरून वाद आहेत. श्रेय, अपश्रेयाचे वाद आहेत. ऐतिहासिक नोंदीवरून वाद आहेत. दलित पँथर नावाची संघटना जी जन्माला आली होती ती काही काळ महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनात कार्यरत होती, हे सर्वच मान्य करतात. हे मान्य करताना तिचे पितृत्व हक्काने सांगणारे दुसऱ्याचे पितृत्व मात्र नाकारतात! मात्र, याच दलित पँथरचा शेवट कसा झाला याच्याही कथा, दंतकथा आहेत आणि त्याचे अपश्रेय मात्र पितृत्व स्वीकारणारे हिरीरीने दुसऱ्याच्या गळ्यात मारतात!

संपूर्ण भारतात दलित पँथर ही एकमेव संघटना अशी असावी जिच्या स्थापनेबाबत, संस्थापक, संस्थापक सदस्य, तिचा कार्यकाळ,



**एका समारंभ प्रसंगी शिवसेनाप्रमुख बाळ ठाकरे व नामदेव ढसाळ.**

या काळातील संघटनेचे धोरण, अंतर्गत विरोध, घटना, संघटनेचे कार्यक्रम, त्यातला इतरांचा सहभाग व इतर संघटनांच्या कार्यात पँथरचा सहभाग याबाबत या संघटनेच्या इतिहासकारात, भाष्यकारात, दस्तऐवजीकरणाऱ्यांतच इतके मतभेद, मतमतांतरे आहेत, की खरे काय, खोटे काय, तपासायला काही वावच नाही. कारण हा इतिहास, आठवणी, दस्तऐवज हे सर्व पँथरमध्ये सक्रिय असलेले व संस्थापक असल्यापासून इतर सर्व गोष्टींवर दावा सांगणाऱ्या नेतेमंडळींनीच हा इतिहास लिहिलाय! (शरणकुमार लिंबाळे, लता मुरूगकर, असे काही अपवाद) त्यामुळे तटस्थ, वस्तुनिष्ठ मांडणीऐवजी भला इसकी कमीज मेरे से ज्यादा सफेद कैसी? हे विचारण्यात वा मेरी कमीज कैसे असली सफेद! हे सांगण्यातच या सर्व पुस्तके, पुस्तिकांची पाने खर्ची पडली आहेत. त्यामुळेच या लेखाच्या उपशीर्षकात 'स्थापनेची तीन, तर वर्षे फुटीची सत्तेचाळीस वर्षे' असे जे लिहिलेय ते त्यासाठीच!

दलित पँथरची स्थापना ७२ सालातली आणि या संघटनेचे संस्थापक नसलेले; पण या संघटनेचे सर्वांत लोकप्रिय व संघटनेचा चेहरा बनलेले राजा ढाले यांनी स्वत:च दलित पँथर मार्च ७७ मध्ये बरखास्त करून मास मुव्हमेंट नावाची नवी संघटना पँथर्ससोबत सुरू केली! ७२ ते ७७ हा म्हटला तर सहा वर्षांचा काळ; पण ७५ च्या आणीबाणीचे १९ महिने वजा केले, तर जेमतेम अडीच वर्षेच पँथर कार्यरत राहिली! पण या अडीच वर्षांवर आज पन्नास वर्षांनंतरही चर्चा, वाद, आरोप, प्रत्यारोप चालूच आहेत!

**ढसाळांनी अखेरच्या श्वासापर्यंत**
**दलित पँथर जिवंत ठेवली**

राजा ढालेंइतकेच आणि पँथरचे संस्थापक असलेले कवी, फर्डे वक्ते आणि आपल्या रंगढंगयुक्त जगण्याच्या पद्धतीमुळे लोकप्रिय ठरलेले राजा ढालेंना समांतर असे नेतृत्व पँथरमध्ये असलेले नामदेव ढसाळ यांनी मात्र ढालेंच्या पँथर बरखास्तीला अजिबात दाद न देता दलित पँथर जिवंत ठेवली ती २०१४ ला अखेरचा श्वास घेईपर्यंत!

वास्तविक राजा ढाले आणि नामदेव ढसाळ हेच पँथरचा एकत्रित चेहरा, पँथरचे बेसिक पिलर होते; पण दोघांच्या स्वभावदोषाने, वैचारिक अंतराने अगदी सुरुवातीपासूनच दोघांचे सूत काही संघटनेत जुळले नाही. त्यात नामदेवच रंगढंगीले जगणे राजा ढालेंना कधीच औत्सुक्य म्हणून पण रुचले नाही. या दोघांमधले वादविवाद, निर्णय प्रक्रियेमधील विसंवाद याची परिणीती म्हणजे राजा ढालेंनी पँथर बरखास्तीचा निर्णय.वास्तविक ते संस्थापक नव्हते, तरी त्यांनी पँथर बरखास्त केली. नामदेव ढसाळांनी ती चालूच ठेवली.

यातला वेदनादायी भाग असा, की संघटनेतील मतभेद, फूट याचा राग, नाराजी राजा ढाले यांनी वैयक्तिक आयुष्यातही कायम ठेवली. ते स्वत: लिटिल मॅगझीनच्या चळवळीतून दलित साहित्य व नंतर दलित पँथरमध्ये आले; पण ते ढसाळांना कवीच मानत नसत! आणि हा राग त्यांनी नामदेव ढसाळांच्या मृत्यूनंतर दादरपासून जवळ विक्रोळी येथे राहत असून ना ते अंत्यदर्शनाला आले, ना अंत्ययात्रेला! २०१९ मध्ये राजा ढालेंचे निधन झाले. ७७ पासून ते सार्वजनिक जीवनात आत-बाहेर करत राहिले; पण स्वभावामुळे कुठेच स्थिरावले नाहीत. शेवटची काही वर्षे तर ते जवळपास मौनातच गेले होते. काय आणि किती आपल्या छातीत, मनात ठेवून ते गेले असतील? ढसाळांनी किमान मृत्युशय्येवर असताना पँथरचा इतिहास लिहिण्याचा क्षीणसा प्रयत्न केला तरी.ढाले ७७ नंतर दलित पँथरवर एक शब्द बोलले नाहीत. मात्र, एक आश्चर्यकारक शेरेबाजी त्यांनी त्यांच्या एका हिंदी पत्रकाराला दिलेल्या मुलाखतीत केलीय, जी यूट्यूबवर पाहता येईल. त्यात त्यांना दलित पँथर या नावाविषयी विचारले असता ते जोरात हसले व पत्रकाराच्या खांद्यावर थोपटत म्हणालेत, की अरे वो जवानी का जोश था... पँथर मतलब चिता... ऐसे जानवर का नाम कोई देता है क्या संघटन को. (शब्द हेच नसतील; पण आशय हाच.)

याच ढालेंनी दलित पँथर या नावाबद्दल स्वत:च लिहिलेल्या पुस्तिकेत ते लिहितात, ६० च्या दशकात मी टाइम साप्ताहिक वाचायचो. ज्यातून मला ब्लॅक पँथरची माहिती झाली. त्यावर मी मराठीत लिहिले. म.भि. चिटणीसांनीही ब्लॅक पँथरसारखी संघटना इथे हवी असे म्हटले. मग मी त्यावर भाषणेही केली नामदेव व ज.वि. पवार यांच्या सांगण्यावरून. त्यातूनच पुढे दलित पँथर हे नाव संघटनेला दिलं गेलं. अशा प्रकारे राजा ढाले यांनी स्वत:च स्वत:चा इतिहास पुसण्याचा प्रयत्न का केला कळत नाही.




**पँथरचे कार्यकर्ते**

पुढे ७७ नंतर प्रा. अरुण कांबळे व रामदास आठवले यांनी दलित पँथरचे पुनरुज्जीवन करून अखिल भारतीय दलित पँथर स्थापन केली. ज्यांनी जवळपास २० वर्षे मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा लढा लढवला, ज्यात दलितांसह समाजवादी, कम्युनिस्ट, स्त्रि संघटना, भटके विमुक्त यांसह भाजपही होता! पुढे नामांतर झाले. रिपब्लिकन ऐक्य झाले आणि फुटलेही. रामदास आठवले काँग्रेसप्रणीत आघाडीत राज्यात मंत्री व राज्यसभेत खासदार झाले. केंद्रात मंत्रिपद काँग्रेस आघाडीने दिले नाही म्हणून ते भाजपप्रणित आघाडीत जाऊन आज केंद्रात मंत्री आहेत!

लेखाच्या सुरुवातीला साठोत्तरी युगाचा जागतिक इतिहास लिहिला तो मुद्दामच.कारण त्या साठोत्तरी पिढीने जगभर साहित्य, चित्र, नृत्य, नाट्य, संगीत, चित्रपट यावर स्वत:ची अशी मुद्रा उमटवली. भारतात प्रायोगिक नाटक, चित्रपट तयार झाले, दलित रंगभूमी, दलित साहित्य लिहिले गेले. देशीवादाच्या चर्चा झडल्या व सदाशिवपेठी साहित्य बेदखल झाले.

**शिवसेनेला अंगावर घेत सेनाभवनाजवळच गीतादहन**

दलित पँथर याच काळाचे अपत्य होते. त्याला जन्माला घालणारे जे पँथर्स होते त्यांची आज आपण नावे जरी नुसती वाचली तरी किती जबरदस्त स्फोटकाचा साठा होता, याच्या नुसत्या जाणिवेने अंगावर काटा येतो. राजा ढाले, नामदेव ढसाळ, अर्जुन डांगळे, ज.वि. पवार, भाई संगारे, अविनाश महातेकर, उमाकांत रणधीर, प्रल्हाद चेंदवणकर, दया पवार, अरुण कांबळे, रामदास आठवले, जयदेव गायकवाड, एल.डी. भोसले, लतीफ खाटीक, प्रीतमकुमार शेगावकर, गंगाधर गाडे, मल्लिका अमरशेख, कमलेश यादव, ही यादी अशीच पेटत्या वणव्यासारखी मोठी आहे. काय नव्हते या संघटनेकडे? जगाचे लक्ष लागले होते; पण हे आपसातच इतके भांडत राहिले, की जेमतेम अडीच वर्षे ही संघटना टिकली. त्यात तीन मोठे मोर्चे, वरळीची पोटनिवडणूक व त्यानंतरची दंगल, १० जानेवारीचा वरळी दंगलीबाबतचा मोर्चा त्यात शहीद झालेला भागवत जाधव. त्याआधी नामदेव ढसाळांचा पहिलाच गाजलेला कवितासंग्रह 'गोलपिठा' आणि स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवानिमित्त पुण्याच्या साधना साप्ताहिकातला राजा ढालेंचा 'काळा स्वातंत्र्य दिन' हा लेख, त्या लेखातले तिरंग्यावरचे भाष्य, त्यावरून उठलेले वादळ, साधनेवरच्या विरोधकांच्या मोर्चाला पँथरचे पहिल्याच मोर्चाने उत्तर, त्यातूनच नामदेवची अटक, नामदेवने काळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर लाल रंगात दलित पँथर रंगविणे. जाहीर सभाही दोन-तीनच झाल्या. वस्तींपातळीवर मात्र शेकड्यांनी सभा झाल्या. महाराष्ट्रभर छावण्या उभ्या राहिल्या. छोट्या सभांतून हिंदू धर्म, देव देवतांची चिकित्सा, टिंगलटवाळी, प्रसंगी शिवराळ शेरेबाजी यातून शिवसेनेला अंगावर घेत सेनाभवनाजवळच गीतादहन केले राजा ढालेंनी!


या प्रवासात सर्व जवळ येण्याऐवजी लांब गेले. नामदेवची प्रजा समाजवादी पक्षाची पार्श्वभूमी, सुनील दिघे, अनिल बर्वेसारखे कम्युनिस्ट मित्र यामुळे राजा ढालेंनी त्याला कम्युनिस्ट नक्षलींचा हस्तक ठरवणे, तर राजा ढालेंच्या 'सारा भारत बौद्धमय करेन' या घोषणेने आपण सर्वहारा लुंपेन यांची एकजूट करू शकणार नाही, हे नामदेवचे म्हणणे, यातून संघटनेतच ढाले-ढसाळ असे दोन गट पडले. ढसाळ गटाने पुणे गाठले, तर ढाले गटाने नागपूर गाठत थेट संघटनाच बरखास्त केली! संपले! तपशिलात देता येतील असे त्या अडीच वर्षातले छोटे-मोठे जय आहेत; पण त्यातही वाद आहेत. जन्मापासून बरखास्तीपर्यंत वाद हा या संघटनेला सयामीजुळ्यासारखा चिकटला होता, तो आज वेगळे होऊन मृत झाल्यावरही चालूच आहे! दलित पँथरचा इतिहास लिहिताना वा पन्नाशीवर लिहिताना धगधगती अडीच वर्षे व त्यातील काही लक्षणीय आंदोलने सोडली, तर हाती येतात ती आरोप-प्रत्यारोपाची ४७ वर्षे! आता ५० वर्षांनंतर तरी कुणी संशोधकीय शिस्तीने, तटस्थपणे व्यक्तींपलीकडे जाऊन संघटना म्हणून जे काही निखारे राखेत गाडले गेलेत त्यांना हवा देता येईल? पुढचा अग्निकल्लोळ निदान स्वप्नात तरी पाहता येईल!

●●●


**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**



कर्मवीर दादाराव गायकवाड




बी.सी. कांबळे



राजाभाऊ खोब्रागडे




रा.सु. गवई




पा.न. राजभोज


**पहिल्या पिढीपासून सुरू झालेली फुटीची परंपरा**




नामदेव ढसाळ



राजा ढाले



ज.वि. पवार



अर्जुन डांगळे

**दुसऱ्या पिढीनेही ठेवली कायम**

# चिनी कम पत्ती जादा

**भारतीय दलितांच्या जीवनात प्रकट झालेली आणि ज्वालामुखीप्रमाणे भडकलेली पँथर एक ऐतिहासिक घटना आहे. या घटनेने दलितांना आत्मसन्मानासाठी पडेल त्या लढाया करायला शिकवले. जनतेत ऐक्य आणि धग निर्माण करू पाहणाऱ्या नेत्यांमध्येच बेकी झाली आणि चित्ता मवाळ, निष्प्रभ झाला. लोक अजूनही या तेजस्वी घटनेचे स्मरण करत असतात. त्यालाही आता पन्नास वर्षे होत आहेत. या स्मरण साखळीतून नवे काही उगवेल का, हा प्रश्नही जागवला जावा.**



**उत्तम कांबळे**

का महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रातील एक महत्त्वाचे बंड म्हणजे दलित पँथरची स्थापना होय. समाजजीवनाला हादरवून सोडणारी आणि नवे काही घडू शकते आहे, घडते आहे असा संदेश देऊ पाहणारी, संसद आणि संसदबाह्य लढायांना मोठं टॉनिक देऊ पाहणारी पँथर स्वतः मात्र अल्पकाळच जगली. अडीच-तीन वर्षेच. या काळात तिने फाटक्या-तुटक्या माणसाला रस्त्यावर येऊन लढायला शिकवले. अन्यायाला प्रतिकार करायला शिकवले, आत्मसन्मान मुठीत घेऊन फिरायला शिकवले, राजकारणातील तत्कालिन मावळत्या आणि गंज चढलेल्या दलित राजकारण्यांना घरी बसवले, नवा सूर्य येतोय असा एल्गार पुकारला. साहित्यात विद्रोह पेरला. साहित्याची परिभाषा बदलली. संस्कृतीला म्हणजे विषमताच बाळंत होणाऱ्या संस्कृतिला भरचौकात विवस्त्र केले. एक मोठा विद्रोह म्हणजे पँथर! एका हातात लेखणी आणि दुसऱ्या हातात आंदोलनाची आयुधे घेऊन

पँथर रस्त्यावर उतरली. मी मी म्हणणाऱ्यांना तिने भूरळ घातली आणि व्यवस्थेतील सत्तेच्या दलालांना धडकी भरवली. अजून काही तरी होईल, निळी पहाट जन्मास येईल, अशी स्वप्ने सामान्य माणसाला पडू लागली. डोळ्या समोरची स्वप्ने गडद होण्याच्या क्षणालाच पँथरला तडे गेले. फुटीचा रोग जो डॉ. बाबासाहेबांच्या नंतरच्या आरपीआय राजकारणाला लागला होता, त्याचा संसर्ग पँथरलाही झाला. एका पाठोपाठ एक फुटी पडत गेल्या. एकाचे दोन, दोन आणि दोनाचे चार असे अनेक तुकड्यांत ती विभागली. प्रत्येक तुकडा स्वतःलाच पँथरचा जन्मदाता समजू लागला आणि दुसऱ्याला खोडू लागला. या खोडाखोडीने फुटीचे राजकारणच शिल्लक राहिले. मूळ पँथरमधील धगधगता विस्तव हळूहळू राखेचे रूप घेऊ लागला. आता या राखेचे विस्तवात रूपांतर व्हावे असे सर्वांनाच वाटते; पण वाटण्याचा उपयोग काय? स्वप्न आणि वास्तव यात फुटीचे काटेरी राजकारण, परस्परांना संपवू पाहणारा अहंकार आणि चतकोरभर सत्तेसाठी कुणाचीही गुलामी पत्करण्यास तयार असणारा काही घटक उभा आहे. चिनी भिंतीप्रमाणे हे सारे उभे आहे. आता भिंत हलवण्याची जोखीम नवी पिढी घेणार काय, या प्रश्नाभोवती घोडे अडले आहे. शेपूट पिरगळल्यावर बैल हलतो; पण घोड्याचे काय करायचे? पँथरच्या स्थापनेत विद्रोहाची उर्मी प्रचंड होती; पण या विद्रोहाला पुढे चळवळीचे रूप देण्यासाठी आवश्यक ऐक्य नव्हते. नेत्यांचा परस्परांवर विश्वास नव्हता. कोण मोठा, कोण छोटा, अशा भावना होत्या.

पँथरच्या स्थापनेपासूनच हे सारे सुरू होते. कुणाचा चेहरा लाल म्हणजे कोण लाल भाई? (लालभाई हा शब्द दादासाहेब गायकवाड यांना उद्देशून खूप पूर्वी वापरला गेला होता आणि वामनदादांनी आपल्या एका गीतात तसा उल्लेख केला होता. कारण त्यांनीही गटबदल केला होता. डाव्यांबरोबर सहकार्य करणाऱ्या दादासाहेबांना उद्देशूनच त्यांनी, म्हातारपणी नार फसली लालजीच्या घरात घुसली, असे लिहिले होते.) कोण निळाभाई, कोण खादीभाई याचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू झाला. निळ्या रंगाच्या भोवती कसलीच सावली येणार नाही याची काळजी घेणारा गट, याउलट साम्यवादाने जग बदलून टाकलंय याची खात्री सांगत, एकाच वेळी जय भीम आणि लाल सलाम म्हणण्याचा प्रयत्न करणारा एक गट, समाजवाद्यांच्या छावणीत घुसून सदाशिव पेठेशी नाते सांगत, मी सर्वांचाच आहे असे सांगणारा एक गट आणि इतरही काही गट यांच्या संघर्ष धुमसू लागला. परिणाम ऐक्याचा, एकात्मतेचा, परस्परांना समजून घेण्याचा आणि आदराचा गोडवा म्हणजेच चिनी, म्हणजेच साखर कमी होऊ लागली आणि अंतर्गत मतभेदाची, कडवट वादाची चहापूड म्हणजे पत्ती वाढत गेली. परिणाम या पत्तीने सतत आपलाच प्रभाव दाखवला. मलबाऱ्यांच्या हॉटेलात जा, वसतिगृहातील कॅन्टिनमध्ये जा किंवा अन्य कोठेही जा, चहातील पत्ती प्रभावी ठरत होती. तिने असे काही केले, की पँथर दुभंगली, दुभंगत राहिली आणि या दुभंगल्या आठवणींनी पन्नाशीत प्रवेश केला.

पँथरच्या जन्मापूर्वी काय घडत होते. विशेषतः एकूण समाज आणि दलित राजकारणात काय घडत होते, हे पाहिल्याशिवाय पँथरच्या जन्मकळा आणि त्यातून अवकाश मिठीत घेणारा विद्रोह कसा बाहेर पडला, हे नीट समजणार नाही. डॉ. बाबासोहेब आंबेडकर यांनी आपल्या महापरिनिर्वाणाच्या तीस-पस्तीस दिवस अगोदर म्हणजेच २० ऑक्टोबर १९५६ ला दिल्लीतल्या आपल्या निवासस्थानी एक बैठक होऊन शेकाफे (शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन) बरखास्त करून आरपीआय स्थापन करण्याची चर्चा केली होती. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर प्रबुद्ध भारताच्या १ ऑक्टोबर १९५७ च्या अंकात आरपीआयच्या स्थापनेबाबत, त्याच्या भूमिकेबाबत बाबासाहेबांनी लिहिलेले सुमारे २१ कलमी खुले पत्र प्रसिद्ध करण्यात आले. या पत्राचा अनुवाद दादासाहेब रूपवते यांनी केला होता. ते कार्यकारी संपादक होते. पुढे असे पत्र अनुवादित करणारे रूपवतेच काँग्रेसमध्ये जाऊन राज्य मंत्री झाले. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर २५ दिवसांनी दलित नेत्यांची एक बैठक नगरमध्ये झाली आणि त्यात पक्षाचा नेता कोण व्हावा, याविषयी एकमत न झाल्याने अध्यक्षीय मंडळ नेमण्यात आले. म्हणजे मंडळातील प्रत्येक जण अध्यक्ष होता. असाच प्रयोग पुढे काही वर्षांनी अल्पकाळ टिकलेल्या दलित ऐक्याच्या वेळीही झाला होता, हे सर्वश्रूत आहे. ३ ऑक्टोबर १९५७ ला म्हणजे बाबासाहेबांच्या नंतर सुमारे एक वर्षांनी आरपीआयची अधिकृत घोषणा झाली आणि एन. शिवराज अध्यक्ष झाले. अपवाद वगळता अन्य कोणी दलित समाजातील या पक्षात महत्त्वाच्या पदावर नव्हते. याचा अर्थ बाबासाहेबांच्या स्वप्नातील, त्यांच्या खुल्या पत्रातील पक्ष अस्तित्वात आला नव्हता. आरपीआयविषयी बाबासाहेबांनी ज्या अनेक व्यक्ती आणि गटांशी चर्चा केली होती, त्यांचे प्रतिनिधी कोणी नव्हते. १९५७ ते १९५९ मध्ये आरपीआयने अनेक आंदोलने केली. दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली भूमिहिनांचे आंदोलन झाले होते. याच दरम्यान दादासाहेब व डावे यांची सलगी बी.सी. कांबळे यांना आवडली नाही. दीक्षाभूमी ठरलेल्या नागपूरमध्ये १४ मे १९५९ ला त्यांनी आरपीआयमधून बाहेर पडून दुरूस्त गट स्थापन केला आणि मूळ म्हणजे शिवराज यांच्या अध्यक्षतेखालील पक्षाला नादुरूस्त गट ठरवले. पुढे धोतरे आणि पॅन्ट-टायवाले अशा उपाध्याही दोन्ही गटांना देण्यात आल्या. १९६२ च्या २८ ऑक्टोबरमध्ये आर.डी. भंडारे यांनी स्वतःचा गट काढला. १९६७ ला दादासाहेबांनी काँग्रेसशी युती केली. 'बाबासाहेब तुमची लेकरे काँग्रेसच्या वळचणीला नेणार नाही', असे उद्गार त्यांनी पूर्वी काढले होते. इतिहासात काही गोष्टींची पुनरावृत्ती होते. इथेही अशी झालीच. दादासाहेबांना बी.सी. कांबळे यांनी तर पँथरचे एक संस्थापक नामदेव ढसाळ यांना राजा ढाले यांनी कम्युनिस्ट ठरवले होते. मुळात ढसाळ साम्यवादीप्रेमी होते हा भाग वेगळा. गवई आणि खोब्रागडे यांच्यातील अंतर वाढत गेल्याने या दोघांनीही नागपूरमध्ये अधिवेशन घेऊन आपापले गट काढले, ते शेवटपर्यंत टिकवले. दादासाहेब आणि काँग्रेसच्या युतीचा परिणाम म्हणून किंवा बक्षिस म्हणून गवई आणि खोब्रागडे अनुक्रमे विधान परिषद आणि राज्यसभेत उपसभापती झाले होते. पुढे गवई आणि शांताबाई दाणी यांच्यातही वाद झाला. शातांबाईंनी दादासाहेबांच्या नावाने गट काढला. दादासाहेबांच्या पत्नी गीताबाईंनीही आपल्या पतीच्या नावाने गट काढला. अजूनही वेगवेगळ्या प्रदेशात गट निघत गेले. निपाणी भागात दत्ता कट्टींचा गट निघाला. मराठवाडा आणि विदर्भात आणखी काही गट निघाले. काही डाव्यांशी, काही




**नामदेव ढसाळ यांच्या निवडणूक प्रचार सभेतील छायाचित्र**

काँग्रेसशी, काही समाजवाद्यांशी जोडून घेत होते. विशेष म्हणजे, मुंबई महापालिकेत ९ मार्च १९७३ ला शिवसेनेशी आरपीआयने युती केली त्यात आरपीआयचा सपशेल पराभव झाला. युती तुटली. काही जण जनता पक्षात गेले. असे करत करत आरपीआय म्हणजे त्याचे तुकडे इतके क्षीण होत गेले, की १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना फक्त एक जागा मिळाली. एवढे असूनही वेगवेगळ्या पक्षांशी आणि त्यातही काँग्रेसशी युती करणाऱ्या गटा-तटांची संख्या काही कमी होत नव्हती. दलितांच्या राजकीय शक्तीचा क्षय होत होता. पुढे दलित पँथरची स्थापना करणारे सर्व नेते या काळात तरूण होते. त्यांना राजकारण आणि समाजाचे भान आले होते; पण ते प्रत्यक्ष काही करू शकत नव्हते.

डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली लाखो दलितांनी त्यातही पूर्वीच्या महार समाजाने मोठ्या प्रमाणात धर्मांतर केले. धर्मांतरामुळे त्यांच्या कपाळावरील अस्पृश्यतेचा कलंक पुसला गेला. अस्पृश्यता हा आमच्या आत्म्यावरील कलंक आहे, असे बाबासाहेब म्हणत होते. अस्पृश्यांना धर्मांतरामुळे मोठा आत्मसन्मान मिळाला. त्यांनी बलुतेदारी पूर्ण फेकून दिली. हिंदू देवदेवता फेकून दिल्या. धम्माचे गोड, ऊर्जावर्धक वारे प्यालेला समाज आता स्वतःची वेगळी ओळख सांगू लागला. त्याने गावकी नाकारल्याचा, तो स्वाभिमानी झाल्याचा, स्वावलंबी होण्याच्या त्यांच्या प्रक्रियेचा गावगाड्यातील सर्वच सवर्णांना राग येऊ लागला. ते त्याचा द्वेष करू लागले. त्यातून गावोगाव नवबुद्धांवर हल्ले सुरू झाले. या हल्ल्याचे स्वरूप भीषण, हिंसक होते. घरे जाळणे, खून करणे, सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्यास बंदी करणे, पाण्यात विष्ठा टाकणे, महिलांवर बलात्कार करणे, बहिष्कृत करणे आदी अनेक मार्गांनी त्यांची कोंडी केली जात होती. रोज अशा घटना घडत होत्या आणि त्यांना प्रतिकार करणाऱ्या राजकीय शक्तींचे विभाजन झाले होते. अनेकदा खेड्यापाड्यातील लोकांच्या मनात एकाकीपणाची भावना तयार होती. युती करून मिळवलेल्या सत्तेचाही फार उपयोग होत नव्हता. कायदा, घटना, सवलती वगैरे गोष्टी जणू काही मूक बनल्या होत्या. विद्यापीठ नामांतराच्या विषयाने केवळ मराठवाड्यातच नव्हे, तर महाराष्ट्रभर दलितांवर हल्ले झाले, खून झाले. दलितांच्या मनात प्रचंड असुरक्षितता निर्माण झाली होती. राजकारणात त्यांचा आवाज नव्हता आणि समाजकारणातही तो क्षीण झाला होता. जो काही आवाज उठायचा तो तरूण मंडळींच्या साहित्यातून; पण या साहित्यिकांचेही मार्क्सवादी-आंबेडकरवादी, गांधीवादी, समाजवादी असे विभाजन झाले होते. कोणी तरी येईल आणि आपली असुरक्षितता संपवेल, कोणी तरी येईल आणि अन्यायाला वाचा फोडेल, कोणी तरी येईल आणि ठोशास ठोसा देईल अशा प्रकारच्या भावना सामान्य जनतेच्या मनात तयार होत होत्या. नव्यासाठी जणू काही एक पोकळीही तयार होत होती आणि ही पोकळी तरण्याबांड पोरांनी, लिहित्या वाचत्या पोरांनी, अन्यायाला-विषम व्यवस्थेला नकार देऊ पाहणाऱ्या काहींनी भरून काढली. त्यातून एक बंड बाहेर पडले. एक ज्वालामुखी बाहेर पडला, विद्रोहाचा धारदार डोंगर तयार झाला, त्याचे नाव दलित पँथर!

दलित पँथरने अल्पावधीतच विद्रोहाची धग महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभर पसरवली. पँथर असे नाव घेतल्याने जगातल्या अन्य पँथरमध्येही चर्चा सुरू झाली. अन्याय सहन करणार नाही, तर प्रतिकार करणार, तुमच्या परंपरा आणि कुणा वरिष्ठांची रखेल बनलेल्या किंवा बनवल्या गेलेल्या संस्कृत्यांना आम्ही धिक्कारणार, बेगडी असणारे तुमचे स्वातंत्र्य आम्ही नाकारणार, तुमची सदाशिवपेठी भाषा नाकारणार आणि विद्रोहाचे सुरूंग पोटात घेणारी भाषा तयार करणार, तुमच्या विषम संस्कृतीच्या गर्भाशयाची चिरफाड करणार, असा उद्रेक बाहेर पडायला सुरुवात झाली. खरे म्हणजे, या सर्व गोष्टींना तशी ठाम दिशा नव्हती. हे सारे कुणी आणि कोणती विचारधारा वापरून करायचे, यावरही लवकरच मतभेद सुरू झाले. कोणी कुणाला विचारून सभा घेतली, कोणत्या सभेला कोण गैरहजर राहिले, कोणी आपसात कोणावर आणि का टीका केली,

कोण कोणाच्या वळचणीला जातेय यावरही मतभेद सुरू झाले. मुख्य मुद्दा मार्क्स आणि आंबेडकरी विचारधारेचा होता. हे सर्व एकीकडे चालू असतानाच पँथरच्या जन्मामुळे हादरलेली राजकीय व्यवस्था आणि त्यातही शिवसेना काही स्वस्थ बसणार नव्हती किंवा बसलेली नव्हती. १९७३ मध्ये शिवशक्ती-भीमशक्तीचा केलेला प्रयोग मागे पडला होता. पुढे अशा प्रयोगाची घोषणा रामदास आठवले यांनी मुंबई विद्यापीठातल्या भाषणात केली होती. निळ्या पाखरांना पकडण्यासाठी, त्यांना गळाला लावण्यासाठी व्यवस्थेने नवनवे डावपेच रचलेलच होते. काही पाखरे फसतही होती. एकीकडे पँथरने रान पेटवले होते; पण दुसरीकडे काही धूर त्यांच्या ऐक्यातही धुसत होता. अहंकाराचा टकराव सुरू होता. सत्ता संघर्ष इथेही उसळलाच. १९७५ च्या आणीबाणीनंतर देशातील राजकारणही बदलले. बलवान बनलेल्या शिवसेनेकडे, काँग्रेसकडे, छुप्या पद्धतीने आणि नंतर उघडपणे आकर्षित होणारी काही निळी पाखरे तयार झाली. परस्परांना पँथरमधून काढून टाकण्याचे प्रयोग सुरू झाले. जसे जुन्या आरपीआयमध्ये सुरू झाले. तीन-चार वर्षांत असे चित्र तयार झाले, की क्रांतिकारी नाव धारण करणारी पँथर जेवढ्या मोठ्या प्रमाणात दुभंगली तेवढ्याच प्रमाणात त्यांची शक्ती कमी होत राहिली. राजकारणात तिने आपला ठसा उमटवला नाही. सातत्याने परस्परविरोधी संघर्षामुळे जनतेची विश्वासार्हता कमी होत गेली.




पँथर सोडून काहींनी आपल्या गटाच्या नावाने आरपीआय हा आणखी एक तुकडा जन्माला घातला. शिवसेना या हिंदुत्ववाद्यांबरोबर लढाया करत करत काही त्यांच्याशी तडजोड करून बसले. काही साहित्यिक त्यांच्या गळाला लागले. काहींनी स्वतःहून आपल्या जिभेत गळ खूपसून घेतला. केवळ नरेंद्र जाधवच नव्हे, तर अजून काही नावे सांगता येतील. ढसाळही त्यापैकी एक. आणखी गम्मत म्हणजे, हिंदुत्वाच्या कळपात खूप आधी गेलेले रामदास आणि अर्जूनही पँथरची पन्नाशी करण्यात आता पुढे आले आहेत. नामदेव ढसाळांच्या पँथरचाही दरवर्षी वर्धापन दिन व्हायचा. नामदेव, ज.वि., राज ढाले आणि अर्जून यांनी पँथरविषयी असं काही लिहून ठेवलंय, की मूळ अध्यक्ष कोण, याचे उत्तर कोणा शहाण्यालाही मिळू नये. पँथर अजून काही काळ एकत्रित आणि प्रभावीपणे तग धरून राहिली असती, तर दलितांचे राजकारण अजून काही तरी वेगळे दिसू शकले असते. खरे म्हणजे, आताही एक पोकळीच निर्माण झाली आहे; पण त्याच वेळी विश्वासाने खांदा टेकवावा अशी जनतेची ठिकाणे कमी होत आहेत. लोक विश्वासाच्याही शोधात आहेत.

'पँथरची पन्नाशी' हा तसा लोकांच्या आनंदाचा आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. या अल्प चळवळीत सामान्य कार्यकर्त्यांनी वर्णन करता येणार नाही इतका त्याग केला आहे. व्यवस्था, पोलिस आदींच्या छळाला अनेक कार्यकर्ते बळी पडले आहेत. पँथर म्हणजे जणू काही एक क्रांती आहे, या भावनेने कार्यकर्त्यांनी काम केले. गावोगावचे देव हद्दपार करण्यात, अन्याया विरोधात मोर्चे काढण्यात, लाठ्या-काठ्या खाण्यात आणि या सर्वांचे साहित्य करण्यात कार्यकर्ते आघाडीवर होते. संघटनेत फूट पडली; पण कार्यकर्त्यांनी संघर्षात फूट पडू दिली नाही. लढण्याची नवी धमक, नवी ऊर्जा घेऊन ते रस्त्यावर संघर्ष करत होते. शिवसेनेसारख्या बलाढ्य आणि सत्ताधाऱ्यांचा छुपा पाठिंबा असणाऱ्या संघटनेविरुद्ध पँथरच दोन हात करू शकली. हिंदुत्ववाद्यांविरुद्धची लढाई आणखी तीव्र करण्यासाठी नेते कार्यकर्त्यांना चेतवत होते. कार्यकर्ते पेटत होते. पुढे सत्तेलाही अधिक महत्त्व आले. सत्ता मिळवण्यासाठी, तिच्या सावलीत जाण्यासाठी आठवलेंनी काँग्रेस आघाडी ते भाजप युती, असा थेट प्रवास केला. ढसाळ, डांगळे शिवसेनेबरोबर, ढाले भारिप-बहुजन आघाडी बरोबर, अरूण कांबळे जनता दलाबरोबर, ज.वि. ही भारिप बरोबर गेले. जय भीमच्या घोषणा देत हे वेगवेगळ्या पक्षात गेले. पुढे आठवले, ढसाळ, डांगळे, अरूण यांनी स्वतःच्या वेगळ्या संघटना काढल्या. त्यांचे त्यांचे कार्यकर्ते त्यांच्या बरोबर गेले. पँथर ते भाजप-शिवसेना-काँग्रेस असा प्रवास करताना, नव्या अवतारात जाताना कार्यकर्त्यांना काय वाटेल किंवा वाटले असावे, याचा विचार कोणी केला असावा का? डरकाळी मारणारा चित्ता ते सुंदर, नाजूक पाकळ्यांचे कमळ या प्रवासाचे लोकांना काय वाटले असेल?

महाराष्ट्रातील आंबेडकरी जनता पन्नास वर्षे आपल्या मनात पँथरचे स्मरण जीवंत ठेऊन आहे ते एवढ्यासाठीच की जनतेला आशा आहे, की कुठून तरी निर्भेळपणे जय भीमचा घोष येईल... जेव्हा जनतेच्याच मनात अशी स्वप्ने उगवतात तेव्हाच काही तरी घडण्याची शक्यता असते. एका धगधगत्या घटनेचे सामान्य माणसाला अप्रूप आहे आणि ती दीर्घायुषी झाली नाही याचे दुःखही आहे. 'चिनी कम पत्ती जादा' असे घडायला नको होते. याच पार्श्वभूमीवर आता 'चिनी जादा आणि पत्ती कमी' असे काही तरी घडेल का, असा प्रश्न जनतेच्या ओठावर आहे. धर्म, सत्ता आणि भांडवलशाहीने पुन्हा एकदा आवळलेल्या मगरमिठीत घुसमटून जाणाऱ्या माणसाच्या ओठावर असा प्रश्न येणेही स्वाभाविक आहे. •••

**(लेखक अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष आणि सकाळ माध्यम समूहाचे माजी संचालक संपादक आहेत.)**

# पँथरने इंदिरा गांधींना रस्ता बदलायला लावला...

**१९७३-७४ च्या दरम्यानची गोष्ट आहे ही. पुणे विद्यापीठाने त्या वेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिराजी गांधी यांना डी.लिट. जाहीर केली होती. दीक्षांत समारंभ निश्चित झाला. डी.लिट. घेण्यासाठी श्रीमती गांधी पुण्यात येणार होत्या. त्यांच्या एकूण राजकारणाच्या विरुद्ध एकूण उजवे प्रतिगामी, तसेच तत्सम पुरोगामी डावे राजकीय पक्ष यांनी पुण्यात आघाडी करून इंदिराजींना कुठल्याच परिस्थितीमध्ये पुण्यात येऊ द्यायचे नाही, असे जाहीर केले होते. तो काळ जॉर्ज फर्नांडिसप्रणीत रेल्वेचा चक्का जाम करण्याचा होता. जिकडे-तिकडे विविध पक्ष-संघटनांच्या कामगार संघटना, संत्रस्त स्थितीत सरकारच्या विरुद्ध निदर्शने, घेराव, मोर्चे काढून केंद्र सरकारला लक्ष्य करीत होत्या. देशभर हेच सुरू होते. त्याचा परिणाम पुण्याच्या विरोधकांवरसुद्धा झाला. इंदिरा गांधींचा मार्ग रोखण्यासाठी कार्यकर्ते उत्सुक झाले होते.**



**नामदेव ढसाळ**

आम्ही दलित पँथरवाले, त्या निदर्शनांत-रास्ता रोकोत सामील होणार होतो. ''विरोधक इंदिराजी गांधींचा रस्ता रोखणार, अशी अडेलतट्टूपणाची भूमिका घेऊन बसले आहेत. त्यांना कुठल्याही परिस्थितीत डी.लिट. घेऊ द्यायची नाही, हा त्यांचा मनसुबा आहे. विरोधकांचा हा हेतू काँग्रेसवाल्यांनी सफल होऊ देता कामा नये, यासाठी महाराष्ट्रातील तमाम काँग्रेसजनांनी प्रतिआंदोलन करावे, विरोधकांचा बंदोबस्त करण्यासाठी महाराष्ट्रातील तमाम काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भरीव बांबू घेऊन यावे,'' अशी घोषणा त्या वेळचे काँग्रेस पक्षाचे प्रांतिक अध्यक्ष वसंतदादा पाटील यांनी केली होती. दादांची धमकी आम्हा पँथरवाल्यांना सहन झाली नाही. तेव्हा 'दै. मराठा'च्या कार्यालयात जाऊन आम्ही दादांविरुद्ध बातमी दिली.

इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान आहेत. त्यांच्या सत्ताराजकारणाविषयी, राजकीय कारकीर्दीविषयी प्रतिक्रिया देण्याचा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. हा अधिकार एखादा काँग्रेसी दादा हिरावून घेत असेल, तर दलित, कामगारवर्गाने या धमकीचा मुकाबला केला पाहिजे. दादांची दादागिरी अजिबात खपवून घेणार नाही, यासाठी पँथरच्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांनी इंदिराजी ज्यादिवशी पुण्यात येणार आहेत आणि काँग्रेस या निमित्ताने दादागिरी करणार आहे; ही दादागिरी हाणून पाडण्यासाठी महाराष्ट्रातील तमाम पँथर्सनी हॉकीस्टिक आणि भरीव बांबू घेऊन पुणे विद्यापीठाच्या मुख्य रस्त्यावर येऊन ज्या रस्त्यावरून इंदिराजी गांधी येतील तो त्यांचा रस्ता रोखण्याचे काम करावे, अशी बातमी आम्ही दिल्यामुळे काँग्रेसच्या गोटात खळबळ माजली. ही अशी घोषणा केल्यामुळे आमच्या पाठीशी पोलिसांचा ससेमिरा लागला.

शेवटी मी व भाई संगारे आदी त्या रास्ता रोकोच्या दिवसापर्यंत 'गायब' झालो. पोलीस, सीआयडी सारखे आमच्या घरी येत. कुठे आहे. अमुक कुठे आहेत, तमुक कुठे आहेत, अशा चौकशा करू लागले. आम्ही घरी सांगून ठेवले होते, की ते पुण्याला मिटिंग घेण्यासाठी गेलेले आहेत. तीन-चार दिवस ते काही इकडे-मुंबईला येणार नाहीत. पोलिसांचा खडा पहारा आमच्या घरादारावर लागला. विशेषतः माझी वस्ती जी अरब गल्लीच्या उत्तरेच्या टोकाला होती, तिथे आम्ही लपूनछपून जात होतो; पण पोलिसांना कळू शकत नव्हते. शेवटी कंटाळून पोलिसांचा होरा पुण्याच्या दिशेने आगेकूच करता झाला.

पुण्याच्या एल.आय.बी.ने आमच्या शाखा पिंजून काढल्या; पण आम्ही पुण्यात गेलोच नव्हतो, तर त्यांना मिळणे कसे शक्य होते? ज्यादिवशी निदर्शने, त्यादिवशी आम्ही मी, भाई संगारे, अविनाश महातेकर, मला वाटते ज.वि. पवारही (पँथर-संस्थापकांपैकी एक, माझा साथीदार) असावेत. आम्ही भल्या सकाळी साडेपाच-सहादरम्यान दादरला गेलो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजगृहाजवळील रस्त्यावर तिथे पुण्याच्या टॅक्सीवाल्यांनी नुकताच पुणे-मुंबई स्टॅण्ड टाकला होता. आम्ही लोक तिथे पोहोचून त्या भाडोत्री टॅक्सींनी जायचे ठरवले. साडेआठला आम्ही टॅक्सी बुक केली. आम्हा चौघांमुळे टॅक्सी फुल झाली. तेव्हा मुंबई-पुणे भाडे २५-३० रुपयांच्या आसपास प्रत्येकी असावे. आम्ही सतर्क होऊन



**दलित पँथरच्या सभेत बोलताना नामदेव ढसाळ**

टॅक्सीत बसलो. आमची कृती ही पोलिसांच्या सतर्कतेपलीकडची होती. आम्ही अशा पद्धतीने टॅक्सी करून पुण्यात जाऊ, हे त्यांच्या ध्यानीमनीही नव्हते. जुन्या बॉम्बे-पुणे रोडने भन्नाट टॅक्सी पुण्याच्या दिशेने धावू लागली. ठीक ११ ते ११.३० वाजेदरम्यान आम्ही खडकीत पोहोचलो. आम्हाला अंदाज घ्यायचा होता, पुण्याच्या पँथरने निदर्शनाच्या दृष्टीने काही तयारी केली आहे काय? म्हणून आम्ही टॅक्सीतून उतरून त्या वेळचे पुणे कॉर्पोरेशनचे नगरसेवक ठकसेन पाडळे यांच्या घरात जाऊ लागलो, तर बाहेरच्या पडवीत बसलेल्या पाडळेंची नजर आमच्यावर गेली आणि मग त्यांनी तेथूनच इशारा केला, की बाजूला लपा. आम्ही पडत्या फळाची आज्ञा मानून बाजूला झालो. तोच ठकसेन पाडळेंच्या घरातून आमच्या चौकशीसाठी आलेले पोलीस रागारागाने बाहेर पडून निघून गेले. कारण विद्यापीठासमोरील रस्त्यावर होणाऱ्या निदर्शनाची वेळ जवळजवळ येत चालली होती. पोलीस आल्या मार्गे परत निघून गेले. आम्ही घरात घुसलो. ठकसेन पाडळे यांनी आम्हाला सांगितले, ''अरे बाबांनो, इकडे कशाला आलात? तुमची शोधाशोध पोलीस करताहेत. तुम्ही ताबडतोब निदर्शनाच्या स्पॉटवर जा.''

मिस्टर पाडळे तगडे वयोवृद्ध होते आणि निवृत्त मिलिटरी अधिकारी! निवृत्तीनंतर ते आंबेडकरी चळवळीत कार्यरत होते. निवडणुकाही त्यांनी लढविल्या. एक वेळ तर ते पुण्याचे उपमहापौरही झाले होते. आंबेडकरी चळवळीत अशी दिग्गज कर्तृत्वाची माणसे वैयक्तिरीत्या काम करीत होती. ठकसेन पाडळे हे पँथरचे मोठे पाठीराखे आणि पारंपरिक रिपब्लिकन पक्षाच्या गटातटाचे विरोधक होते! पुण्यातल्या परिसरातले काँग्रेसवाले, आरपीआयवाले त्यांना टरकून होते. त्यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही निदर्शनाच्या ठिकाणी पोहोचलो. त्यावेळी पुण्याचे अनिल कांबळे पँथरचे शहराध्यक्ष होते.

मी वर्ष-सहा महिने पुण्यात राहून गंगाधर आंबेडकर आणि अनिल कांबळे यांच्या घरी राहून कट्टर पँथर संघटना बांधली होती. पुण्यात दलित पँथर सुरू होण्याअगोदर मी, राजा ढाले आदी पुण्याच्या एका जाहीर सभेसाठी गेलो असता पुण्यातील मोदीखान्यात कार्यकर्त्यांसोबत जंगी बैठक केली होती. त्याच्या अगोदर आम्ही पुणे येथील कौन्सिल हॉलवर शनिवारवाड्यापासून मोर्चाही काढला होता. मोदीखान्याच्या बैठकीत वाद-प्रतिवाद करून आम्ही त्यांची मने जिंकली आणि पँथर स्थापना झाली.

त्याअगोदर आम्ही सरकारविरुद्ध जो मोर्चा काढला होता तो आम्हा पँथर्सच्या कार्यकर्त्यांनी मुंबईच्या कार्यकर्त्यांना घेऊन काढला होता आणि इंदापूर गगनबावडा प्रकरण तापवले होते. राजाभाऊंचा झेंडा प्रकरणाचा लेख आणि त्याविरुद्ध सरकारने टाकलेला खटला याविरुद्धदेखील हा मोर्चा होता. हा मोर्चा जेव्हा शनिवारवाड्यावरून लक्ष्मीरोडने कौन्सिल हॉलच्या दिशेने जोरात चालला असताना शनिवार वाड्याजवळील ब्राह्मणांच्या वस्तीतून, जो आरएसएसचा बालेकिल्ला होता. या मोर्चाला अपशकुन करण्यासाठी ते आडवे आले होते आणि हाणामारी करू पाहत होते. संतप्त पँथरने त्यांना चांगलाच चोप देऊन आगेकूच केली. मग ते जे स्फुरण आले ते ग्रेट आहे.

मोर्चेकरी सगळे मुंबईचे पँथरवाले होते. कौन्सिल हॉलवरचा मोर्चा संपवून पँथर संध्याकाळच्या गाड्यांनी परत मुंबईला निघून गेले. मला ते चला म्हणत होते; पण मी, लतीफ खाटीक पुण्यात दोन दिवस राहायचे ठरवले होते. आम्ही मुंबईच्या पँथरला निरोप देऊन परत पी.एम.टी.च्या डेपोकडे परत येत असताना आम्हाला एलआयबीच्या पोलिसांनी घेराव घालून पोलीस चौकीत नेले. आम्ही म्हणालो, हे काय? कशासाठी त्यांनी पोलीस चौकीत आणले, तर ते म्हणाले, चला चहापाणी घ्या. तुम्ही काय छान भाषण केले.

शेवटी त्यांचा हेतू आम्हाला कळला. त्या मोर्चामध्ये मी सरकार आणि व्यवस्था यांच्याविरुद्ध जे प्रक्षोभक बोललो होतो, हिंदू धर्म आदीवर टीकाही केली होती. त्यामुळे माझ्यावर १५३ (ए) अन्वये प्रक्षोभक भाषण केल्याबद्दल खटला भरला होता. रात्री पोलीस आम्हाला बंड गार्डन पोलीस स्टेशनला घेऊन गेले. त्यांनी मला अटक केल्याचे सांगितले. त्यावेळी अशा काही मोबाइलची सोय नव्हती आणि पोलीस स्टेशनमधला दूरध्वनी वापरण्याची परवानगीही नव्हती. याअगोदरच मुंबईतील कार्यकर्ते निघून गेलेले होते. माझे नशीब एवढे बलवत्तर होते, की बंड गार्डन पोलिसांनी लतीफ खाटीकवर खटला टाकला नव्हता. शेवटी लतीफ खाटीक बाबा आढावांच्या घरी गेला.

त्यांना घेऊन आला. मग ते मला जामीन झाले, तेव्हा माझी सुटका झाली. ती रात्र मी माझ्या मावसभावाकडे राहिलो आणि मग तिकडून पुढे मोदीखान्याकडे आणि अनिल कांबळेकडे प्रस्थान केले. तिथेच मी पुढे संघटनेची बांधणी करण्यासाठी सहा महिने राहिलो आणि पँथरचे सपोर्ट देणारे हितचिंतक, कार्यकर्ते मला मिळाले.

पुढे ढाले-ढसाळ वादात हीच पुण्याची निष्ठावान पँथर माझ्यामागे खंबीर उभी राहिली. त्या वेळेला चळवळीसाठी वाट्टेल ते करण्यासाठी दिग्गज कार्यकर्ते मला पँथरच्या माध्यमातून मिळाले. त्यामध्ये माझे तीनही मावसभाऊ ॲड. जयदेव गायकवाड, वसंत गायकवाड, शांताराम गायकवाड चळवळीत आपापल्या मर्यादा सांभाळून सामील होते. तिघेही सरकारी नोकरीत कामाला होते. जयदेव तर सेंट्रल बिल्डिंगमध्ये सार्वजनिक बांधकाम खात्यात ट्रेसर म्हणून कामाला होते. त्यांच्या कामाचे ठिकाण आमचे पुण्यातील मुख्य कार्यालय होते. जयदेव म्हणजे आमच्या दलित पँथर संघटनेचे पीआरओच. किती वेगवेगळ्या तऱ्हेचे, ताकदीचे कार्यकर्ते. त्यामध्ये तात्या खरात हा राजकीयदृष्ट्या भलताच मुत्सद्दी कार्यकर्ता होता. बँकेत अधिकारी होता. दुसरा पुण्यातील अरुण कांबळे (मोदीखान्यातील) होता. तोही सरकारी नोकरीत. तिसरा चंद्रकांत काळे हाही सरकारी नोकर. बी.ए.,एम.ए.पर्यंत शिकलेली सुशिक्षित मंडळी पँथरमध्ये सहभागी होती. त्यामध्ये पोपट अल्हाट, आनंद यशोदान कॉलनी, संपत भोसले, गोपाळ वंजारी, मारामारीला वस्ताद असलेला सदाशिव भोसले, येरवड्याचे बाळ अल्हाट, मधुकर पानसरे आदी रथी-महारथी कार्यकर्ते, पँथरचे पुणे युनिट अफलातून डेअरिंगबाज होते.

इंदिराजींचा रस्ता रोखण्याचा आदेश मी दिला होता. बरोबर त्या १२-१२.३० वाजेदरम्यान आकाशवाणीच्या स्पॉटला किमान ५००-१००० कार्यकर्त्यांना निदर्शनाची कल्पना देऊन घेऊन यायचे. अनिल कांबळे स्पोर्टसमन होता. त्याकाळी पुण्यात आट्यापाट्या, हुतुतु, खो-खो हे खेळ तरुण आवडीने खेळत असत. जागोजागी क्रीडा मंडळे होती. अनिल कांबळेच्या वस्तीतील म्हणजे मंडईतील, पुणे लष्कर ही मंडळे अग्रेसर होती. अनिलला सांगितले होते, खेळाच्या बॉड्या, चड्ड्या घालून यायचे आणि तू त्यांचा मास्तर. गळ्यात शिटी आणि तू अंगात फुल ड्रेस आणि नवमत मंडळीची बनियन घालून ये. आम्ही निदर्शने करण्याच्या स्पॉटवर पोहोचतो न पोहोचतो तोच अनिलही फौज, सैन्य घेऊन तिथे आला होता. मला, भाईला पाहिल्यानंतर त्यांच्याकडून आमच्या नावांचा जयजयकार सुरू झाला. काही तर मला आणि भाईला खांद्यावर घेऊन घोषणा देत होते. रस्त्याच्या दुतर्फा वसंतदादांनी बोलाविलेल्या काँग्रेसमेनची लाखोंची गर्दी होती.

इंदिरा गांधी बंड गार्डनचा पूल ओलांडून पुढे येताहेत, असे कळले आणि आम्ही ठोकाठोकीला सुरुवात केली. त्यावेळी पुण्याचे मेअर शांताराम दिवेकर होते. ते उच्च मराठा कुळातील होते आणि संघटना काँग्रेसचे नेते संभाजीराव काकडे हे त्यांच्याशी संबंधित होते. या निदर्शनासाठी आम्ही महाराष्ट्रभर जो दौरा केला होता त्याच्यासाठी वाहने आणि खर्च हा संभाजीरावांनीच उचलला होता. मी त्यांच्या गाडीत बसून पश्चिम महाराष्ट्रातील सर्व पँथरच्या शाखांना भेटी देऊन कार्यकर्त्यांनी निदर्शनात सहभागी व्हावे म्हणून सांगून आलो होतो.



दिवंगत अरुण कांबळे त्यावेळी वेलिंग्टन कॉलेजमध्ये शिकत होता आणि तो कवीही होता. त्याने लेनिनवर लिहिलेली कविता मी वाचलेली होती. सांगलीचे अध्यक्ष झेंडे पहिलवान हे मला अरुण कांबळेकडे घेऊन गेले होते. मी त्यांना पुण्याला येण्याचे निमंत्रण आणि गाडीखर्चही दिला.

जेव्हा स्पॉटवर निदर्शने सुरू झाली तेव्हा क्षणार्धात हजार-पाचशे कार्यकर्त्यांनी काँग्रेसचा चक्रव्यूह भेदून जाळपोळीला सुरुवात केली. याच निदर्शनात विरोधी पक्षाचे कार्यकर्ते आलेले होते. ते आमचे हे काम पाहून भांबावून गेले. ती उग्र निदर्शने नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी हवेत गोळीबार केला. त्याच स्पॉटला पुण्याचे मेअर शांताराम दिवेकर हे सामील झाले. त्यांनाही कार्यकर्ते आमच्यासारखेच खांद्यावर उचलून घेऊन नाचत होते. दादांनी बोलावलेले सांगलीतले पहिलवानी सैन्य पळून गेले. त्या रस्त्यावर नेमलेल्या पोलीस अधिकाऱ्यांपैकी एक होते उबाळे साहेब. त्यांची व आमची ओळख होती. ते पुण्याच्या पॉलिटिकल ब्रँचचे डेप्युटी कमिशनर होते. ते माझ्याजवळ तडक आले आणि म्हणाले, ढसाळ तुमच्या कार्यकर्त्यांना आवरा. आता तर फक्त हवेत गोळीबार झाला आहे, आम्हाला पुढे प्रत्यक्ष आपल्या कार्यकर्त्यांवर गोळीबार करावा लागेल. जवळच्या कार्यकर्त्यांनी त्यांची धमकी ऐकली. एका संतप्त कार्यकर्त्याने हातातील भरीव बांबू चिडून उबाळे साहेबांच्या डोक्यात घातला. ते रक्तबंबाळ झाले आणि परत निघून गेले. इंदिरा गांधींच्या विरोधात मुर्दाबादच्या घोषणा चालू होत्या. वसंतराव नाईक आणि मोठे साहेब यांच्याविरुद्ध कार्यकर्ते अपशब्दाच्या वाईट घोषणा देत होते. वसंतदादांच्या नावाने तर शिमगा चालू होता.

आल्या पावली उबाळे माघारी गेले. इंदिरा गांधींच्या गाड्या जुन्या रेंज हिल्समार्गे पुणे विद्यापीठात गेल्या. अशा वातावरणात इंदिराजींनी पुणे विद्यापीठात डी.लिट. स्वीकारली. शिकाऱ्यांच्या हातून सावज निसटावे, अशी आम्हा कार्यकर्त्यांची अवस्था झाली. त्या निदर्शनातून इंदिराजी बचावल्या, नाही तर अघटित घडले असते. मी एवढा संतप्त झालो, की पुणे रेसकोर्सवर संध्याकाळी जी इंदिराजींची सभा चालू होती त्या सभेत जाऊन आम्ही जिवंत साप सोडले होते आणि सभा काही काळ डिस्टर्ब होऊन गेली. आता एवढ्या वर्षांनंतर मला या मॅडनेसपणाचे हसू येते. एवढे आम्ही केंद्र आणि सरकारवर वैतागलेलो होतो. ●●●

**लेखक दलित पँथरचे सहसंस्थापक आहेत.**
**(भाष्य प्रकाशनच्या दलित पँथर या ग्रंथातून साभार)**

# दलित पँथर : एक तुफान

**दलितांवरील अन्यायी शक्तीविरुद्ध आवाज पुकारल्यामुळे दबक्या स्वरात 'जय भीम' म्हणणारे उच्चस्तरात 'जय भीम' म्हणू लागले, ही शक्ती दिली ती दलित पँथरनेच. ज्यांच्या घरी शिक्षणाची परंपरा नव्हती त्यांनी प्रचंड प्रमाणात साहित्य निर्माण केले आणि ते शैक्षणिक अभ्यासक्रमात सामावण्यात आले, याचे श्रेय दलित पँथरला नाही, असे कोण म्हणेल? कला असो, वा क्रीडा क्षेत्र, त्यात अनेक 'स्टार' निर्माण झाले ते दलित पँथरच्या दबावगटामुळेच. झोपड्यात राहणारे टॉवरमध्ये राहू लागले, याचे कारण संविधानाने दिलेल्या अधिकारांची दलित पँथरने केलेली कठोर अंमलबजावणी.**



**ज.वि. पवार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतरच्या म्हणजे आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळीतला मैलाचा दगड म्हणजे दलित पँथर चळवळीचा कार्यकाल. याला आंबेडकरी चळवळीचा सुवर्णकालही म्हणता येईल. कारण या कालखंडाने देदीप्यमान कर्तृत्व गाजविले. आंबेडकरी चळवळीतला दलित पँथरचा कार्यकाल अत्यल्प; परंतु याच कालखंडाने आंबेडकरी चळवळीवर आपला वेगळा ठसा उमटविला. चळवळीच्या छोट्या वा मोठ्या कालखंडाचा प्रश्न नसतो, महत्त्व असते ते त्या कालखंडाच्या कर्तृत्वाचे. कवी मित्र नामदेव ढसाळ व मी दि. २९ मे १९७२ रोजी मुंबईच्या रस्त्यावर ही चळवळ सुरू केली अन् अल्पावधीत ती रस्त्यावरील लढ्यामुळे प्रांत, भाषा अन् देश यांच्या सीमा ओलांडू शकली, याचे कारण या चळवळीतील तरुणांचे त्यागी कर्तृत्व. दलितांवरील अन्याय-अत्याचारांचे निर्दालन हे या तरुणाईचे ध्येय्य होते अन् त्या ध्येयपूर्तीसाठी त्यांची सर्वस्व त्यागाची मानसिकता तयार झाली होती. दलितांवरील अन्यायाविरुद्ध हाताच्या मुठी वळल्या अन् त्यांनी धर्मनिष्ठ व्यवस्थेवर प्रहार केला. यामुळे हजारो वर्षांचा जुलमी किल्ला हबकला, दचकला अन् काही कळण्याआधी जमीनदोस्त झाला.

**तरुणाईने उगारलेली वज्रमूठ वर्मी लागली**

२. तसा हा कालखंड नोंद न घेण्याइतपत अल्प; पण त्याची नोंद आज जगभरचे चळवळे व अभ्यासक घेत आहेत, नव्हे त्यांना घ्यायला भाग पाडले आहे. २९ मे १९७२ ला सुरू झालेली चळवळ तरुणाईला उद्दीपन करण्यासाठी दि. १४ ऑगस्ट १९७२ पर्यंत प्रसार आणि प्रचार यंत्रणा राबवीत होती अन् १४ ऑगस्ट १९७२ च्या मध्यरात्री सगळीकडे रोशनाई केली जात असताना हाती काळे झेंडे घेऊन शासनाला सांगत होती, की 'हा कसला स्वातंत्र्याचा रौप्य महोत्सव?' स्वातंत्र्याची किरणे आमच्या अंधारलेल्या झोपडीत शिरलीच नाहीत. आम्ही पारतंत्र्यात आहोत. काळ्याकुट्ट अंधारात वावरत आहोत. आम्हाला हवंय स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व. ही तत्त्वत्रयी देण्याचे आश्वासन आम्हाला दि. २६ जानेवारी १९५० रोजी दिले होते. त्या अभिवचनाची पायमल्ली होतेय, म्हणून आम्ही




व्यवस्थेचा निषेध करतो. अगदी जळजळीत शब्दांत.

३. आझाद मैदानातून निघालेल्या या मोर्चात प्रामुख्याने हजर होते ते स्वतःला पँथर म्हणविणारे तरुण. आजूबाजूच्या रोशनाईत लक्ष वेधून घेत होते ते काळे झेंडे. या निषेध मोर्चात तरुणांच्या अनेक संघटना सामील झाल्या होत्या. प्रत्येक संघटना आपले बॅनर घेऊन आली होती आणि त्या बॅनरमागे त्या संघटनेचे तरुण घोषणा देत होते. पंधराएक संघटना सामील झाल्या होत्या. त्यांचे संख्याबळ कमी होते. युवक क्रांती दल, समाजवादी युवक सभा, सी.पी.आय., लाल निशाण पक्ष वगैरेंच्या विद्यार्थी संघटना सामील झाल्या होत्या. तो दिवस स्वातंत्र्यदीन असल्यामुळे पोलीस परवानगी

वगैरेची आवश्यकता नव्हती. २९ मे १९७२ ते १४ ऑगस्ट १९७२ पर्यंत आम्ही भर पावसात या काळ्या स्वातंत्र्य दिनाची वस्तीवस्तीमध्ये जाहिरात करत होतो. तसे प्रेस स्टेटमेंटसुद्धा मी काढले होते. त्यामुळे त्या मोर्चाला आंदोलकांपेक्षा पोलीसच ज्यादा हजर होते. पोलिसांचे निळे पेहराव आणि आमच्या हातातील काळे झेंडे यामुळे रोशनाईची मजा लुटणाऱ्यांना आमचेच कौतुक होते. जिंदाबाद-मुर्दाबाद करीत हा मोर्चा 'काळा घोडा' येथे अडविण्यात आला. भारत सरकारने हा दिवस म्हणजे स्वातंत्र्याचा रौप्य महोत्सव असल्याचे जाहीर केले होते व त्यादिवशी सर्व राज्य सरकारच्या विधिमंडळांचे विशेष अधिवेशन घ्यायला लावले होते. महाराष्ट्र राज्याचे विधिमंडळ अधिवेशन आज जेथे महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय-म्युझियम आहे तेथे भरले. असे रात्री १२ नंतर हे विशेष अधिवेशन सुरू झाले व त्याच वेळी 'काळा घोडा' येथे आम्ही पर्यायी विधिमंडळ अधिवेशन सुरू केले. या पर्यायी विधानसभेचा मी सभापती होतो व आमच्या पर्यायी विधानसभेत भालचंद्र मुणगेकर, हुसेन दलवाई, भाऊ तोरसेकर, कमलाकर सुभेदार, शमा पंडित, अनुराधा यांसारखे सन्माननीय सदस्य होते. समोरच्या खऱ्या विधानसभेत मृणालताई गोरे यांसारखे सन्माननीय सदस्य दलितांवरील अन्यायाला वाचा फोडीत होते. ती विधानसभा बरखास्त झाल्यावर आमच्या पर्यायी विधानसभेत मृणालताई आल्या. आम्ही एका ओळीचा शासनाचा निषेध करणारा ठराव एकमताने संमत केला व सभागृह बरखास्त केले. रात्रीचे दोन वाजले होते. गाड्या बंद झाल्या होत्या. तरुण स्वैरपणे फिरत होते. जवळ राहणारे शांतपणे घरी गेले.




४. त्या दिवसांत आचार्य रजनीश यांचा 'संभोगातून समाधीकडे' हा कार्यक्रम जाहीररीत्या पार पडत असे. रौप्य महोत्सवानिमित्त त्यांनी विशेष कार्यक्रम चर्नीरोड चौपाटीवर ठेवला होता. कोणत्या तरी तरुणाला त्या कार्यक्रमाची आठवण झाली. हा कार्यक्रम पहाटेपर्यंत चालू असतो, हेही त्या तरुणाला माहीत असल्यामुळे रजनीश यांच्या कार्यक्रमाला जाऊ या, असे म्हणताच सर्व तरुणांनी एकमुखी होकार दिला. तारुण्यसुलभ कार्यक्रमाला मी रोखू शकलो नाही आणि म्हणून काळा घोडा-चर्चगेटमार्गे गिरगाव चौपाटीवर चालत जायला सुरुवात केली. माझ्याबरोबर राजा ढाले होते. त्यांनी सुचविलेल्या ९ जुलै १९७२ च्या पहिल्या मेळाव्यातील ॲक्शन प्रोग्राम यशस्वी झाला होता. मीसुद्धा आनंदित झालो होतो. आम्ही जेव्हा चौपाटीवर 'त्या' जागेवर पोहोचलो तेव्हा कार्यक्रमाची समाप्ती झाली होती. म्हणजेच 'संभोगातून समाधीकडे' हा कार्यक्रम तरुणांना पाहता आला नाही. ते नाराज झाले अन् तरीही त्यापैकी कोणी तरी 'ज.वि. पवार साहेबांकडे चहाला जाऊ या' म्हटल्यावर चर्नीरोड, व्ही.पी. रोडमार्गे सिद्धार्थनगर, बाप्टी रोड या माझ्या वसाहतीत पोहोचलो. आमची ही वसाहत म्युनिसिपल साफसफाई खात्यातील कर्मचाऱ्यांची असल्यामुळे त्यांना हजेरी देण्यासाठी भल्या पहाटेच 'सेक्शन'ला जावे लागे. त्यामुळे खोलीतील इतर मंडळीसुद्धा जागी व्हायची. वसाहत महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची असली आणि जनतेला पाणी देण्याचे कर्तव्य महानगरपालिकेचे असले तरी कर्मचाऱ्यांना मात्र पाणी दिले जात नव्हते. या सिद्धार्थनगरमध्ये सहा चाळी होत्या. प्रत्येक चाळीला तीन मजले होते; परंतु सगळे नळ कोरडे असायचे. पाण्याला प्रेशर नाही, असे कारण दिले जायचे व त्यामुळे प्रत्येक बिल्डिंगजवळ 'हापशा'ची सोय होती. जाग्या झालेल्या महिला या हापशावर पाणी भरत. आम्ही सिद्धार्थनगरमध्ये प्रवेश केला तेव्हा सर्व चाळी जाग्या झाल्या होत्या. ढोर चाळ (नामदेवचा एरिया), वी.आय.टी. चाळ येथील तरुण आपापल्या घरी गेले अन् तरीही पन्नाससाठ तरुण आमच्याबरोबर होतेच. एवढ्यांना चहा देण्याचा प्राणायाम माझ्या पत्नीने केला. चहा अर्थातच बीनदुधाचा होता. काळा असला तरी तो चहा तरुणांना 'हुशारी' देत होता.

५. काळा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यासाठी मी व नामदेव १४ तारखेलाही फिरत होतो. १४ ऑगस्ट सोमवार होता. १५ ऑगस्टला सार्वजनिक सुटी होती. म्हणून मला सही करण्यापुरते का होईना बँकेत जावे लागले. मी बँकेत जाण्याच्या वेळेस पोस्टमन आला. त्याने 'साधना' स्वातंत्र्य रौप्य महोत्सव अंक' दिला. त्याकाळी मी अनिल शांताराम थत्ते यांच्या मैत्रीमुळे 'साधना'चा लेखक व वर्गणीदार होतो. 'साधना'चे वाचक हे समाजवादी परिवारातलेच असायचे. मी काही 'समाजवादी' नव्हतो; परंतु एम.ए.ला एका बाकावर आम्ही चौघे जण बसायचो. ज.वि. पवार, अर्जुन ठमाजी डांगळे, अनिल शांताराम थत्ते व परेन शिवराम जांभळे. अनिल तेव्हा आकाशवाणीवरील 'युवा' कार्यक्रम करीत असे. त्यानेच मला अन् नामदेव ढसाळला आकाशवाणीवर कविता वाचनाचा कार्यक्रम दिला. केशव केळकर त्या कार्यक्रमाचे प्रमुख होते. केळकरांनी आम्हाला सांगितले, की हा कार्यक्रम तुमचे आई-वडील, नातेवाईक ऐकणार तेव्हा कोणत्या कविता वाचायच्या हे तुम्हीच ठरवा. बहुधा नामदेवला उद्देशून ते बोलले असावेत, तर मी साधनाचा वर्गणीदार होतो. सकाळी तो अंक आल्यावर मी अधाशाप्रमाणे राजा ढाले यांचा 'राष्ट्रध्वजा'संबंधित एकच लेख वाचला. तो लेख वाचल्याचे मी राजा ढाले यांना सांगितले व 'तुझ्यावर खटला होणार' हेही बोलून दाखवले. ढालेकडे तो अंक आला नव्हता म्हणून उत्सुकतेपोटी ते माझ्याबरोबर घरी आले. गरमागरम काळा चहा पिताना लेख जसाच्या तसा छापल्याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. कारण 'साधना' हे साधनासूचिता स्वीकारणारे साप्ताहिक. ढाले यांनी तो अंकच घेतला. या अंकात दारूगोळा भरलेला आहे, याची मला जाणीव झाली होती आणि पुढे तसे झालेही. तेव्हा साधनाचे संपादक होते, यदूनाथ थत्ते.

६. 'साधना'च्या या विशेषांकात सर्वच दलित साहित्यिकांनी लिहावे, अशी अपेक्षा 'साधना'चे कार्यकारी संपादक डॉ. अनिल अवचट यांनी केली. यात अनेकांनी लेख लिहिले. उदा. जगदीश करजगावकर (म्हणजेच आपले अर्जुन डांगळे), दया पवार, प्रल्हाद चेंदवणकर इत्यादी. मी व ढसाळ १५ ऑगस्टच्या काळ्या स्वातंत्र्य



**आंदोलना दरम्यान ज. वि. पवार यांना पोलिसांनी अटक केली असता**

दिनाच्या प्रचारात असल्यामुळे आम्ही दोघांनीही लेख लिहिले नाहीत. आश्चर्याची आणि नोंद घेणारी बाब म्हणजे, दलितांवरील अन्याय-अत्याचारासंबंधी हा अंक असताना व या अत्याचाराविरुद्ध दलित पँथर कार्यरत असताना डांगळे किंवा ढाले यांनी दलित पँथरचा उल्लेखसुद्धा केला नाही. वाहरे दलित पँथरचे संस्थापक.

७. या दलित पँथर संस्थापनाबद्दल मला सांगितले पाहिजे, दुर्गाबाई भागवत या 'साधनासुचितावाल्या.' 'साधना'च्या ट्रस्टीमधल्या एक ट्रस्टी. त्यांनी राजा ढाले यांच्यावर सूड उगविण्यासाठी 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये पत्र लिहून ढालेंचा निषेध केला. ट्रस्टी मंडळाचा राजीनामा दिला अन् मग या राष्ट्रध्वज अवमान प्रकरणी वर्तमानपत्रे गर्जू लागली. हा सूड होता नामदेव ढसाळ यांच्या 'गोलपिठा' काव्यसंग्रहाच्या प्रकाशनातील राजा ढाले यांच्या भाषणाबद्दल (अधिक माहितीसाठी अभ्यासकांनी माझा आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ खंड ४ पाहावा). ढाले यांच्या त्या लेखामुळे दलित पँथरला वर्तमानपत्राच्या शेवटच्या पानावरसुद्धा जागा मिळत नव्हती. ती आता आतल्या पानावर मिळू लागली. अगदी संपादकीयसुद्धा राष्ट्रध्वज आणि राजा ढाले या विषयांमुळे दलितांवरील अन्याय-अत्याचाराबद्दल मोठ्या प्रमाणात चर्चा होऊ लागली. राजा ढाले 'हीरो' झाले होते. दलित पँथरची पहिली जाहीर सभा शेठ मोतीशहा लेन (लव्ह लेन) या विभागात ठरली. दलित पँथरचे पहिले शहीद भागवत जाधव हे याच विभागातील रहिवासी. ही जाहीर सभा २ ऑक्टोबर १९७२ रोजी झाली. या सभेतील दलित पँथरचे वक्ते होते नामदेव ढसाळ व ज.वि. पवार. ढाले यांना पहिल्या प्रथम दलित पँथरच्या स्टेजवर बोलावण्यात आले. त्यांना विषय देण्यात आला होता 'माझा 'साधना'तला लेख.' नामदेवने या सभेत दादासाहेब गायकवाड यांच्याबद्दल जे अनुद्गार काढले त्यामुळे ही सभा बरेच दिवस चर्चेत होती. राजा ढाले दिसतात कसे, बोलतात कसे, हे पाहण्याच्या इच्छेपोटी त्यांना दलित पँथरच्या स्टेजवर बोलावण्यात येऊ लागले. काही उत्साही तरुण सभेच्या हँडबिलमध्ये राजा ढाले यांच्यापुढे 'संस्थापक दलित पँथर' असे लिहू लागले. नामदेवने याबद्दल माझ्याकडे नाराजी व्यक्त केली. मी नामदेवची समजूत घालीत असे. 'राजाला संस्थापक म्हटल्याने आपले काय नुकसान होणार?' उलट दलित पँथरच्या ऊर्जितावस्थेला मदतच होईल. मनुष्य स्वभावानुसार नामदेवला हे मान्य नव्हते. मी आजही मानतो, की ढालेंच्या 'त्या' लेखामुळे दलित पँथर वाढली, मोठी झाली. ढाले-ढसाळमध्ये दरी निर्माण होऊ लागली. त्यातच राजा ढाले यांचे सरफरे व्याख्यानमालेत एक व्याख्यान झाले. या सभेत 'मी एक सामाजिक संघटना स्थापन करणार आहे', असे ढाले यांनी उद्‌गार काढले. दलित पँथर ही सामाजिक संघटना असताना दुसरी संघटना काढायची गरजच काय, असा ढसाळ यांचा मला प्रश्न होता. या प्रश्नामुळे ही दरी रुंदावत गेली. मनुष्य स्वभाव याला औषध नाही, हेच खरे.

८. रिपब्लिकन पक्षाच्या गटबाज नेतृत्वावर प्रहार करणारे आम्ही, आमच्यात ही गटबाजी नको म्हणून मी मध्यस्थी करीत होतो. त्यातच कम्युनिस्ट पार्टीचे प्रचारक असलेले शाहीर अमरशेख यांच्या 'मल्लिका' नामक मुलीशी नामदेवचे लग्न झाले, तर आंतरराष्ट्रीय कीर्तीचे बौद्ध धम्म गुरू डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांच्या हस्ते राजा ढाले यांचे नागपुरात बौद्ध पद्धतीने लग्न झाले. यातूनच एक मार्क्सवादी तर दुसरा आंबेडकरवादी हे कोलीत प्रसारमाध्यमाला मिळाले. नामदेव-राजामध्ये दरी निर्माण होत असली तरी रोजच्या वर्तमानपत्रात राजाबद्दल चांगले-वाईट मोठ्या प्रमणात लिहून येत असल्यामुळे नामदेवला गप्प राहणे भाग होते. राजाबद्दल रकानेच्या

रकाने लिहून येऊ लागली. कारण त्याने राष्ट्रध्वजावरच हल्ला केला होता. याबद्दल मी सविस्तर लिहिले आहे. 'द पीपल्स पोस्ट'च्या वाचकांसाठी सांगू इच्छितो, की त्याकाळी एखाद्या महिलेवर बलात्कार करण्यात आला, तर आरोपीला रु. ५०/- दंड होत होता; परंतु राष्ट्रध्वज फडकत असताना उभे राहून राष्ट्रध्वजाला वंदन न करणाऱ्याला रु. ३००/- दंड होत होता. ''राजाचा सरळ सरळ प्रश्न होता... राष्ट्रध्वज म्हणजे तीन रंगाचा एक फडका. त्याला महत्त्व द्यायचे, की महिलेच्या अब्रूला? हे फडके कुणाच्या..... घालायचे.'' प्रतीकापेक्षा जिवंत माणसाला महत्त्व दिले पाहिजे, हे राजाचे म्हणणे


**आंदोलना दरम्यान नामदेव ढसाळ यांना पोलिसांनी अटक केली असता**

तर्कसंगत होते; परंतु त्यामुळे गहजब करण्यात आला होता. नामदेव या गदारोळात दबला गेला होता.

९. अमेरिकेतल्या ब्लॅक पँथरची स्थापना बॉनी सील व एच.पी. न्युटन या मित्रांनी रस्त्यात केली होती अन् अल्पावधीत अमेरिकन दमणयंत्रणेमुळे १९७० च्या आधीच लढाहीन झाली होती. भारतातील दलित पँथर ही चळवळ नामदेव ढसाळ व ज.वि. पवार यांनी रस्त्यात सुरू केली अन् तिला सुद्धा सरकारच्या दमणशक्तीने अल्पावधीत प्रभावहीन केले. असे असले तरी अल्प काळातील कर्तृत्वामुळे ती प्रभावी ठरली होती. दलितांवरील अन्याय-अत्याचारांचे निर्दालन करण्यासाठी अस्तित्वात आली असली, तरी तिने घटनादत्त अधिकारांची अंमलबजावणी करणे हे एक ध्येय ठरविले होते. व्यवस्थेवर दलित पँथरचा धाक असला व एक लढाऊ संघटन म्हणून ख्याती मिळाली असली, तरी आम्ही स्वीकारलेला मार्ग अहिंसक होता; परंतु आमची प्रसिद्धी होत होती ती हिंसाचारी असल्याची. या प्रसिद्धीला आमची कार्यपद्धतीही कारणीभूत होती. आम्ही निःशस्त्र लढा देत होतो अन् तरीही आमची त्यांना भीती वाटत होती. आमचा दरारा आणि आमची निःशुल्क प्रसिद्धी कशी व्हायची, याचे एखादे उदाहरण सांगण्याची इच्छा मला आवरता येत नाही. एखाद्या खेड्यातील दलितांच्या एकमेव विहिरीत मेलेले कुत्रे फेकण्याचा प्रकार झाला अन् तो मला कळला, तर मी तातडीने मुंबईच्या काही झोपडपट्ट्यांत एक ओळीचा निरोप पाठवत होतो. अमुक एका गावी जायचे आहे आणि त्यासाठी अमुक एका पॅसेंजरने जाण्याचा तो निरोप असे. तो निरोप गेल्यावर त्या-त्या वस्तीतले शेकडो तरुण जमेल त्या रेल्वे स्टेशनवर जमायचे. ते बहुधा सर्वच मला अपरिचित असायचे. चारशे-पाचशे तरुण त्या गावात भल्या पहाटे पोहोचत असू. गावात त्या वेळेला दोन शक्तिकेंद्रे असायची, एक पारंपरिक पोलीस पाटील व दुसरे निवडणुकीच्या माध्यमाने अस्तित्वात आलेले सरपंच हे पद. गावात आम्ही गेल्यावर पोलीस पाटील वा सरपंचाचा शोध घेत असू. १५-२० तरुणांच्या साहाय्याने त्या व्यक्तीला आम्ही 'त्या' विहिरीच्या जवळ आणायचो आणि त्याची मानगुटी धरून त्याला ते दूषित पाणी प्यायला लावायचो. ते दृश्य पाहण्यास अवघा गाव लोटलेला असायचा. ज्या विहिरीतील दूषित पाणी दलितांनी प्यावे असे वाटत होते, त्या गावच्या म्होरक्याला आम्ही ४००-५०० तरुणांच्या दबावाने पाणी प्यायला लावत होतो. या कामी आम्ही कोणत्याही शस्त्राचा वापर करत नव्हतो. हा प्रकार आपोआप आसपासच्या किमान दहा गावांना तरी कळायचा आणि त्या गावातील पोलीस पाटील व सरपंच त्याची धडकी घ्यायचे. आपणही असेच केले, तर दलित पँथर नावाची टोळधाड आपल्या गावावर हल्ला करेल, अशी भीती त्यांना वाटायची. आमच्या दहशतीचा विनामूल्य प्रसार व्हायचा.

१०. प्रसारमाध्यमे आमच्या विरुद्ध होती. शेवटच्या पानावरून आमचे वृत्त मधल्या पानावर प्रसिद्ध होऊ लागले. ते ढाले यांच्या लेखामुळे. आता मधल्या पानावरून थेट पहिल्या पानावर अन् तेही हेडलाइन स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले. याचे कारण वरळी-नायगाव दंगल. मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचे खासदार आर.डी. भंडारे यांची राज्यपालपदी नेमणूक झाल्यामुळे तेथे पोटनिवडणूक लागली होती. दलित पँथर राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्त्व देणारी चळवळ होती; परंतु आमच्या चळवळीचा दूरगामी परिणाम राज्य सरकारवर होत होता. आम्ही निर्णय घेतला, की खेड्यात आम्ही अल्पसंख्याक असतो; परंतु मुंबई शहरातल्या वरळी-नायगाव विभागात आम्ही बहुसंख्याक होतो आणि म्हणून दलितांचे मतदान महत्त्वाचे होते. आम्ही निवडणूक लढवू इच्छित नव्हतो आणि म्हणून आम्ही या पोटनिवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घोषित करण्यासाठी आम्ही दि. ५ जानेवारी १९७४ रोजी जाहीर सभा घेतली होती. या सभेत दलित

पँथरचा सरचिटणीस या पदामुळे मी या निवडणुकीवर बहिष्कार टाकल्याचे जाहीर केले. माझ्या या घोषणेमुळे सभेत थोडा गोंधळ झाला. या सभेत नामदेव ढसाळ यांच्या भाषणाच्या वेळी सभेच्या रोखाने एक-दोन दगड फेकण्यात आले. शेवटचे वक्ते होते राजा ढाले. त्यांच्या भाषणाच्या वेळी सभा उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न झाला. पोलीस युनिफॉर्म घालून तरुणांनी मोठ्या प्रमाणात दगडफेक केली. सभा संपुष्टात आली. सभा चालू असतानाच नामदेव ढसाळ अनिल बर्वेबरोबर निघून गेले. वातावरण तंग करण्यात आले. पोलिसांनी लाठीहल्ला केला. डी.सी.पी. यांनी ढाले यांना जवळ बोलावून त्यांच्या डोक्यावर काठी मारली. परिणामी, ढाले जखमी झाले. दयानंद म्हस्के यांनाही मारहाण करण्यात आली. औषधोपचार करण्याच्या नावाने त्यांना दवाखान्यात नेण्यात आले अन् तेथेच त्यांना अटक केली. ही बातमी मैदानात पोहोचली. मी व भाई संगारे बिजलीच्या वेगाने आंबेडकर मैदानातील मोर्चेकऱ्यांना थांबवीत होतो. पोलिसांशी हुज्जत घालीत होतो. महिलांचे मोर्चे एकापाठोपाठ एक येतच होते. मी व संगारे रात्रभर त्याच परिसरात होतो. ढाले अटकेत होते. ढसाळ, महातेकर यांचा पत्ता नव्हता. अखेर आम्हालाही अटक होणार, असे वृत्त धडकले. आम्ही चारही लोक 'अंडरग्राउंड' झालो. राजा ढाले यांच्या सुटकेसाठी दि. १० जानेवारी १९७४ रोजी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे हँडबिल माझ्याच नावे काढण्यात आले. या मोर्चाचे नियोजन सुनिल दिघे, सुरेश सावंत, उमेश माने करीत होते. या मोर्चाच्या आधी आम्ही आसरा घेतला तो जी.एल. रेड्डी यांच्या घराचा. भूमिगत असल्यामुळे आम्ही चौघे जण एकमेकांना भेटत नव्हतो. पांडवांची नावे घेऊन आम्ही वावरत होतो. मी भीम हे नाव धारण केले होते.

**११.** १० जानेवारी उजाडली. सांकेतिक ठरावानुसार आम्ही मोर्चाच्या रस्त्यावरील एका चित्रपटगृहात 'यादों की बारात' हा चित्रपट पाहत होतो. ठरल्याप्रमाणे मी प्रथम प्रकट झालो. माझ्यामुळे मोर्चाला जान आली. पोलिसांना माझ्याकडे धाव घ्यावी लागली. एक-दोन मिनिटांसाठी भागवत जाधवही मला भेटला. तो माझ्या पत्नीचा मावस भाऊ होता. मोर्चावर दगडफेक होऊ लागली. पोलिसांनी मोर्चाचे तीन भाग केले आणि बायका-मुले यांचा विचार न करता मोर्चेकऱ्यांना झोडपून काढले. मोर्चात जान आणणारे लतीफ खाटीक, मला, नामदेव व संगारे यांना पोलिसांनी अटक करून भोईवाडा कस्टडीत ठेवले. तेथे गेल्यावर मोर्चात कोणी तरी मरण पावल्याचे वृत्त आले. बाहेर वातावरण तंग होते, त्याचा परिणाम आमच्यावर झाला. आम्हाला उंदराला चोपावे तसे चोपण्यात आले. पोलीस ऑफिसर क्रूर झाले होते. भोईवाडा परिसरात मोर्चेकऱ्यांना आणण्यात आले. झिंदाबाद-मुर्दाबादच्या स्वरात वातावरण क्षुब्ध झाले होते. अविनाश महातेकर निसटले अन् ते वर्तमानपत्रांकडे गेले. देव नावाचे इन्स्पेक्टर होते त्यांच्या केबिनमध्ये आम्हाला बोलावण्यात आले. तेथे मृणालताई गोरे होत्या. आम्ही पोलिसांविरुद्ध तक्रार केली. आमची काळी-निळी झालेली शरीरे दाखविली; परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही.

**१२.** मोर्चात मृत्यू पडलेल्या तरुणाचे नाव होते भागवत जाधव. वर्तमानपत्रे दलित पँथर आणि भागवत जाधव याच विषयांवर निघाली होती. भागवतच्या मृत्यूने दलित वस्तीत तरुणांच्या मुठी वळवळू लागल्या. सगळा समाज ओजस्वी आणि ऊर्जस्वी झाला होता. भागवतच्या मृत्यूने दलितांना स्फूर्ती दिली. याचा विपरीत परिणाम झाला तो रि.प. नेतृत्वावर. त्याला क्रोधाला सामोरे जावे लागले. उचित फायदा घेतला तो भारतीय जनसंघाने. या विभागाचे नगरसेवक होते जनसंघाचे वामनराव परब. भागवतच्या प्रेतयात्रेत ते सामील झाले होते. मी अटकेत होतो. प्रेतयात्रेत सामील होऊ द्यावे, अशी मी पोलिसांना विनंती केली; परंतु मला परवानगी मिळाली नाही. पुढे वसंत मोरे, धामणकर यांच्याबाबतीतही तसेच घडले. त्यांच्या प्रेतयात्रेत मी सहभागी होऊ शकलो नाही. कारण तेव्हाही मी जेलमध्येच होतो. ही दंगल जवळपास तीन महिने चालली. वरळीच्या महिलांनी हा किल्ला लढविला. तेथील विरोधकांना धडा शिकवण्याचे काम महिलांनी केले. त्यांच्याकडे मिरचीची पूड मोठ्या प्रमाणात



होती. मिरचीची पावडर हे त्यांचे अस्त्र होते, शस्त्र होते. त्यांनी त्याचा पुरेपूर फायदा उठविला.

**१३.** दलित पँथरचा काळ सुवर्णकाळ म्हटल्यावर या कालखंडाने सोनियाचे दिवस दाखविले वा या कालखंडामुळे दलितांचे जीवन सोन्यासारखे निपजले, हे आपोआपच सिद्ध होते. दलित पँथरने अनेक प्रातिनिधिक प्रकरणे हाताळली अन् त्यात त्यांना यश प्राप्त झाले. एखाद्या दलित शेतकऱ्याचे उभे पीक बंदुकीच्या धाकावर कोणी गिळंकृत करीत असेल, तर त्या गावात जाऊन अन्याय करणाऱ्या व्यक्तीला जरब दाखवून ते पीक दलित शेतकऱ्याला दिलेच; परंतु ही बळजबरी तो काही वर्षे करीत होता म्हणून मागील काही वर्षांचे येणे वसूल केले. एखाद्या गावात सार्वजनिक सोयी-सवलतीसाठी बलाढ्य शेतकऱ्याची जमीन वाचवून दलित शेतकऱ्यांचीच जमीन कशी वापरली जाते, याचा मागोवा घेऊन दलित शेतकऱ्यांची जमीन वाचविली. उदा. एस.टी.चा मार्ग वाट वळवून दलित शेतकऱ्याच्या शेतातून जात असेल, तर तो थांबविला. एखाद्या पुरोगामी स्पृश्य प्राध्यापकाने दलित पँथरला साथ दिली म्हणून त्याला नोकरीवरून काढून टाकल्याचे समजताच त्या शिक्षण संस्थेवर कारवाई करून त्या प्राध्यापकाला सन्मानाने नोकरीत सामावून घ्यायला भाग पाडले. एखाद्या स्पृश्य पोलीस शिपायाला त्याचे अधिकारी त्रास देत असतील, तर त्यांना वळणावर आणण्याचे काम दलित पँथरने केले. एखाद्या नवरदेवाने घोड्यावर बसल्याचा गुन्हा केला असे समजून त्याला गावकऱ्यांनी त्रास दिला असेल, तर कायद्याचा धाक दाखवून त्याच गावात त्याची शानदार वरात काढायला लावली. एखाद्या गावात भीमजयंती केली म्हणून बौद्ध वस्तीवर बहिष्कार टाकला असेल, तर ॲट्रॉसिटी ॲक्टचा आधार घेऊन त्या गावावर सामुदायिक दंडात्मक कारवाई करायला लावली. एखाद्या मुलीवर बलात्कार करून तिच्याशी लग्न करण्यास नकार दिला म्हणून तिच्या वडीलधाऱ्यांचे डोळेच ठेचून काढले असतील, तर प्रकरण प्रधानमंत्र्यांपर्यंत पोहोचवून न्याय मिळवून दिला, तो दलित पँथरनेच. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनादत्त अधिकार म्हणून आरक्षण दिले असेल, तर त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारी, निमसरकारी आणि खाजगी आस्थापनांविरुद्ध प्रचंड मोर्चे काढून बॅकलॉग भरून काढला तो दलित पँथरच्या रेट्यानेच आणि म्हणून कागदावर असलेले आरक्षण सर्व थरात आणि स्तरांत पूर्णत्वास नेले म्हणून तर अनेक कर्मचारी उच्चाधिकारी झाले. शिक्षण संस्थांमध्ये आरक्षण पूर्तता केली म्हणून अनेक लोक उच्चस्थानी बसू शकले. दलितांवरील अन्यायी शक्तीविरुद्ध आवाज पुकारल्यामुळे दबक्या स्वरात 'जय भीम' म्हणणारे उच्चस्तरात 'जय भीम' म्हणू लागले, ही शक्ती दिली ती दलित पँथरनेच. ज्यांच्या घरी शिक्षणाची परंपरा नव्हती त्यांनी प्रचंड प्रमाणात साहित्य निर्माण केले आणि ते शैक्षणिक अभ्यासक्रमात सामावण्यात आले, याचे श्रेय दलित पँथरला नाही, असे कोण म्हणेल? कला असो, वा क्रीडा क्षेत्र, त्यात अनेक 'स्टार' निर्माण झाले ते दलित पँथरच्या दबावगटामुळेच. झोपड्यात राहणारे टॉवरमध्ये राहू लागले, याचे कारण संविधानाने दिलेल्या अधिकारांची दलित पँथरने केलेली कठोर अंमलबजावणी. ज्यांना हे मिळाले ते आज दलित पँथरला श्रेय देऊ इच्छित नाहीत; परंतु त्यांनी आत्मपरिक्षण करावे म्हणजे त्याचे त्यांनाच कळेल, की ही देणगी आहे दलित पँथरची. कोणत्याही चळवळीचा प्रभाव ताबडतोब पडत नाही; परंतु तो दूरगामी असतो. दलित पँथरने तीन वर्षांत जी कृती केली जिचा हा परिणाम आहे आणि म्हणूनच पन्नास वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या दलित पँथर या चळवळीचा जगातले विद्यार्थी अभ्यास करीत आहेत. जगभरच्या विद्यार्थ्यांना दलित पँथरचे महत्त्व कळले आहे; परंतु भारतीय माणूस तो दलित असो वा दलितेतर, त्याला त्याचे महत्त्व कळत नाही. याचे कारण त्याची वर्चस्ववादी मानसिकता. तिला औषध नाही, हेच खरे.

इतिहासावर प्रभाव पाडणारी एखादी घटना घडल्यावर तिचे परिशीलन होत असते, तिचा मागोवा घेतला जात असतो, कधी-कधी तर तिची पुनरावृत्ती होत असते. दलित पँथरची निर्मिती ही दलितांवरील अन्याय-अत्याचार निर्मूलनासाठी झाल्यामुळे व त्या अन्यायाला पायबंध घातला गेल्यामुळे एखादी खैरलांजीसारखी घटना घडली, की आठवण होते ती दलित पँथरचीच. दलित पँथरसारखा धाक असता, तर असा भयाण प्रकार घडलाच नसता, याची जाणीव होते. ही जाणीव होणे म्हणजेच दलित पँथरचे कर्तृत्व मान्य करणे. दलित पँथरच्या स्थापनेला पन्नास वर्षे पूर्ण होत असल्यामुळे अनेक लोक दलित पँथरचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यास पुढे सरसावले आहेत. दलित पँथर या नावाने आजच्या घडीला १५ संघटना अस्तित्वात आल्या आहेत. दलित पँथरचे गोडवेही गायले जात आहेत; परंतु त्यापैकी किती आंबेडकरवादी आहेत, त्या लढवय्या आहेत की धंदेवाईक, त्या शत्रूंशी हातमिळवणी करणाऱ्या आहेत, की व्यवस्थेशी तह करणाऱ्या, याचाही विचार व्हायला पाहिजे. काल या संघटनांच्या पूर्वसुरींनी दलित पँथरची अडवणूक केली असेल, तर आज त्यांच्या वारसदारांना दलित पँथरची टिमकी वाजवायचा अधिकार आहे की नाही, याचाही विचार केला जावा.

१४. दलित पँथरची स्थापना ब्लॅक पँथरच्या प्रेरणेतून झाली. ब्लॅक पँथरने १९७४ साली दलित पँथरचे स्वागत केले होते. या ब्लॅक पँथरचे नेते आज दलित पँथरशी वैचारिक नाते दृढ करीत आहेत. याचाच एक भाग म्हणजे २०२२ साल उजाडल्यापासून सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त माझी अमेरिकेतल्या तीन विद्यापीठीय विचारवंतांशी ऑनलाइन चर्चा झाली. इंग्लंड व जर्मनी यांच्या विद्यापीठीय विद्यार्थ्यांशी चर्चा झाली. एवढेच नव्हे, तर २८/२९ मे २०२२ च्या नांदेड येथील कार्यक्रमास सूरज एगंडे यांच्या सहकार्यामुळे दि. २८ मे २०२२ च्या परिषदेसाठी मायकेल मैककार्टी, जाकोबी विल्यम, हँड्री गॅडीस हे ब्लॅक पँथरचे नेते उपस्थित राहिले. या परिषदेला मी हजर होतोच. शिवाय २९ रोजी अनेक महत्त्वाचे नेते हजर होते. उदा. चंद्रशेखर आजाद. २०२२ या वर्षभरात जे कार्यक्रम होणार आहेत त्यात आम्ही सहभागी होऊ, असे त्यांनी अभिवचन दिले. यानिमित्त मी 'दलित पँथरचे योगदान' या विषयावर लिहिणार आहे. त्याचाच एक भाग म्हणजे हा लेख. ●●●

**(लेखक दलित पँथरचे सहसंस्थापक, साहित्यिक व विचारवंत आहेत.)**

# दलित पँथर आणि मी

**'दलित पँथर'चा जाहीरनामा घटना ही नामदेवनं लिहिली होती आणि नामदेवच्या विचारांची जडणघडण अन् पिंड, स्वभावधर्म पाहता फक्त तोच ही घटना लिहू शकत होता! आणि 'दलित पँथर' ही संकल्पना फक्त आणि फक्त तोच जन्माला घालू शकत होता! इतर कुणाहीमध्ये ती वैचारिक ताकद नव्हतीच!**



मल्लिका अमर शेख

म 'चित्तावलोकन' करायचं म्हटलं तर खूप मागं जावं लागेल; (सिंहावलोकन म्हणतात कारण खूप चांगलं, की सिंह मागं वळून पाहतो.) तसं 'चित्ता' जो पँथरचा लोगो-प्रतीक आहे- तो तसं पाहतो का माहीत नाही; पण चित्ता सगळ्यात चपळ व आक्रमक समजला जातो... तो पुढंच झेप घेऊन हल्ला चढवतो! त्यामुळं खरोखर पँथरचा लोगो निवडण्यात नामदेवचं बुद्धिचातुर्य व दूरदृष्टीच दिसते. जरी ब्लॅक पँथरवरून त्याला हे सुचावं हेसुद्धा भारी आहे. कारण त्या वेळच्या चळवळींची नावं गुळमुळीतच होती. - तर साल १९७२! हे साल माझ्या दृष्टीनं फार महत्त्वाचं होतं आणि नामदेवच्याही!

### हेच मुळी चित्तथरारक सनसनाटी होतं

माझं शालेय जीवनातलं अत्यंत लक्षणीय अभिमानास्पद पर्व! नृत्य, गायन, एकांकिका, अभिनय, सर्वांत मी प्रथम येत होते. याच वर्षी 'सर्वोत्कृष्ट बालकवयित्री महाराष्ट्र राज्य १९७२' या किताबानं नाशिकच्या कलायतननं मला गौरवून मोठी ढाल दिलेली! तर शाळेतही मला सततच प्रथम क्रमांक प्रत्येक वर्षी (कलामध्ये-अभ्यासात नाही) मिळवण्यानं 'सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी' म्हणून गौरविलं. माझं मराठी कवितालिखाण चालूच होतं! याच काळात महाराष्ट्रात दलितांवरचे अन्याय-अत्याचार वाढलेले - नामदेव कविता लिहिता-लिहिताच राजकारणात उतरला. आपल्या समाजाचं दुःख दूर करायचं असेल, तर संघटना हेच उत्तर आहे, असं त्याला प्रकर्षानं वाटलं. त्याचा राजकीय अभ्यास सुरू झाला... स्वतःच स्वतःला घडवणारा समर्थ माणूस झाला. नपेक्षा गावातून महारवाड्यात राहणारा-शाळेत न जाणारा व त्यासाठी आईचा मार खाणारा मुंबईत येतो काय न् एवढ्या भयानक कामाठीपुऱ्यातल्या अधोविश्वात राहूनही तो टॅक्सी चालवत कविता करत चक्क बंडाची भाषा बोलत नव्या संघटनेचा विचार करणं हेच मुळी चित्तथरारक सनसनाटी होतं.

तेव्हा ७३ मध्ये माझ्या बहिणीचं लग्न होऊन अनिलभैया घरी राहायला आलेले... अनिलभैया 'रणांगण' पाक्षिक चालवत होते आणि नक्षलवादी असण्याच्या केसमध्ये जेलमध्ये जाऊन आलेले; पण नंतर त्यांनी ते सर्व सोडून लेखन-पेपर व 'दलित पँथर' या नवीन झंझावाताला फोकस करून त्यांना मदत करायचं ठरवलं, तर वरळीच्या सनसनाटी सभेचं ते रिपोर्टिंग करायला गेलेले- भलतेच भारावले नामदेवच्या घणाघाती आक्रमक भाषणानं व विचारानं! ते त्याला घेऊनच घरी आले..!




नामदेव ढसाळ व मल्लिका अमर शेख

### एकमेकांशी लोभस नातं

ही नामदेवची माझी पहिली भेट. नंतर अनिलभैयांनी त्याची मुलाखत घेतली. पँथरची भूमिका, त्याचे विचार, त्याची कविता सगळंच विलक्षण, प्रभावी व क्रांतिकारी त्यांना वाटलं. मी मात्र राजकारण, समाजकारण या सर्वांपासून अलिप्त होते. माझं वेगळं जग-त्यात मी मग्न; पण वयाच्या सातव्या वर्षापासून मी कविता

करत होते, इतर कविता वाचत होते. या भेटीनंतर माझ्या मित्रांनी नामदेवच्या कवितेची फार स्तुती केली. मी मनोहरमधली त्याची मुलाखत वाचली, कविता वाचली. बापरे... मी उडालेच. एखाद्या हिंस्र जनावराने पिसाळून झडप घालून आपल्याला जबड्यात घट्ट पकडलं आणि मेंदू चावू लागला तर कसं वाटेल? तसं वाटलं त्याची कविता वाचताना! मी भलतीच प्रभावित झाले. त्याचं रांगडं मर्दानी व्यक्तिमत्त्व, काव्य आणि विचार तर क्रांतिकारक. या सर्वांमुळं मी त्याच्याकडं ओढले गेले. यथावकाश त्याच्याबरोबर भाई-राजा-ज. वि.-अविनाश-अर्जुन-सुनील-बाळ-जयदेवभाऊजी-बादशहा-काळा चंद्या-टकला चंद्या पूर्ण पँथर्सची भलीमोठी फौज! आमच्या संसाराआधी हा संसार मोठाच होता नामदेवसाठी. पैशाची चणचण असूनही त्या सर्वांचं प्रेमळ असणं-वहिनी-वहिनी करत मागं-पुढं फिरणं-त्या सर्वांचं एकमेकांशी नातं खूप लोभस होतं आणि समाजातल्या प्रश्नांसाठी, दुःखासाठी ते डोक्याला कफन बांधून मैदानात उतरलेले. सर्वांचं ध्येय एकच होतं...

पण वरळी दंगलीनंतर अचानक खूप वेगळी विचित्र कलाटणी मिळाली... राजा-नामदेव वेगळे झाले. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप- एका चांगल्या चळवळीला फुटीचं ग्रहण लागलं... नामदेवची कोंडी करू लागले. राजा व त्याच्या बरोबरच्या लोकांनी नामदेवला कम्युनिस्ट ठरवलं... आणि यात मी काहीच करू शकत नव्हते. कदाचित तो मला काहीच सांगत नव्हता. आपल्याच माणसांच्या विरोधात तो लढूही शकत नव्हता... महाभारतातल्या अर्जुनासारखीच अवस्था! त्यात मी आशूच्या वेळी- जडावलेल्या शरीरानं स्वयंपाकपाणी करायचे. पैसे नसल्यानं भांडीवाली बाईपण नाही. आई नामदेवच्या वेड्या झालेल्या... आम्ही पुण्याला गेलो असताना त्यांना कुणी तरी येऊन सांगितलं, की तुझ्या मुलाला व सुनेला मारून टाकलं! अन् त्या धक्क्यानं वेड्या झाल्या..



**पँथरच्या मोर्चा प्रसंगी करमाळा येथील छायाचित्र.**

**...तर सकाळी ७ लाच मोर्चा येऊन थडकला**

त्या खूप आधी- नामदेवनं स्टडीसर्कल घेतलेलं... दहा पदाधिकारी मुंबईचे-पुण्याचे घरी राहायला, जेवायला, रोज तीन-चार वेगवेगळे लोक व्याख्यानाला बोलावलेले- खरं तर मलाही ते ऐकायचं असायचं; पण जेवण-भांडी-चहा यातच वेळ जायचा...

त्यानंतर आम्ही पुण्यात राहिलो. डेक्कनच्या हॉटेलवर रोज रात्री मीटिंग, काम कसं करायचं, पुढची भूमिका, सभा, चर्चा, ११-१२ वाजता मी पेंगाळून झोपायचे. हळूहळू मला राग येऊ लागला. अरे, आमचं आता-आता लग्न झालंय. जरा तरी प्रायव्हसी द्या! नाही. चोवीस तास सगळे हॉटेलच्या त्या एका रूममध्ये. नामदेव तर फारच उत्साही. नामदेव मला फारच कमी वेळ द्यायचा... नंतरही मुंबईत सातरस्त्याला माझ्या घरी येऊन राहिलो. तेव्हा तर सकाळी ७ लाच मोर्चा येऊन थडकला...

जेवणं खावणं झाली, की भल्या मोठ्या टोपात स्टोव्हवर मी खळ बनवायचे. चक्कीवरून खाली पडलेलं पीठ कुणी आणून द्यायचं. मग बादल्या-पोस्टर्स घेऊन नामदेव व त्याचे आठ-दहा कार्यकर्ते टॅक्सी करून १२ वाजता पोस्टर लावायला बाहेर पडत. ते डायरेक्ट सकाळीच यायचे. मी त्याच्या राजकारणात पडायचे नाही. कारण मला ते आवडत नव्हतं... कार्यकर्त्यांसाठी जेवण करणं एवढंच माझं काम राहिलेलं अन् हे कधी दत्त म्हणून उभे राहत. मग रात्री दहाला पण उठून स्वयंपाक करा... नंतर नंतर नामदेवलाच माझी दया आली असावी- मग तो त्यांना घेऊन नवाबकडे जाऊन शिगपराठे

आणायचा. त्याचं रात्री-अपरात्री जाणं मला आवडायचं नाही. त्याबाबतीत मी टिपिकल बायको होते!

पँथरच्या सुरुवातीच्या काळात त्यानं मला चिक्कार फिरवलं! छावण्यांत, वरळी, वडाळा, मायानगर, हॉस्टेल, कामाठीपुरा, पैसे असले तर टॅक्सी-नसले की सरळ चालत... एकदा तो सचिवालय ते वांद्रा विजयनगर इथपर्यंत चालत आलेला.

पण तरी या सगळ्या धुमश्चक्रीत हे सगळे पँथर्स यांना मी 'फणसलोक' म्हणते. मी रागराग केला तरी त्यांनी मला समजून घेतलं. कारण त्यांनाही माहीत होतं... नामदेवचा संसार म्हणजे निखाऱ्यावरून चालणं! साक्षात 'अग्नीपथ'! अन् नामदेव म्हणजे काय! पैसे आले, की बरोबरच्या साऱ्या कार्यकर्त्यांना जेवण, कपडे, चपला- त्यानं कधीच स्वतःचा विचार केला नाही. सतत पँथर... पँथर... का नसावा? ते त्यानं जन्म दिलेलं मूल होतं!

म्हणूनच तर राजासारख्या इगोइस्ट माणसाला ते खटकलं, की आपण तर त्यानं जन्म दिलेल्या 'दलित पँथर'मध्ये राहतोय! म्हणून तर त्यांनी 'मास मुव्हमेंट' काढली! की ज्यात मांस पण नव्हतं, रक्तही नव्हतं! ती 'मार्सेस'मध्येपण गेली नाही.

'दलित पँथर'चा जाहीरनामा घटना ही नामदेवनं लिहिली होती आणि नामदेवच्या विचारांची जडणघडण अन् पिंड, स्वभावधर्म पाहता फक्त तोच ही घटना लिहू शकत होता! आणि 'दलित पँथर' ही संकल्पना फक्त आणि फक्त तोच जन्माला घालू शकत होता! इतर कुणाहीमध्ये ती वैचारिक ताकद नव्हतीच!

हे फार गंभीर विधान मी जबाबदारीनं करतेय. कारण त्यातल्या हरेक क्षणांची मी साक्षी आहे. नामदेवची वैचारिक ताकद ओळखूनच त्याला वेगळं पाडलं गेलं. कारण मग त्याची भाषणं इतकी गाजायची, की त्यांना महत्त्व मिळेना. मग पोटशूळ अन् डोकेदुखी. मग पद्धतशीरपणे नामदेवला बाजूला काढण्याचा गेम खेळला गेला...

पण असं आहे. कपाळावर मारलं किंवा चोळलं तरी तुम्ही त्याचे विचार मारू शकत नाही वा चोरूही शकत नाही. बुद्धिमान माणसाची कितीही कोंडी केली तरी तो त्यातून मार्ग काढतोच!

बाकी सारे मागं राहिले. नामदेव मात्र या साऱ्या छळकपटातून बाहेर पडून 'राखेतून निघालेल्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे' झेपावला-! त्याची 'दलित पँथर' पुन्हा झळाळली. पुनःश्च मोर्चे, मीटिंगा, सभा, इनाम ६ ब च्या जमिनीच्या प्रश्नासाठी मोठा सेमिनार-

कवितांचा अश्वमेधी घोडा तर देशाबाहेर गेला- बर्लिन फेस्टिव्हलमध्ये तो एकटाच भारताचं प्रतिनिधित्व करणारा कवी होता. त्याचे दहा काव्यसंग्रह एकापेक्षा एक सरस-

**खरोखर 'फणसलोक'**

राजकारणात तो विचारी व सकारात्मक होता; पण डँबिस नव्हता. हुजरेगिरी करणारा नव्हता. त्याला कधी डावपेच जमले नाहीत, तो विचारवंत असूनही भोळा सांब होता. त्यामुळं काही लोकांनी त्याचा गैरफायदा घेतला; पण तो सुष्ट, दुष्ट दोघांवर प्रेम करायचा. त्याला फक्त त्याच्या रंजल्या-गांजल्या समाजाचे प्रश्न सोडवायचे होते! हे त्यानं त्याच्या एका लेखात कबूलही केलंय! की 'मला घरावर तुळशीपत्र ठेवायची हौस आणि मल्लिकाला संसार सुरळीत ठेवायची खोड' आता पाहा, कोणत्या बाईला संसारावर तुळशीपत्र ठेवणारा नवरा सहन होईल? तरी पण माझ्या परीनं मी बऱ्याच तडजोडी केल्या- सभा, मीटिंग किंवा निवडणुकीत त्याचा उभं राहण्याचा निर्णय, की माझ्या पोटात गोळा यायचा! पोस्टातली ठेव, सोन्याचा नेकलेस, कानातले सगळं काही स्वाहा! मी आपली पुन्हा लंकेची पार्वती! आता मला काही त्याचं वेड नव्हतं; पण आपण परत खंक



**पँथरच्या बैठकीत बोलताना नामदेव ढसाळ**

ही जाणीव- एकदा तो आजारी असताना मून आलेले. त्या सगळ्या लोकांना नामदेवचं सगळं माहीत असताना त्यानं समाजासाठी जो 'दलित पँथर'चा यज्ञ सुरू केला त्याचं एवढं अप्रूप व अभिमान होता, की त्यांनी आल्या-आल्या वाण्याकडे शंभर किलो गव्हाचे पैसे भरले! आता नुसता गहू कसा खाणार?

मी डोक्याला हात लावून, ते गेल्यावर परत वाण्याकडे जाऊन तेवढ्या पैशात तेल, तांदूळ, डाळी, मसाले, असं सगळं द्यायला सांगितलं!

सांगायची गोष्ट म्हणजे त्यावेळीही मी बंगल्यात राहिले असते. 'कोट्यवधीची माया' गोळा केली असती; पण नामदेव तसा नव्हता! अन् मीही तशी नव्हती! आम्ही 'कोट्यवधी लोकांची माया' गोळा केली! अन् तीच जास्त महत्त्वाची मानली अन् त्या कोट्यवधी पँथर्सनी पण नामदेववर वेड्यासारखं प्रेम केलं. त्याच्या गुणांवरपण, दोषांवरपण- खरोखर 'फणसलोक'! ●●●

**(लेखिका प्रसिद्ध मराठी कवयित्री व नामदेव ढसाळ यांच्या पत्नी आहेत.)**

# पँथर चळवळीतील चढउतार : एक चिकित्सा

**पँथर नेत्यांना आमिषे दाखविण्याचेही कारस्थान विरोधकांनी केले व अशा प्रकारे बाहेरील शक्ती आणि आपापसातील बेबनावापायी पँथर फुटली. पँथर नेते प्रगल्भही नव्हते. सांस्कृतिक संघर्षाच्या नावाखाली हिंदू देवदेवतांची टिंगल टवाळी करून त्यांनी हिंदू समाजालाही विनाकारण दुखावले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कठोर भाषेत बोलत; पण कुणी दुखावले जाणार नाहीत, याची ते काळजी घेत. पँथरनेते विद्रोहाच्या नावाखाली सर्रास शिवराळ भाषेत बोलत राहिले. पुरोगामी शक्तींशी जवळीक न साधता आमचेच नेतृत्व सर्वांनी स्वीकारावे, अशा एकांगी भूमिकेचाही पँथरनेत्यांनी अवलंब केला व पँथर संपली.**



**बी.व्ही. जोंधळे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली धर्मांतर करून आपल्या लक्षावधी अनुयायांसह बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यामुळे दलित विशेषतः बौद्ध समाजात एक अस्मितेची प्रखर ज्योत पेटली. धम्म स्वीकारामुळे मीसुद्धा एक माणूस आहे, म्हणून मला माणसासारखीच समतेची-बरोबरीची सन्मानाची वागणूक मिळावी म्हणून तो बंड करून उठला. बाबासाहेबांची जयंती, त्यांचा स्मृतिदिन साजरा करू लागला. अन्याय-अत्याचाराविरोधी आवाज उठवू लागला. दुसरीकडे, आरक्षणामुळे सुशिक्षित दलित तरुणांचा काही प्रमाणात नोकऱ्यांत शिरकाव झाला. 'अरेला कारे' म्हणण्याची हिंमत दलित समाज दाखवू लागला. एकूणच आंबेडकरी चळवळ व धर्मांतरामुळे दलित व बौद्ध समाजात हे जे अस्मितादर्शक सामाजिक परिवर्तन आले याचा सामंती-सरंजामी-जातीयव्यवस्थेला राग आला नसता, तरच ते नवलाचे ठरले असते.

### अत्याचाराचे राक्षसी प्रकार पाहून दलित तरुण पेटून उठला

एकीकडे दलित समाजात जागा झालेला स्वाभिमान आणि दुसरीकडे याची प्रतिक्रिया म्हणून बुरसटलेल्या सवर्ण समाजाच्या मनात खदखदत असलेला संताप या पार्श्वभूमीवर सामाजिक अभिसरणाच्या नावाखाली झालेल्या काँग्रेस-रिपब्लिकन युतीमुळे रिपब्लिकन कार्यकर्त्यांना लागलेली सत्तेची चटक या संधिकालात दलित समाजावर



दलित पँथरच्या सभेत बोलताना प्रा. अरुण कांबळे. सोबत इतर नेते

वाढत्या प्रमाणात खेडोपाडी अन्याय-अत्याचार होऊ लागले होते. रिपब्लिकन पक्षाने अशा स्थितीत अन्याय-अत्याचारास प्राणपणाने विरोध करण्याऐवजी सत्तेच्या मोहापायी अत्याचारप्रकरणी नाकर्ती भूमिका घेतली. याच काळात म्हणजे सत्तरच्या दशकात केंद्र सरकारने दलितांवरील अन्याय-अत्याचाराचा अभ्यास करण्यासाठी एक अभ्यासगट स्थापन केला होता. या अभ्यासगटाचे अध्यक्ष होते एलिया पेरूमल. या अभ्यासगटाने दलित समाजावरील अत्याचाराची प्रकरणे नोंदवून ती नाहीशी करण्यासाठी काही उपाय सुचविले होते. पेरूमल समितीने आपला अहवाल केंद्र सरकारला ३० जानेवारी १९७० रोजी सादर केला. हा अहवाल इतका भयंकर होता, की तो संसदेच्या पटलावर ठेवण्याची हिंमत केंद्र सरकारला झाली नाही. दरम्यानच्या काळात महाराष्ट्रातही दलित समाजावर वाढत्या प्रमाणात अमानुष-निंदनीय अत्याचार झाले. मराठवाड्यात परभणी जिल्ह्यातील ब्राह्मणगावात विहिरीवर पाणी भरले म्हणून एका दलित महिलेची नग्न धिंड काढण्यात आली होती. तिकडे पुण्यातील इंदापूर बावड्यात दलित समाजावर सामूहिक बहिष्कार टाकण्यात आला होता. अकोला जिल्ह्यातील धाकली गावात जातदांडग्यांनी गवई बंधूंचे डोळे फोडले होते. दलित अत्याचाराचे असे राक्षसी प्रकार पाहून दलित तरुण पेटून उठला व या असंतोषाच्या वणव्यापासून ९ जुलै १९७२ रोजी दलित पँथरचा जन्म झाला.

दलित पँथरने दलितवर्गावरील अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर लढाऊ भूमिका घेताना म्हटले होते, की ''आम्हाला साऱ्या देशाचे राज्य पाहिजे. आमचे लक्ष्य केवळ व्यक्ती नसून व्यवस्था आहे. हृदयपरिवर्तनाने आमच्यावरला अन्याय-अत्याचार आमचे शोषण थांबणार नाही. आम्ही क्रांतिकारक समूह जागे करू, ते संघटित करू'' थोडक्यात, पँथरला समग्र परिवर्तन आणतानाच जगातील शोषित पीडितांशीही नाते जोडावयाचे होते. आंतरराष्ट्रीय वर्णवादाचा-शोषणाच्या व पिळवणुकीचा धिक्कार करावयाचा होता. दलित पँथरने म्हणूनच 'फुले-आंबेडकरवादा'बरोबरच अमेरिकेतील ब्लॅक पँथरपासूनही प्रेरणा घेऊन दलित पँथर जन्माला घातली होती व वर्ग-वर्ण-जात-सामंतशाही-सरंजामी व्यवस्थेविरुद्ध बुलंद नारा देऊन एल्गार पुकारला होता.

**पँथर शिवसैनिकांना पुरून उरले**

नामदेव ढसाळ, ज.वि. पवार, राजा ढाले, भाई संगारे, प्रल्हाद चेंदवणकर, लतीफ खाटीक, अर्जुन डांगळे यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या दलित पँथरने महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनात एक तुफान असे झंझावती वादळ निर्माण केले. स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवानिमित्त पुण्याच्या साप्ताहिक 'साधना'त राजा ढालेंनी लिहिलेल्या 'काळा स्वातंत्र्य दिन' या लेखामुळे तर महाराष्ट्रात वादळी कहर झाला. 'साधना' साप्ताहिकावर मोर्चे नेऊन व राष्ट्रध्वजाचा अपमान केल्याची सबब सांगून मोर्चेकऱ्यांनी 'संपादकांनी माफी मागावी' अशी मागणी केली. पोलिसांत गुन्हे नोंदविण्यात आले व पँथर महाराष्ट्रभर चर्चेला आली. पँथरच्या वादळी सभा, त्यांनी केलेले गीतादहन, शंकराचार्यांच्या दिशेने भिरकावलेला जोडा, जाहीर सभांतून देवदेवतांची केलेली निर्भर्त्सना यामुळे पँथरच्या बेदरकार कार्यशैलीची सर्वदूर चर्चा होऊ लागली. जिथे कुठे दलित समाजावर अत्याचार होई, तिथे धाऊन जाऊन पँथर्स 'जशाच तसे' उत्तर देऊ लागले. दलित विद्यार्थी शिष्यवृत्तीवाढ आंदोलन, बेकारीचा प्रश्न, मंडल आयोगाच्या शिफारसी अमलात



**आंदोलनात जखमी झालेला पँथर**

याव्यात म्हणून पँथर्सनी उग्र आंदोलने केली. नामांतर आंदोलन ज्या नेटाने पँथर्सनी लढवले, ते तर नामांतर लढ्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहावे इतके तोलामोलाचे ठरले. शिवसेनेला विरोध करण्याची हिंमत जेव्हा कुणी करत नव्हते, तेव्हा शिवसेनेशी पंगा घेऊन जी मर्दुमकी पँथरने दाखविली, ती तर महाराष्ट्राच्या राजकीय-सामाजिक जीवनात अभूतपूर्व अशीच ठरली. यासंदर्भात वरळी दंगलीचा उल्लेख करणे अप्रस्तुत ठरू नये. मुंबईत झालेल्या एका पोटनिवडणुकीसंदर्भात दलित पँथरची भूमिका स्पष्ट करण्यासाठी वरळीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानावर ५ जानेवारी १९७४ रोजी एक जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. दलित समाजावर दररोज जे अनन्वित अत्याचार होतात त्यांचा निषेध करून निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याची भूमिका या सभेत जाहीर करण्यात येणार होती. याचा फटका सत्ताधारी पक्षाला बसणार होता म्हणून

सत्ताधारी पक्षाला प्रचंड राग आला होता. सभेत नामदेव ढसाळ त्यांच्या आक्रमक शैलीत जेव्हा बोलू लागले तेव्हा शिवसैनिकांनी सभेवर दगडफेक सुरू केली. यावेळी दंगेखोर शिवसैनिकांना आवरण्याऐवजी पोलीस चक्क बघ्याच्या भूमिकेत गेले. नंतर राजा ढाले बोलावयास उभे राहिले. त्यांनी आपल्या भाषणात दगडफेक करणाऱ्या शिवसैनिकांना आव्हान देताना ठणकावले, की हिंमत असेल तर समोर येऊन हल्ला करा. ढालेंच्या भाषणामुळे वातावरण अधिकच तापले. पोलिसांनी शिवसैनिकांना सोडून सभेतील निष्पाप लोकांनाच मारहाण केली. राजा ढालेनांही बेदम मारहाण करण्यात आली. या सभेतील पोलिसी अत्याचाराचे तीव्र पडसाद मुंबईच्या वरळी, नायगाव, दादर, परळ, भायखळा, लालबाग आदी परिसरात उमटले. सर्वत्र दंगलसदृश स्थिती निर्माण झाली. वरळीत तर दंगलच पेटली. तेव्हा झालेल्या पोलिसी गोळीबारात चर्मकार समाजातील एक तरुण रमेश देवरूखकर हा गोळीबारात ठार होऊन शहीद झाला. या घटनेच्या निषेधार्थ दलित पँथर व डाव्या संघटनांनी १० जानेवारी १९७४ ला नायगाव दादर येथून एक प्रचंड मोर्चा काढला होता. हा निषेध मोर्चा परळ भागातून जात असता मोर्चावर शिवसैनिकांनी प्रचंड दगडफेक सुरू केली. एका इमारतीवरून दगडी पाटा फेकला गेला. तो पाटा भागवत जाधव या तरूणाच्या डोक्यावर पडून भागवत जाधवही शहीद झाला. पँथर व शिवसैनिकांत मग तुफान हाणामारी झाली. पँथर शिवसैनिकांना पुरून उरले व पँथरचा झंझावात सर्वदूर पसरला. तो इतका, की गुजरात, तामिळनाडू, दिल्ली, कर्नाटक, पंजाब आदी राज्यांमध्येही पँथर चर्चेला येऊन पँथरच्या शाखा-संघटना उभ्या राहू लागल्या.

**...तर राजा ढालेंनी पँथरच बरखास्त करून टाकली**

दलित पँथरचे नेते नामदेव ढसाळ, राजा ढाले, ज.वि. पवार, अर्जुन डांगळे, प्रभृती मंडळी ही लेखक-कवी-साहित्यिक असल्यामुळे त्यांनी पँथरचा इतिहास वगैरे लिहून काढला. तोही वादग्रस्त ठरला, (उदा. ज.वि. पवार, अर्जुन डांगळे वाद) पण असे जरी असले, तरी मराठवाड्यात दलित पँथरने जो सामाजिक न्यायाचा संघर्ष केला त्याचा तपशील मात्र फारसा कुठे पाहावयास वा वाचावयास मिळत नाही. राजा ढाले, नामदेव ढसाळ यांच्या नामदेव ढसाळांचा जाहीरनामा की राज ढालेंचा नामाजाहीर या पुस्तिकारूपी भूमिकेवरून वाद होऊन जेव्हा पँथर फुटली व राजा ढालेंनी पँथरच बरखास्त करून टाकली, त्यावेळी रामदास आठवले, अरुण कांबळे, उमाकांत रणधीर, नाना रहाटे, दयानंद मस्के, गंगाधर गाडे, रामचंद्र माने, ॲड. प्रीतमकुमार शेगावकर, टी.एम. कांबळे, एस.एम. प्रधान यांनी औरंगाबादेत एक बैठक घेऊन राजा ढालेंचा पँथर बरखास्तीचा निर्णय धुडकावून लावून भारतीय दलित पँथरची स्थापना केली. या भारतीय दलित पँथरचा झेंडा खांद्यावर घेऊन जो लढा व त्याग मराठवाड्यातील पँथर्सनी केला त्यास विनम्रभावे सलाम करावा या तोडीचा आहे, हे विशेष.

**अनेकदा प्रश्न पडे, की आपण राजा आहोत की पोतराजा?**

यासंदर्भात नांदेडचे दिवंगत पँथर एस.एम. प्रधान एका मुलाखतीत म्हणतात, ''दौऱ्यांवर जाण्यासाठी पैसे नसत. बी ॲण्ड सीचे अधिकारी साहेबराव गायकवाड व थोरात (नांदेड) कसे तरी सर्व



**पँथरचे कार्यकर्ते तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींना भेटले असता**


## एक होता पँथर – संपादक प्रकाश मोगले

मराठवाड्यातील दलित पँथर्सनी खेडोपाडी दीनदुबळ्या दलित समाजास अभय देऊन त्यांच्यात विश्वास निर्माण केला. ज्या खेडेगावात दलित बांधवांवर धनदांडग्या जातबांधवांकडून अत्याचार व्हायचा तिथे पँथर्स धाऊन जात आणि अत्याचार करणाऱ्या प्रवृत्तीस जशास तसे उत्तर देत. पँथर्स येत आहेत असे कळले, की दलितांवर अत्याचार करणारे जातदांडगे गाव सोडून पळ काढीत असत, असा दरारा पँथर्सनी मराठवाड्यात निर्माण केला होता. नामांतर ठरावाच्या दंगलीनंतर मुंबईत जो पँथर्सचा विराट मोर्चा निघाला होता, त्या मोर्चात एस.एम. प्रधान यांच्या नेतृत्वाखाली दहा हजारांहून अधिक मोर्चेकरी सहभागी झाले होते. मोर्चात सर्वांत पुढे नांदेडचे लोक होते. पोलिसांनी मोर्चातील स्त्री-पुरुष, मुलांना प्रचंड मारहाण केली. अरुण कांबळे व एस.एम. प्रधान यांच्यावर पोलिसांचे विशेष लक्ष्य होते. मराठवाड्यात औरंगाबाद, लातूर, उस्मानाबाद आदी ठिकाणीसुद्धा नामांतरासाठी पँथर्सनी विराट मोर्चे आयोजित केले. या मोर्चांचे वैशिष्ट्य असे, की सर्वच मोर्चांतून स्त्रियांचा सहभाग मोठा होता. मंत्र्याच्या गाड्यापुढे स्त्रियांनी आपल्या तान्हुल्यांसह उड्या मारल्या. गंगाधर गाडे, ॲड. प्रीतमकुमार शेगावकर, यशपाल सरवदे, रमेशभाई खंडागळे, रतनकुमार पंडागळे, मिलिंद शेळके, बाबूराव कदम, नांदेडचे सुरेश गायकवाड, गणेश जोगदंड, सदानंद जोंधळे, दादाराव कयपाक, एन.पी. कांबळे, मोहन प्रधान, चंद्रकांत ठाणेकर, तुळसाबाई सोनवणे, अनुसयाबाई काटकळंबे, अशा किती तरी ज्ञान-अज्ञात पँथर्सनी नामांतरासाठी जिवाची बाजी लावली. नामांतरासाठी मराठवाड्यातील पँथर्सनी जो संग्राम केला त्यात कित्येकांच्या प्राणांच्या आहुत्या पडल्या. नांदेडचे जनार्दन मवाडे, पोचीराम कांबळे यांना हौतात्म्य पत्करावे लागले, तर नांदेडच्याच पँथर गौतम वाघमारेंच्या आत्मदहनामुळे नामांतराचा तिढा अखेर मार्गी लागला. आत्माराव साळवेंसारख्या बीड जिल्ह्यातील व माजलगाव तालुक्यातील भटवडगाव येथे जन्मलेल्या या शाहिराने आपल्या शाहिरीने पँथर चळवळीस ऊर्जा देणारी शाहिरी जन्मास घातली.

कर्मचाऱ्यांकडून पैसे गोळा करून आणून द्यायचे. चालत्या गाडीत चढावे लागे. रेल्वेत पेपर टाकून झोपावे लागे. रात्र-रात्र जागरण करावे लागे. उभे राहून प्रवास करावा लागे, लागोपाठ प्रवास व जागरणामुळे प्रकृतीवर वाईट परिणाम व्हायचा. कधी-कधी आम्हाला जेवण मिळत नसे. जेवायला पैसे नसायचे. हे करत असताना नेतृत्वाचा मुकुट डोक्यावर होता. काटे बाकीच्यांना दिसत नव्हते. अनेकदा प्रश्न पडे, की आपण राजा आहोत की पोतराजा? पण आंदोलने-सभा-गर्दी या कामात हा विचार करायला वेळ नव्हता. माझ्यावर आंबेडकरी जनतेचे फार प्रेम होते. जगातील फार थोड्या नेत्यांच्या वाटेला असे प्रेम आले असेल.''

**दलित पँथरच्या उभारणीत आणि विस्तारात एस.एम. प्रधानांचा मोलाचा सहभाग**

मराठवाड्यात पँथर चळवळीत ज्या अनेकांनी आपल्या आयुष्याची राखरांगोळी करून आपली आयुष्ये उधळून दिली



त्यातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे नांदेडचे एस.एम. प्रधान. एस.एम. प्रधानांबाबत मंत्री रामदास आठवले लिहितात, ''दलित पँथरच्या उभारणीत आणि विस्तारात एस.एम. प्रधान याचा मोलाचा सहभाग होता. माझी लीडरशिप वाढवण्यामध्ये एस.एम. प्रधानचा मोठा सहभाग होता. आपल्या कुटुंबाकडे, तब्येतीकडे दुर्लक्ष करून बेभानपणे काम करणारा एस.एम. हा एक आदर्श कार्यकर्ता होता. मोर्चा मग तो मुंबईत असो, की दिल्लीत, त्या मोर्चात नांदेड जिल्ह्यातून जोपर्यंत एस.एम. प्रधान लोक आणीत नाही, तोपर्यंत मोर्चाला प्रचंड, भव्य स्वरूप यायचे नाही.'' दलित पँथरची पन्नाशी म्हणजेच पँथरचा सुवर्ण महोत्सव यंदा आपण साजरा करीत आहोत. पँथरच्या पन्नाशीचे पुनरावलोकन करताना हे लक्षात येते, की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर सोळा वर्षांनी जन्मास आलेल्या पँथरने आंबेडकरी चळवळीला एक आक्रमक आणि आश्वासक रूप दिले. अन्याय, अत्याचार, जुलुमाचा ताकदीने मुकाबला करण्याचे बळ दिले. दलित समाजातील तरुणांना जुलमी समाजव्यवस्थेविरुद्ध लढण्याची बंडखोर विद्रोही प्रेरणा दिली; पण हाय! आंबेडकरी चळवळीला ज्या फाटाफुटीच्या शापाने ग्रासले आहे, तो दुहीचा शाप अखेर दलित पँथरलासुद्धा भोवला आणि पँथर फुटली, दुभंगली. देशभर दलित समाजावर होणारे क्रूर अत्याचार आणि असे अत्याचार होत असताना रिपब्लिकन नेत्यांनी अंगीकारलेला नाकर्तेपणा याचा निषेध करत जी पँथर उदयाला आली त्या पँथरच्या जन्मदात्यांनीसुद्धा आपले पाय अखेर मातीचेच आहेत, हे सिद्ध करून दाखविले. पँथरच्या फुटीस मार्क्सवाद की आंबेडकरवाद हे निमित्त जरी घडले असले, तरी एवढ्याच एकमेव कारणाने पँथर फुटली, असे म्हणता येत नाही, तर पँथरनेत्यांचे अहंकार-नेतेगिरीच्या सोसातूनही पँथर फुटली. इतकेच नव्हे, तर राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांनी एकमेकांवर पैशांच्या अफरातफरीचे आरोपही जाहीरपणे केले. रिपब्लिकन पुढाऱ्यांच्या नावे शंख करणारे पँथरनेते पुढे एवढे प्रवाहपतित झाले, की रिपब्लिकन नेत्यांवर ताण करणाऱ्या अभद्र राजकीय युत्या त्यांनी आंबेडकरविचार विरोधी पक्षांशी केल्या. पँथरनेते काँग्रेस वा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशीच युती करून थांबले नाहीत, तर पुढे त्यांनी निर्लज्जपणे शिवसेना-भाजपाशीही घरोबा केला. दलित समाजाला अन्यायाविरुद्ध झुंजारपणे लढण्याचे बळ देणाऱ्या दलित पँथरचे हे असे मातेरे का झाले? पँथर नेत्यांची चीड, त्यांचा उद्रेक, त्यांचा संताप जरी खरा असला, तरी पँथर नेत्यांकडे प्रगल्भता, प्रौढपणा नि शहाणपणाचा अभाव असल्यामुळे पँथरवाले जसे आले तसेच ते संपूनही गेले, असे म्हटले तर फारसे गैर ठरू नये.

**जो बुद्धिस्ट, तोच खरा पँथर**

दलित पँथरमध्ये फूट पडण्याचे एक वैचारिक कारण असे, की नामदेव ढसाळांना भारतीय समाजातील वास्तव समजून घेताना जातीबरोबरच वर्गाचाही विचार व्हावा, असे वाटत असल्यामुळे आंबेडकरवादाबरोबरच ते मार्क्सवादाचीसुद्धा सांगड घालीत होते. याचा अर्थ ते आंबेडकरवादाला दुय्यम लेखत होते, असे नाही. काँग्रेसी राज्यात दलितांचे शोषण होते, काँग्रेसी राज्यात दलित समाजावर अन्याय-अत्याचार होतात म्हणून काँग्रेस पक्षाशी युती करायलाही ढसाळगट तयार नव्हता. जात आणि वर्ग लढ्याची सांगड घालून समग्र परिवर्तनशील लढा उभारण्याची ढसाळांची मागणी होती. अर्थात, ती फारशी चूक होती, असे म्हणता येत नाही. याउलट राजा ढालेंची भूमिका होती. त्यांच्या मते, समाजपरिवर्तनासाठी आर्थिक प्रश्नांपेक्षा सांस्कृतिक प्रश्न महत्त्वाचे आहेत. म्हणजेच सामाजिक परिवर्तनासाठी धर्मांतरासारखे उपाय योजावेत, असे ढालेंना वाटत होते. राजा ढालेंनी १९७८ साली पँथर बरखास्त करून जी मास मुव्हमेंट काढली तिचे उद्दिष्ट बौद्ध धम्माद्वारे सांस्कृतिक क्रांती घडवून आणणे हेच होते. जातिव्यवस्था-वर्णव्यवस्था मोडीत सामाजिक समता, स्वातंत्र्य, बंधुभाव या मानवी मूल्यांची प्रस्थापना करण्याबाबत बुद्ध विचारांचे सांस्कृतिक महत्त्व जरूर आहे; पण याचा



मुंबईतील पँथरचा मोर्चा

अर्थ वर्गलढा दुय्यम मानावा, असा नव्हे. याचे भान राजा ढालेंना फारसे नसावे, असे वाटते. म्हणून त्यांनी सामाजिक बदलासंदर्भात काहीशी एकांगी-संकुचित भूमिका घेतलेली दिसते. बौद्ध धर्माद्वारे सांस्कृतिक क्रांती करून सामाजिक परिवर्तन करावे, असे सांगणारे राजा ढाले बौद्ध धर्माच्या प्रतीकांचा वापर करताना सर्व जातींतील लोकांची वर्गीय एकजूट कशी करता येईल, याबाबत मात्र मौन पाळून होते. त्यांच्या भूमिकेत पुरेशी स्पष्टता कुठेच दिसत नाही. पँथरच्या काही नेत्यांनी 'जो बुद्धिस्ट, तोच खरा पँथर' अशी भूमिका घेऊन जनसामान्यांची विश्वासार्हता न मिळविता आपले नेतृत्व कसे शाबूत राहील, याचीच काळजी घेतली.

**सांस्कृतिक कार्यक्रमावरच पँथरचा खरा भर राहिला**

दलित पँथरने सुरुवातीच्या काळात लोकजीवनाच्या प्रश्नावर काही लढे जरूर उभारले. जॉर्ज फर्नांडिस यांनी १९७४ साली देशव्यापी रेल्वे कामगारांचा जो लढा उभारला होता, त्यास नामदेव ढसाळ गटाने पाठिंबा दिला होता. १९७८ साली दिल्लीत नामांतर प्रश्नी मोर्चा काढून सत्ताधाऱ्यांचे धाबे दणाणून सोडले होते. खरे तर, सामाजिक परिवर्तनासाठी पँथरने जो आर्थिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आखला होता त्यापैकी आर्थिक प्रश्नावर फारसे लढे उभारण्याऐवजी सांस्कृतिक कार्यक्रमावरच पँथरचा खरा भर राहिला. शेतकरी-शेतमजूर-आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या प्रश्नाकडे पँथरने पुरेसे लक्ष दिले नाही. यासंदर्भात नामदेव ढसाळ म्हणतात, ''दलित पँथर ही समाजातील सर्व दलितांना वर्गाच्या पातळीवर संघटित करू शकली नाही. याचा परिणाम असा झाला, की शासक वर्गाविरुद्ध संघर्ष उभारण्यासाठी जे समाजाचे पोलरायझेशन (वर्ग विभाजन) हवे होते, ते पँथर करू शकली नाही.''

**दलित चळवळ खच्ची करण्यासाठी विरोधकांचे प्रयत्न**

पँथर फुटीचे अजून एक कारण असे, की काही बाहेरील हितसंबंधी शक्तींनीसुद्धा पँथर फोडण्याचे प्रयत्न केले व त्यात ते यशस्वीसुद्धा झाले. दलित चळवळ सबळ होऊ नये, ती फुटावी, तिची शक्ती आपापसात लढण्यात खच्ची व्हावी, ती सत्तेच्या दिशेने जाऊ नये, यासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष असे प्रयत्न विरोधकांनी केले. पँथर नेत्यांना आमिषे दाखविण्याचेही कारस्थान विरोधकांनी केले व अशा प्रकारे बाहेरील शक्ती आणि आपापसातील बेबनावापायी पँथर फुटली. पँथर नेते प्रगल्भही नव्हते. सांस्कृतिक संघर्षाच्या नावाखाली हिंदू देवदेवतांची टिंगल टवाळी करून त्यांनी हिंदू समाजालाही विनाकारण दुखावले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कठोर भाषेत बोलत; पण कुणी दुखावले जाणार नाहीत, याची ते काळजी घेत. पँथरनेते विद्रोहाच्या नावाखाली सर्रास शिवराळ भाषेत बोलत राहिले. पुरोगामी शक्तींशी जवळीक न साधता आमचेच नेतृत्व सर्वांनी स्वीकारावे, अशा एकांगी भूमिकेचाही पँथरनेत्यांनी अवलंब केला व पँथर संपली.

दलित पँथरची यंदा पन्नाशी आहे. पँथरचा सुवर्ण महोत्सव आपण साजरा करीत आहोत. हरकत नाही; पण सुवर्ण महोत्सव साजरा करीत असताना भूतकाळात किती रमायचे व भविष्यात चळवळ कशी बांधावयाची या अनुषंगाने चिंतन व्हावे, ही अपेक्षा. दुसरे काय?

**(लेखक आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)**




मे २०२२ रोजी नांदेड येथे आयोजित केलेल्या पँथर परिषदेतील छायाचित्र
सहभाग अमेरिकन ब्लॅक पँथरचे हॅन्ड्री गॅडीस व भारतीय दलित पँथरचे सहसंस्थापक ज. वि. पवार आणि इतर

# दलित पँथरच्या पन्नाशीतील प्रेरणादायी परिषद

आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळीने परिवर्तनाच्या चळवळीला गतिमान करणाऱ्या ज्या अनेक गोष्टी दिल्या त्यात दलित साहित्य आणि दलित पँथर याचे स्थान अत्यंत ठळक आणि अनन्य आहे. १९७२ साली परिस्थितीच्या रेट्यातून आणि अपरिहार्य अशा सामाजिक गरजेतून दलित पँथरची स्थापना झाली. आंबेडकरवाद हेच पँथरचे अधिष्ठान होते. राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांची ठळक नाममुद्रा जरी या संघटनेवर उमटलेली असली तरी , हजारो तरुणांच्या त्याग, संघर्ष आणि परिश्रमातून पँथरची चळवळ विकासमान झाली हे कदापि विसरून चालणार नाही. १९७७ मध्ये ही संघटना बरखास्त करण्यात आली हे खरे पण नंतर भारतीय दलित पँथर आणि त्याही पुढे वेग वेगळ्या नावांनी पँथर चळवळ सुरु राहिली. पँथरच्या स्थापनेचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. आज प्रतीगामी शक्तींचा जोर वाढत आहे. लोकशाही मूल्य राजरोजपणे पायदळी तुडविल्या जात आहेत. संविधान धोक्यात आले आहे. अशावेळी पँथर सारख्या लढाऊ संघटनेची तीव्रतेने आठवण होणे, स्वाभाविक म्हटले पाहिजे. शिवाय आज आपण केवळ सुटा प्रांत, सुटा देश म्हणून या सगळ्या घडामोडींकडे पाहावे, अशी परिस्थिती नाही. आज



डॉ. राजेंद्र गोणारकर

आपण एका विश्व ग्रामचे घटक आहोत. म्हणून जगभरातील वंचितांचे प्रश्न जसे स्थानिक आहेत तसे त्याला वैश्विक संदर्भ देखील आहेत. त्यामुळे केवळ पृथकपणे या समस्यांकडे, प्रश्नांकडे न पाहता एका व्यापक परिप्रेक्षात पाहणे अधिक संयुक्तिक आहे. हा दृष्टिकोन डोळ्यापुढे ठेवून युवा पँथर राहुल प्रधान आणि सहकार्यांनी नांदेड येथे दिनांक २८,२९ मे २०२२ रोजी ब्लॅक पँथर आणि दलित पँथर आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन केले.

या परिषदेत अमेरिकन ब्लॅक पँथरचे हॅन्ड्री गॅडीस, मायकेल मॅककार्टी, जोकोबी विल्यम्स, दलित पँथरचे नेते ज.वि. पवार, भारती प्रभू (चेन्नई),प्रा. इंदिरा आठवले यासह देश विदेश आणि भारताच्या विविध भागातून अभ्यासक,कार्यकर्ते उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तरुण अभ्यासक व नांदेडचे भूमिपुत्र डॉक्टर सुरज मिलिंद एंगडे यांनी ऑनलाईन द्वारे केलेल्या आपल्या उद्घाटकीय भाषणात परिषद आयोजना मागची भूमिका विस्ताराने विशद केली, ते म्हणाले,

ब्लॅक पँथरची निर्मिती ही अमेरिकन साम्राज्यवाद आणि वंशवादाच्या विरोधातून झाली. तर आंबेडकरी समतावादी चळवळीच्या पार्श्वभूमीवर जात, वर्गीय दमन नष्ट करण्यासाठी दलित पँथरची स्थापना झाली. दलित पँथर ही संघटना आक्रमक आणि लढाऊ होती. पण दलित पँथरने बंदुका हातात घेतल्या नाहीत, तर त्यांनी संविधानाच्या चौकटीत न्यायाची लढाई लढली. पँथरच्या अहिंसेला कमजोरी संबोधायचे आणि गुजराती बनियाच्या अहिंसेला संतत्व बहाल करायचे, हा दुटप्पीपणा आहे. पँथरचा वारसा हा बुद्धाचा आणि अशोकाचा आहे. जॉर्ज फ्लाईड या कृष्णवर्णीय व्यक्तीच्या छातीवर गुडघा दाबून एका पोलीस अधिकाऱ्याने त्याचा खून केला . याचा निषेध करण्यासाठी भारतातील दलित मोठ्या प्रमाणात पुढे आले. ही कृष्णवर्णीय आणि दलित लोकांमधील सहोदरत्व व एकात्मता आहे. हीच भावना कृष्णवर्णी यांनी दलित अत्याचाराच्या वेळी व्यक्त करावी, ही अपेक्षा डॉ. सुरज एंगडे यांनी व्यक्त केली.

अमेरिकन ब्लॅक पँथर हॅन्ड्री गॅडीस यांनी, ''तुम्ही क्रांतिकारकाला मारू शकता क्रांतीला नाही.'' आघाडीचा शहीद ब्लॅक पँथर फ्रेड हॅम्प्टन यांचे हे वाक्य उद्धृत करून न्यायाची लढाई कष्टदायी असते, असे सांगितले. अमेरिका देश हा डेमॉक्रेटिक आणि रिपब्लिकन अशा दोन पक्षांपैकी कुणास निवडावे, या दुविधेत आहे. कारण एक पक्ष मूर्खांचा आहे आणि दुसरा सैतानाचा. आजचे लोकप्रतिनिधी विकल्या गेल्या आहेत. खरंतर क्रिकेटर जसे आपल्या टी-शर्टवर विविध कंपन्यांचे लोगो लावतात. तसे लोकप्रतिनिधींनी देखील आपल्या कपड्यांवर लोगो चिकटवून घ्यावेत. जेणेकरून लोकांना कळेल की यांना कोणी विकत घेतले आहे. हॅन्ड्री गॅडीस यांनी ब्लॅक पँथरच्या चळवळीला इतर लोकांचा कसा पाठिंबा मिळवला याची माहिती दिली. ब्लॅक पँथरचे मायकेल मॅककार्टी हे कार्यकर्ते कथाकार म्हणूनही प्रसिद्ध आहेत. त्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कथन शैलीने उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. आपण न्यायासाठी संघर्षात याआधीही सोबत होतो. आजही सोबत आहोत आणि या पुढच्या संघर्षातही आपण बहीण भाऊ म्हणून एकत्रितपणे लढत राहू. अखेरचा माणूस स्वतंत्र होईपर्यंत!

दलित पँथरच्या संस्थापका पैकी एक नेतृत्व ज. वि. पवार यांनी कृष्णवर्णीयांचा इतिहास चारशे वर्षांचा आहे. तर दलितांच्या मानवमुक्तीचा लढा हजारो वर्षांपासूनचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे नोंदविले आहे की कृष्णवर्गीयांचं आणि दलितांचे दुःख सारखं आहे. हे दुःख हे शोषण संपण्यासाठी आपण एकत्र यावे. ब्लॅक पँथरच्या प्रभावातून जगभरात सहा पँथर संघटना निर्माण झाल्या. दलित पँथरची सुरवातीची तीन वर्षे अत्यंत लढाऊ होती. प्रत्येक पँथर आपल्या कपाळावर मरणपट्टी बांधूनच घराबाहेर पडत असे. रस्त्यावरची लढाई आणि त्याग हे दोन गुण दलित पँथर आणि ब्लॅक पँथर मध्ये समान होते. यापुढेही वंचितांचे प्रश्न एकत्रितपणे सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध होऊ या, असे आवाहन ज.वि. पवार यांनी केले.

प्रा. इंदिरा आठवले यांनी परिषदेत आपली भूमिका मांडतांना चळवळ उत्सवी झाली आहे, या बद्दल खंत व्यक्त केली. उत्सवात विचार हरवून जातो. चळवळ ही विचारांवरच उभी राहू शकते, या गोष्टीचा विसर पडल्यामुळे आज समाज संभ्रमावस्थेत आहे. ही विचारांची लढाई आहे, त्यामुळे समतेच्या आड येणाऱ्या स्वकीयांशी देखील लढण्याची तयारी ठेवावी लागेल, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

या परिषदेत अमेरिकन प्राध्यापक जोकोबी विलियम्स, संशोधक तरुणी सिडनी पॅटरसन, भारती प्रभू (चेन्नई), राहुल सोनपिंपळे (जे एन यू ), गौरव सोमवंशी, डॉ. दिलीप चव्हाण (नांदेड ), साहेबराव सदावर्ते ( भोपाळ) यांनी देखील दलित पँथरच्या चळवळीचे योगदान नोंदविले. तसेच आजच्या काळातील चळवळीपुढील आव्हानांचे साधार विवेचन केले. भीम आर्मीचे अध्यक्ष चंद्रशेखर आजाद यांचे विशेष व्याख्यान हे या परिषदेचे आकर्षण ठरले. माझ्या भीम आर्मीची प्रेरणा ही दलित पँथरच आहे. बाबासाहेबांनी सांगितले होते, की संविधान आहे तोवर मी आहे. आज संविधान संपविण्याचे षड्यंत्र चालू आहे. म्हणजे बाबासाहेबांना मारण्याचा कट केला जात आहे. सिस्टीम विकण्याचे काम चालू आहे. संविधानाने दिलेले स्वातंत्र्य हिरावून घेऊन बहुजनांना पुन्हा एकदा गुलाम करण्याचे कारस्थान केल्या जात आहे. अशा वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदर्शांना वाट पुसत, संविधानात्मक साधनाचा वापर करून हे कारस्थान उधळून लावण्याचा संकल्प करा. हे चंद्रशेखर आझाद यांचे कळकळीचे सांगणे उपस्थितांना अंतर्मुख करून गेले.

या परिषदेत सांस्कृतिक कार्यक्रमाची देखील रेलचेल होती. अस्मितेचा जागर ब्लू प्राईड कार्निवल २०२२ असे अर्थपूर्ण शीर्षक असलेला हा महोत्सव वैचारिक मेजवानी इतकाच प्रभावी राहिला. प्रसिद्ध नाट्यकर्मी राहुल जोंधळे लिखित व दिग्दर्शित '' निळी टोपी '' या नाटकाचे सादरीकरण अप्रतिम होते. अनादी काळापासून चालत आलेले जातीय दमन बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार वादळाने कसे ध्वस्त झाले. बुद्ध विचार हाच मानव मुक्तीचे अंतिम आश्रयस्थान कसे आहे, याचे नेमके मर्म या नाटकाने ताकदीने उलगडून दाखविले. तर अण्णा भाऊ साठे यांच्या स्मशानातलं सोन ह्या सुप्रसिद्ध कथेचे नाट्य रुपांतर प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेणारे होते. या एकांकिकेचे दिग्दर्शन रावबा गजमल यांनी केले. नितीन चंदनशिवे, सचिन डांगळे, सागर काकडे, अतुल खरात यांच्या कविता लक्षवेधी होत्या. तर चरण जाधव यांनी डफावर सादर केलेली, नामदेव ढसाळ यांची 'माणसाने' ही कविता अत्यंत प्रभावी होती. नागराज मंजुळे दिग्दर्शित ''पिस्तुल्या'' आणि अमित नरवाडे दिग्दर्शित ''कातडं'' हे लघु चित्रपट देखील या परिषदेत दाखविण्यात आले. चित्रप्रदर्शन, रांगोळ्या , पुस्तक प्रदर्शन यातील वेगळे पणामुळे देखील ही परिषद वैशिष्ट्यपूर्ण ठरली.

मंचावर निळ्या आसमंतात कोरलेली ''जयभीम'' ही अक्षरे आणि सभागृहात पुन्हा पुन्हा निनादणारा ''जयभीम'' चा घोष आणि विचार समृद्ध करणारे प्रबोधन यामुळे ब्लॅक पँथर आणि दलित पँथर आंतरराष्ट्रीय परिषद ही प्रागतिक चळवळीच्या पुढील वाटचालीसाठी प्रेरक ठरेल यात शंका नाही. ●●●

**(लेखक स्वा. रा. तिर्थ विद्यापिठात वृत्तपत्र विद्याविभागात प्राध्यापक आहेत.)**

# जातीयवाद अजूनही आहे

जी.के. ऐनापुरे

**दलित पँथर चळवळीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली कादंबरी 'अभिसरण' (२००२) चे लेखक जी.के. ऐनापुरे यांची सागर कांबळे यांनी घेतलेली मुलाखत**

**सागर कांबळे : 'अभिसरण' ही आंबेडकरी चळवळीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली कादंबरी आहे. नेमकेपणानं सांगायचं तर दलित पँथरचा आणि त्यानंतरचा चळवळीचा काळ केंद्रस्थानी ठेवून ही कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीच्या निर्मितीविषयी, ही कादंबरी लिहिण्याच्या निर्णयापर्यंत तुम्ही कसे आला ते सांगा. कादंबरीचं वैशिष्ट्य असं, की ही कादंबरी लिहिताना तुम्ही एखादं सरळसोट कथानक न लिहिता एका वेगळ्या प्रकारच्या शैलीचा वापर केलेला आहे. कादंबरीतील पात्रं म्हणजे चळवळीतील महत्त्वाची नेतृत्व आ–हेत. त्यांच्या माध्यमातून तुम्ही कथन केलेलं आहे. त्यामुळं वेगवेगळे आयाम या कादंबरीत समाविष्ट झालेले आहेत आणि प्रत्येक आयाम जो नेतृत्वाची भूमिका म्हणून कादंबरीची पात्रं मांडतात, तितक्याच ताकदीनं समाविष्ट झालेला आहे.**

**सागर कांबळे : या शैलीच्या निवडीविषयीही सांगा.**

**जी.के. ऐनापुरे :** पहिल्यांदा थोडी पार्श्वभूमी सांगतो. माझं कुटुंब गिरणगावात राहत होतं. हा चळवळीचा एरिया. तिथं सारख्या घडामोडी घडत राहायच्या. त्याचा एक अदृश्य दाब आमच्यावर होता. सातत्यानं तुम्ही वर्तमानकाळात राहिलं पाहिजे, असा तो अदृश्य दाब होता. १९६६ ला शिवसेना गिरणगावात स्थापन झाली, ज्याला मी बाहेरचं गिरणगाव म्हणतो. जे चर्चगेट हायवेला लागतं. त्या एरियाच्या पुढच्या भागात दलित पँथर १९७२ मध्ये स्थापन झाली. या दोन्ही संघटना फक्त सहा वर्षांच्या अंतरानं स्थापन झाल्या. एका संघटनेचं राजकीय पक्षामध्ये रूपांतर झालं, त्या संघटनेचा मुख्यमंत्री झाला, तर दुसऱ्या संघटनेला असं यश मिळालं नाही. हे यश का मिळालं नाही?...

'अभिसरण' मी ज्या काळात लिहिली, त्या काळात ही चर्चा होत होती. मी ही कादंबरी लिहायला घेतली तेव्हा दोन गोष्टी माझ्या समोर होत्या. माझ्या भावाचा प्रत्यक्ष सहभाग दलित पँथर मध्ये होता. तो आमच्या भागातला पँथरचा छावणीप्रमुख होता. मी तसा लहान होतो; पण माझा भाऊ त्यावेळी जे लिखाण करायचा त्यामध्ये मी त्याला मदत करायचो. त्यावेळी मी कादंबरी लिही म्हणून त्याच्या मागं लागलेलो. त्या काळात कादंबरी लिहिणारे फार कमी लोक



जी.के. ऐनापुरे

आंबेडकरी समाजात होते. सगळे आत्मकथनं लिहायला लागल्यामुळं कादंबरी कुणी लिहिलीच नाही. त्यावेळी माझ्या लक्षात आलं, की एवढ्या मोठ्या सामाजिक राजकीय घडामोडी चालेलल्या आहेत त्यांचं जतन झालं पाहिजे. माझी वाचनाची, अभ्यासाची वेगळी पद्धत होती. सुरुवातीला मला वाटलं होतं, की मी यावर काहीतरी दीर्घकथा लिहावी. मला दीर्घकथा लिहायला आवडायचं. दीर्घकथा लिहायला घेतल्यावर पुढं जाऊन ही कादंबरी तयार झाली. मात्र, तयार झाल्यावर तिला कादंबरीसारखं वजन नव्हतं. पानांच्या संख्येच्या दृष्टीने ती खूप लहान झाली. मला दलित पँथरचा मोठा पट मांडायचा होता. ज्यावेळी मी ती कादंबरी लिहिली त्यावेळी दलित पँथरला ३० वर्षं झाली होती. माझा चळवळीतील नेतृत्वांवर राग होता, की हे काय करतायत, यांना यश का मिळत नाही. यांचे राजकीय आराखडे कुठं चुकतायत आणि हे सगळं नेतृत्व करणारे लोक होते, ते मी सिद्धार्थविहार होस्टेल, वडाळ्याला राहत होतो, तिथल्या ५० नंबरच्या खोलीशी जोडलेले होते. तिथं माहोल असायचा दलित पँथरचा. ते सगळं मी तेव्हा बारकाईनं बघत होतो. त्यांचे व्यवहार दिसत होते, त्रुटीही दिसत होत्या. नेतृत्वांवरचा राग वाढत गेला माझा आणि मी ती कादंबरी लिहिली.

कादंबरी लिहीत असताना नवीन आशय, नवीन भाषा आली पाहिजे, अशा गोष्टी समोर होत्या. काही एक–दोन राजकीय कादंबऱ्या उदाहरण म्हणून माझ्यासमोर होत्या; पण त्यात डॉक्युमेंटेशन आणि भूमिका दोन्ही गोष्टींमध्ये कमतरता होती. 'अभिसरण' या कादंबरीसाठी मी प्रथमपुरुषी कथन पद्धत स्वीकारली. तेव्हा ते करत असताना माझ्या लक्षात असं आलं, की अशा पद्धतीत तुम्ही वर्णन करू शकत नाही. त्यामुळं कादंबरीतील वर्णनात्मक तपशीलाचं अंग बाजूला पडलं. त्यामुळं कादंबरीच्या विस्ताराला मर्यादा आल्या. त्यामुळं ही कादंबरी वाचणारे लोक होते, की ज्यांना ही नरेशन

पद्धत माहिती होती; पण त्यातील राजकारण आणि छोट्या-छोट्या गोष्टी होत्या त्या त्यांना अपरिचित होत्या. त्या मी थोडक्या वाक्यात कादंबरीत आटोपत्या घेतलेल्या. उदाहरणार्थ, जॉर्ज फर्नांडिसवर एके ठिकाणी अगदी दोन-तीन ओळीत लिहिलेलं आहे. या कादंबरीची मर्यादा अशी झाली, की ज्यांना चळवळ कळते त्यांना नरेशन कळलं नाही आणि ज्यांना ती शैली कळते त्यांना ती चळवळ माहिती नाही. अशा त्रांगड्यात ती कादंबरी अडकली; पण असं नरेशन स्वीकारल्यामुळं कादंबरीला विशिष्ट अशा प्रकारचा टोन आला. या कादंबरीत समाज नावाचं पात्र आहे जे वेगवेगळ्या पोटसमूहाबद्दल बोलतं. चळवळीतील नेतृत्वांकडूनच नरेशन केलेलं असल्यामुळं कादंबरीत सामाजिक चळवळीच्या अंगांचं जतन झालेलं आहे.

आज दलित पँथरला पन्नास वर्षं झाली, तर त्या कादंबरीचं स्मरण होत आहे. याच्या पुढचे दोन भाग मी 'ओस निळा एकांत' आणि 'वायपर' अशा दोन कादंबऱ्यांत लिहिलेले आहेत. त्या यथावकाश प्रकाशित होतील. त्यात पँथरचा पुढचा काळ आहे.

**सागर : या कादंबरीतील पात्रं चळवळीतील नेते आहेत आणि तेच कथन करत असल्यामुळं या कादंबरीत चळवळीचा ऐवज जतन झालेला आहे. कादंबरी वाचताना जाणवतं, की तुम्ही चांगदेव, रामचंद्र, राजाराम, जयप्रकाश या पात्रांपैकी किंवा नेत्यांपैकी कुठल्याही एकाच पात्राची बाजू तुम्ही घेत नाही आहात, तर प्रत्येक पात्राची एम्पथिटिकली बाजू समजून घेत आहात. त्या व्यक्तीची राजकीय निर्णयप्रक्रिया काय असेल, त्यामागची त्याची मानसिक आंदोलनं काय असतील, हे तुम्ही प्रभावीपणे कादंबरीत आणलं आहे. हा दृष्टिकोन कसा तयार झाला. कारण, बहुधा एखादा व्यक्ती किंवा लेखक कुठलंतरी एकच नरेशन, नरेटिव्ह लिखाणातून मांडत असतो, तर तुम्ही एकाचवेळी वेगवेगळे अंग मांडताय. एकाच वेळी वेगवेगळ्या नेत्यांची भूमिका मांडणं हे कसं शक्य झालं?**

**जी.के. ऐनापुरे :** माझी कौटुंबिक पार्श्वभूमी इथं महत्त्वाची ठरते. माझे वडील इंटकचे मोठे कार्यकर्ते होते. ते मिल मजदूर युनिटमध्ये होते. वडिलांना सत्यशोधक चळवळीची पार्श्वभूमीही होती. माझा भाऊ पँथरमध्ये होता. माझ्या वडिलांना ते फार आवडायचं नाही. वरळीची दंगल झाल्यानंतर वडिलांनी त्याला गावी पाठवलं. या सगळ्यात माझी वैचारिक भूमिका घडत होती. मी त्या वेळेला कम्युनिस्ट विचाराचं जगभरातील साहित्य वाचत होतो. माझा वैचारिक प्रवास त्या दिशेनं होत होता; पण म्हणून मी डांगे वगैरे लोकांचा समर्थक नाही बनलो. एका बाजूला मार्क्सवादी विचारांचं वाचन सुरू होतं, तर समोर चळवळ जी मी बघत होतो ती आंबेडकरी चळवळ होती. त्यातील सर्व नेत्यांविषयी थोडंफार थोडंफार आकर्षण होतं. पण ते टिकाऊ नव्हतं. एकमेव टिकेलेलं आकर्षण म्हणजे नामदेव ढसाळ; पण ते कवी म्हणून, राजकीय भूमिका म्हणून नाही. या सर्व नेतृत्वांवर माझा राग होता आणि हा राग सांगण्याची पद्धत म्हणून मी या नरेशन मेथडचा वापर केला. त्यात प्रत्येक पात्र स्वत: सांगत आहे, की मी काय केलंय, मी काय करतोय. मग ते वाचताना आपल्याला त्यांच्या मर्यादाही लक्षात येतात, तर कुणाचीच बाजू न घेण्याची मी पद्धत स्वीकारली आहे. त्याचं मुख्य कारण या सगळ्यांवर माझा असलेला राग व्यक्त करणं हे आहे.

**सागर : या कादंबरीत रामचंद्र नावाचं पात्र आहे जे रामदास आठवले यांच्यावर बेतलेलं आहे. एका बाजूला या पात्राला बाकी सगळे शिव्या घालतात असंही दिसतं; पण तुम्ही त्या पात्राकडं फार सहानुभूतीनं बघता, असं का जाणवतं.**

**जी.के. ऐनापुरे :** रामचंद्र हा एकदम खालच्या स्तरातून आलेला माणूस आहे. त्याला शैक्षणिक, राजकीय कसलीच पार्श्वभूमी नाही. एकेकाळी तो मोठ्या लीडर्सच्या बॅगा उचलायचं काम करायचा. या सगळ्या लीडर्सची पांगापांग झाल्यानंतर त्यानं अरुण कांबळेला बरोबर घेऊन ती चळवळ जोमानं चालवली. एक मास लीडर कसा तयार होतो त्याचं सूत्र रामचंद्रचा जो चढता आलेख आहे, त्यामध्ये दिसतं; पण हा लीडर चळवळीच्या वैचारिक पायावर नीटपणे उभा नाही; पण तो इतक्या विपरीत परिस्थितीतून आलेला आहे, हेच त्याच्याबद्दल सहानुभूती असण्याचं मुख्य कारण आहे. प्रक्षोभित जमवत घुसण्याचं धाडस त्याच्यामध्ये आहे. त्याच्या राजकीय अनुभवाचा वापर चळवळीनं कसा करायचा यावर विचार करायला हवा; पण त्याच्यावरही माझा राग आहेच.

**सागर : 'अभिसरण' हे कादंबरीचं शीर्षक आहे. बाबासाहेब जातीसंस्थेचं उच्चाटनमध्ये सोशल इंडोसमोसिस हा शब्द वापरतात ज्यात ते सामाजिक घुसळण आणि देवाणघेवाणीची अपेक्षा करतात. तुम्ही या कादंबरीसाठी शीर्षक म्हणून वापरलेली 'अभिसरण' ही संकल्पना किंवा शब्दाविषयी सांगा.**

**जी.के. ऐनापुरे :** विज्ञानात वापरल्या जाणाऱ्या अभिसरण या शब्दाचा अर्थ म्हणजे खालून वरपर्यंत आणि वरून खालपर्यंत हालचाल, देवाणघेवाण झाली पाहिजे. त्या पद्धतीनं समाजात खालच्या आणि वरच्या अशा दोन्ही स्तरांवरून संवाद झाला पाहिजे. सामाजिक अभिसरण झालं पाहिजे. आपली चळवळीची लढाई ही यासाठी आहे. हे सामाजिक अभिसरण थांबल्यासारखं वाटतं. हे अभिसरण घडवून आणलं पाहिजे. अभिसरण ही गोष्ट जग बदलण्याची मेथड असू शकते. एक माणूस दुसऱ्या माणसाशी कसा डायलॉग करतो, कसा बघतो, कसा विचार करतो, हे यात महत्त्वाचं आहे. पँथरच्या संघटनेमध्ये नीटपणे अभिसरण होत नव्हतं. त्यात गट वाढत गेले. त्याला राजकीय यश मिळालं नाही. आज आपण पन्नास वर्षं झाली म्हणतो; पण हा काळ ऱ्हासाचेही स्मरण आहे.

**सागर : तुम्ही मघाशी 'ओस निळा एकांत' आणि 'वायपर' या आगामी कादंबऱ्यांचा उल्लेख केला. त्याविषयी थोडक्यात सांगा.**

**जी.के. ऐनापुरे :** 'वायपर' हा दुसरा भाग आहे. त्यात स्टुडंट ऑर्गनायझेशन कशा प्रकारे कार्यरत होती, त्याविषयी लिहिलेलं आहे. वायपर लिहिण्याच्या आधी आसाम गण परिषद आणि त्यातली विद्यार्थी चळवळ माझ्या डोळ्यापुढं होती. कशा प्रकारे अविविवाहित तरुण विद्यार्थी मंत्रिमंडळात गेले. त्याचं मला फार कुतूहल वाटलं.

त्यावर पुस्तक लिहावंसं वाटलं, तर आसाम गण परिषदेवर पुस्तक लिहायचं पडलं बाजूला आणि 'वायपर' ही कादंबरी माझ्याकडून लिहून झाली. विद्यार्थी चळवळ कशी काम करते आणि त्यात आपली मागासवर्गीय मुलं कुठं असतात, काय करत असतात, यावर ते लिहिलेलं आहे.

तर, 'ओस निळा एकांत'मध्ये पँथर तुकड्या-तुकड्यांत विभागून निष्क्रिय झाल्यानंतर जे काही पन्नाशीच्या पुढं गेलेले चळवळीतील लोक होते, ते काय करत होते, त्यांची मुलं, कुटुंब काय करत होतं. त्यांची आर्थिक पीडा काय आहे, त्याचं सार्वजनिक जीवन काय आहे, असा फोकस मी या कादंबरीत टाकलेला आहे. डाव्या चळवळीनं किंवा आंबेडकरी चळवळीनं संसदीय बहुमत मिळवण्यासाठी काय केलं पाहिजे, याबद्दल त्यात लिहिलेलं आहे. या दोन्ही कादंबऱ्या बहुमताच्या राजकारणाकडं जाण्याच्या दिशेबद्दल, प्रारूपांबाद्दल आहेत.

**(सागर कांबळे हे मुंबई विद्यापीठ येथे पीएच.डी. संशोधक आहेत.)**

---

# पँथर अजूनही झेप घेण्यास सज्ज

## नानासाहेब भालेराव

**ढसाळांच्या पँथरचे भारतीय दलित पँथर, तसेच राष्ट्रीय दलित पँथर व अन्य काही नावे बदलली गेलीत; पण या सर्वांची मुळे ही नामदेव ढसाळांच्या दलित पँथरशिच निगडित आहेत. त्यामुळे पँथर संपली असा जर कोणाचा समज असेल, तर त्यांनी पँथर अजूनही जिवंत असून झेप घेण्यास सज्ज आहे, ही बाब कायम स्मरणात ठेवावी.**

पँथर हा एक विचार असून, नामदेव ढसाळांनी सुरू केलेली ती एक चळवळ आहे. डॉ. बाबासाहेबांच्या रिपब्लिकन पक्षाप्रमाणेच ढसाळांच्या या चळवळीलाही फुटीचा छाप असल्याने, पँथर ही चळवळ काही काळ क्षमली; पण ती पूर्णपणे विझली नाही, तर तिचा झंझावत अजूनही कायम आहे. ढसाळांच्या पँथरचे भारतीय दलित पँथर, तसेच राष्ट्रीय दलित पँथर व अन्य काही नावे बदलली गेलीत; पण या सर्वांची मुळे ही नामदेव ढसाळांच्या दलित पँथरशिच निगडित आहेत. त्यामुळे पँथर संपली असा जर कोणाचा समज असेल, तर त्यांनी पँथर अजूनही जिवंत असून झेप घेण्यास सज्ज आहे, ही बाब कायम स्मरणात ठेवावी. राष्ट्रीय दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष नानासाहेब भालेराव यांचा दलित पँथर ते राष्ट्रीय दलित पँथरचा प्रवास त्यांच्याच शब्दांत...

### पँथरला फुटीच्या छापापासून ते दूर ठेवू शकले नाहीत

६ डिसेंबर १९५६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आबंडेकर यांचं निधन झालं. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर १० महिन्यांनी, म्हणजेच ३ ऑक्टोबर १९५७ रोजी बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या शेड्यूल कास्ट फेडरेशनला नागपूरच्या दीक्षा भूमीवर बरखास्त करण्यात आले आणि रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यात आली. या नव्या पक्षाचे अध्यक्ष झाले बॅ. एन. शिवराज, तर भैयासाहेब आंबेडकर, दादासाहेब गायकवाड, दादासाहेब रूपवते, डॉ. बी.सी. कांबळे इत्यादी बाबासाहेबांसोबत काम केलेली मंडळी यात होती; पण या रिपब्लिकन पक्षाला एका वर्षातच फुटीचं वारं लागलं. ३ ऑक्टोबर १९५८ रोजी या पक्षात दोन गट पडले. हा संदर्भ देण्यामागचं कारण म्हणजे, फुटीचा हा छाप दलित पँथरला काही महिन्यांतच लागला. वास्तविक पाहता १९७२ साली स्थापन झालेल्या दलित पँथरची बीजं त्याआधीच्या १६ वर्षांतल्या



**नानासाहेब भालेराव**

घडामोडींमध्ये होती. त्यामुळं त्या १६ वर्षांत, म्हणजे १९५६ पासून १९७२ पर्यंत दलितांबाबत अशा काही घटना घडल्या, की नामदेव ढसाळांसारख्या दलित तरुणाला दलित पँथर स्थापन करण्याची गरज भासली. त्यांनी पँथर स्थापन केली; पण बाबासाहेबांच्या पक्षाप्रमाणेच आपल्या पँथरला फुटीच्या छापापासून ते दूर ठेवू शकले नाहीत.

### वरळीची दंगल अनेक दिवस धुमसत होती

९ जुलै १९७२ मध्ये नामदेव ढसाळ आणि ज.वि. पवार यांनी दलित पँथरची स्थापना केली. पँथरच्या सहा महिन्यांनंतर राजा ढाले पँथरशी जोडले गेले. त्यापूर्वी त्यांची दलित युवक आघाडी ही संघटना होती. ढसाळ आणि ढाले एकत्र आल्याने पँथर अधिक मजबूत बनली. मुंबईसह अनेक लहान-मोठ्या शहरांत 'दलित पँथर'च्या छावण्या निर्माण झाल्या. दलितांवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात आंदोलने झाली. त्याची सरकारने दखल घेतली. एखाद्या गावात दलितांवर अत्याचार झाला, तर सर्व गावाला जबाबदार धरावे. त्या गावास दंड भरायला लावावा. जिल्हा परिषदेमार्फत दिल्या जाणाऱ्या सुविधा बंद कराव्यात, अशी आततायी मागणी पुढं आली. इतकंच नव्हे, तर भावनेच्या भरात वेळप्रसंगी स्वतंत्र दलितस्थानाची मागणी होऊ लागली. मुंबईत १९७३ च्या सुमारास शिवसेना व दलित पँथर समोरासमोर आले. वरळीची दंगल अनेक दिवस धुमसत होती. तत्कालीन गृहराज्यमंत्री शरद पवार यांनी ही दंगल



**एका मोर्चाप्रसंगी दलित पँथरचे कार्यकर्ते.**

आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले; पण सत्ताधाऱ्यांना दलित पँथरची ताकद सहन होत नव्हती. त्यामुळं त्यावेळी काँग्रेसवाल्यांनी पँथरमध्ये बेकी निर्माण करण्यासाठी प्रयत्न केल्याचे आरोप झाले.

**हिंदू धर्माची मेलेली मढी उकरण्यात काय अर्थ!**

'जिथे घडतो ऐरणगाव बावडा, त्या देशाच्या छातीत रावडा' अशा घोषणा देणाऱ्या दलित पँथरला स्थापनेनंतर अवघ्या दोन वर्षांतच फुटीचा रोग लागला. नामदेव ढसाळ आणि राजा ढाले यांच्यात संघटनेच्या कार्यपद्धतीबाबत जोरदार मतभेद निर्माण झाले. राजा ढाले हे दलित पँथरला 'बौद्ध पँथर' करू पाहत आहेत आणि भारत बौद्धमय करण्याच्या त्यांच्या घोषणा आपल्याला मान्य नाहीत, असे ढसाळ यांचे म्हणणे होते. पँथर ही सर्व जाती-धर्मांची असून, ती कुठल्या एका जातीची नाही, असे सांगत दलित चळवळीने डाव्या चळवळीशी नाते जोडले, तर बिघडले कुठे असा ढसाळ यांचा तेव्हा युक्तीवाद होता. ढाले हे देवदेवतांना शिव्या देतात, ते आपणास मान्य नाही. हिंदू धर्माची मेलेली मढी उकरण्यात काय अर्थ, असे ढसाळ म्हणत. मुखवटा बाबासाहेबांचा आणि राजकारण कम्युनिस्टांचे असा कार्यक्रम नामदेव ढसाळ राबवीत असल्याचा ढाले यांचा त्यावेळी प्रत्यारोप होता. दलित पँथर बाळसे धरण्याच्या अवस्थेत असतानाच राजकीय भूमिका घेण्याची काय गरज होती; पण संघटनेच्या बोकांडी काही लोकांनी आधीपासूनच राजकीय कार्यक्रम बसविला, असा आरोप ढाले यांनी केला. ढसाळप्रणीत जाहीरनाम्यातील शब्द जडबंबाळ असून, त्यावर कम्युनिस्टांची छाप आहे. एकनिष्ठ की कम्युनिस्ट, नामाजाहीर की जाहीरनामा, असे आरोप ढाले गटाने त्यांच्यावर केले आणि १९७४ च्या आसपास दलित पँथर फुटली. त्यावेळी राजा ढाले यांच्यासोबत प्रा. अरुण कांबळे, गंगाधर गाढे, रामदास आठवले ही मंडळी होती. पुढे आठवले गटानेदेखील भारतीय दलित पँथरची स्थापना केली. त्यामुळे नामदेव ढसाळ, राजा ढाले आणि रामदास आठवले अशा तिघांच्या पँथर पुढं आल्या. ही फाटाफूट त्यावेळी मी स्वत: डोळ्यानं बघत होतो.

**खेड्यापाड्यांतील दलित पँथरशी जोडला गेला**

कारण मीदेखील १९७३ पासून पँथरशी जोडला गेलो होतो. त्यावेळी नाशिक जिल्ह्यात दलित पँथरची जबाबदारी रमेश जाधव यांच्या खांद्यावर होती. ते माझे सख्खे आतेभाऊ. त्यावेळी मी इयत्ता ११ वीत शिकत होतो. शिक्षणासाठी मी त्यांच्याकडेच राहायचो. जेव्हा-जेव्हा नामदेव ढसाळांचा नाशिक दौरा व्हायचा तेव्हा त्यांचा मुक्काम रमेश जाधव यांच्या घरी असायचा. त्यामुळं त्यांना जवळून अनुभवण्याची मला संधी मिळाली. त्यांचे विचार ऐकून मी प्रभावित व्हायचो. पुढं त्यांच्या सभा ऐकण्यासाठी आवर्जून हजेरी लावायचो. त्यांच्या विचारांनी मी इतका प्रभावित झालो, की पुढं शिक्षणावर लक्ष केंद्रित करणं अवघड होत गेलं. तसेच चळवळीत कधी ओढलो गेलो, हेही लक्षात आलं नाही. मी पँथरमध्ये सक्रिय झालो. वर्षभरातच म्हणजेच १९७४ मध्ये मला नाशिक तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली गेली. पुढं जिल्हा सरचिटणीस, जिल्हाध्यक्ष, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष, राज्य सरचिटणीस, तसेच १९९५-९६ मध्ये प्रदेशाध्यक्षपदाचीही धुरा माझ्यावर सोपविली गेली. पँथरच्या माध्यमातून समाजाच्या प्रश्नांवर प्रखरतेने लढा दिला. दलित पँथरने जातीय दंगली कधीच घडविल्या नाहीत. मात्र, अशा दंगली झाल्या त्यावेळी समाजबांधवांच्या संरक्षणासाठी दलित पँथर कधीही मागं हटली नाही. पँथर समाजाच्या सुखदु:खात उभा राहतो, ही खात्री पटल्यानंतर खेड्यापाड्यांतील दलित पँथरशी जोडला गेला. शहरात आणि खेड्यात सामाजिक लढे उभे केले.

**राष्ट्रीय दलित पँथरचा विस्तार**

हे सर्व घडत असतानाच नामदेव ढसाळ यांनी शिवशक्ती-भीमशक्ती या प्रयोगाची घोषणा केली. मात्र, शिवसेनेसोबत युती




**दलित पँथर शाखा उद्घाटन प्रसंगी नानासाहेब भालेराव व कार्यकर्ते.**

हे आमच्यासारख्यांना पटण्यासारखं नव्हतं. आम्ही ढसाळांच्या या भूमिकेला विरोध दर्शविला. दलित पँथर ही राजकारणविरहित संघटना आहे. अशात शिवसेनेसारख्या पक्षासोबत युती हे अनेक कार्यकर्त्यांना पटण्यासारखं नव्हतं. त्यामुळं आम्ही तब्बल तीन वर्षं नामदेव ढसाळांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, अशातही ते आपल्या भूमिकेवर ठाम होते. अखेर २००६ मध्ये मी 'राष्ट्रीय दलित पँथर'ची घोषणा केली. तेव्हा मुंबईचे खंडू अडांगळे, अनिरुद्ध रामराजे, पुण्याचे सोनवणे, तसेच नाशिकचे काही सहकारी माझ्यासोबत आले. त्यानंतर २००७ मध्ये राष्ट्रीय दलित पँथरची स्थापना केली गेली. पुढं मी संपूर्ण राज्याचा दौरा केला. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भात नव्या दमाच्या कार्यकर्त्यांची फळी उभी केली. जुन्या नव्यांचा मेळ बसवीत तब्बल १७ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय दलित पँथरचा विस्तार केला.

**दलित पँथर ही चळवळच संसदीय राजकारणाच्या पलीकडची**

नामदेव ढसाळ आणि मी जरी वेगळा झालो असलो, तरी आमच्यातील ऋणानुबंध कायम होते. ते मला त्यांचा शाहगिर्द समजायचे. जेव्हा त्यांना आजारपणाला सामोरं जावं लागलं, तेव्हा आर्थिक मदतीपासून सर्वच जबाबदाऱ्या मी पार पाडल्या. पैशांची अडचण असल्यास ते हक्कानं माझ्याशी बोलायचे. नामदेव ढसाळ यांनी त्यांच्या मुंबईतील हॉटेलचं उद्घाटन माझ्या हस्ते ठेवलं होतं. तेव्हा मला ते संयुक्तिक वाटलं नाही. मी त्यांना रामदास आठवले यांना बोलाविण्यासाठी आग्रह धरला; पण रामदास येणार काय? अशी शंका त्यांनी बोलून दाखविली. तेव्हा मी स्वत: रामदास आठवले यांच्याशी संपर्क साधून मंत्री प्रीतमकुमार शेगावकर यांच्या बंगल्यावर त्यांची भेट घेतली, तसेच रामदास आठवले आणि नामदेव ढसाळ यांचं बोलणं करून दिलं. एकूणच आमच्यातील एकमेकांप्रतीचं प्रेम हे कायम होतं. मी दलित पँथरमध्ये होतो, तेव्हा माझी कोणतीच महत्त्वाकांक्षा नव्हती, हे ते जाणून होते. त्यामुळं मी जरी नवी संघटना स्थापन केली असली, तरी ते मला त्यांचा शिष्य समजायचे. मुळात दलित पँथर ही चळवळच संसदीय राजकारणाच्या पलीकडची होती. मात्र, काहींनी आपली राजकीय महत्त्वाकांक्षा जपली. त्यामुळं काही वर्षांतच चळवळीची फाटाफूट झाली. एक मात्र नक्की, दलित पँथरनं प्रस्थापितांसमोर दलित समाजाची ताकद अधोरेखित केली.

जेव्हा दलित पँथर आणि भारतीय पँथर बरखास्त करून रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्यात आला, तेव्हा दलित ऐक्याचा प्रस्ताव पुढं आला. त्यावेळी आठवले, गवई, आंबेडकर, कवाडे हे चार खासदार निवडून आले होते. म्हणजेच चार जागांवर चार खासदार तेही खुल्या मतदारसंघातून निवडून आले होते. अर्थात, या यशामागे दलित पँथरचा झंझावात होता. मात्र, रिपब्लिकन ऐक्यही फार काळ टिकलं नाही. फुटीचा छाप इथंही लागू पडल्यानं, पुन्हा एकदा हा समेट घडवून आणण्यासाठी पँथरला मूर्त रूप देणं गरजेचं आहे. त्यासाठी पुन्हा एकदा ऐक्याचा प्रयोग व्हायला हवा. नामदेव ढसाळ यांच्या दलित पँथर याच विचारांवर आज राष्ट्रीय दलित पँथर जिवंत आहे. त्यामुळं ऐक्यासाठी माझ्याकडून नक्कीच प्रयत्न होतील, यात शंका नाही.

**...तर आठवलेंचं नेतृत्व स्वीकारू – नानासाहेब भालेराव**

९ जुलै २०२२ रोजी दलित पँथरला ५० वर्षं पूर्ण होत आहेत. हा सोहळा सर्वांनी एकत्र येऊन साजरा करावा, अशी पँथरचे नेते, तशीच कार्यकर्त्यांची इच्छा आहे. त्याकरिता काही दिवसांपूर्वीच रामदास आठवले यांनी बैठक घेऊन याबाबतचा मानस बोलून दाखविला, त्याचप्रमाणे पुन्हा पँथर चळवळ सुरू व्हावी, असंही म्हटलं. त्यांची भावना जरी रास्त असली, तरी पँथर ही राजकारणविरहीत चळवळ आहे, ही बाब रामदास आठवले यांनी समजून घ्यायला हवी. त्यामुळं आम्ही जर आता त्यांच्यासोबत गेलो, तर समाजात चुकीचा संदेश जाण्याची शक्यता आहे. अशात रामदास आठवले यांनी भाजपसोडून पँथरचं नेतृत्व करावं, असा आमचा त्यांना प्रस्ताव असणार आहे. आम्ही त्यांचं नेतृत्व स्वीकारण्यास तयार आहोत. ●●●

**(शब्दांकन : सतीश डोंगरे)**

# पुन्हा पँथर म्हणून जन्माला यावंसं वाटेल


## शंकरराव काकळीज

**पँथरसारखं संघटन निर्माण व्हावं, अशी माझी इच्छा आहे. डॉ. बाबासाहेबांचा अनुयायी म्हणून मी पुनर्जन्म मानत नाही; पण यदाकदाचित जर पुनर्जन्म असेल, तर पँथर म्हणूनच जन्माला यावं आणि या समाजाची सेवा करावी, अशी माझी इच्छा आहे. पँथर ही महाराष्ट्रातच नाही, तर देशातील जो दलित, वंचित समाज आहे. जो बाबासाहेबांच्या व्याख्येत बसतो, त्या समाजासाठी पँथर हीच गरज आहे.**

'टिट फॉर टॅट' म्हणत, दलितांवर अत्याचार घडेल तिथंच उत्तर द्यायचं, अशा आक्रमक ध्येयानं पछाडलेल्या बंडखोर तरुणांनी दलित पँथरची स्थापना केली, त्याला यंदा ५० वर्षं पूर्ण झाली. 'बोल, दलिता, हल्ला बोल, बोल श्रमिका हल्ला बोल' ही आक्रमक घोषणा आपल्या बुलंद आवाजात देत, सत्तरच्या दशकातील दलित तरुण महाराष्ट्र व देशभर त्याकाळी दलितांवर जे माणुसकीला काळिमा फासणारे अन्याय-अत्याचार जातीयवाद्यांकडून होत होते त्याच्या निषेधार्थ 'दलित पँथर' या जहाल संघटनेचा झेंडा घेऊन रस्त्यावर उतरला होता; पण एकीकडं रस्त्यावर उतरलेला हाच तरुण दुसरीकडं आपल्या कविता, कथा, लेखातून, भाषणातून आपल्या वेदना जळजळीत शब्दांत व्यक्त करीत होता. प्रस्थापित जात-वर्गीयांवर, तथाकथित सांस्कृतिक ठेकेदारांवर व धर्माच्या मुखंडांवर तो आसूड ओढत होता. या लढ्यात नाशिक जिल्ह्यातीलदेखील काही तरुण घरदार सोडून त्वेषानं लढा देत होते. काहींनी तर रोजीरोटीवर पाणी सोडून पँथरचा झेंडा हाती घेतला. यातील शंकरराव काकळीज, फकिरा जगताप आणि नाना भालेराव या पँथरनी सांगितलेल्या अनुभवांचा आढावा घेणारा हा वृत्तांत त्यांच्याच शब्दांत....

**पँथरलाच सर्वस्व समजून समाजसेवेत स्वत:ला झोकून दिलं**

पुनर्जन्मावर माझा विश्वास नाही; पण पुनर्जन्म झालाच, तर पँथर म्हणूनच जन्माला यावंसं वाटेल. १९७२ चा तो काळ होता. ९ जुलै १९७२ रोजी मुंबईतील कामटीपुऱ्यात पँथरची स्थापना झाली. पँथर स्थापन झाल्याची नामदेव ढसाळांनी घोषणा केली अन् आम्ही सर्व बेभान होऊन पँथरचे सक्रिय कार्यकर्ते बनण्यास उत्सुक झालो. पँथर स्थापनेनंतर नामदेव ढसाळांनी नाशिकचा दौरा केला. त्यावेळी नाशिकरोडच्या बुद्धविहाराजवळ एक सभा झाली. त्या सभेचा मी साक्षीदार आहे. या सभेत दलितांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांवर मंथन झाले. त्या सभेनंतर पँथर अशी काही डोक्यात घुसली, की दलितांची, पीडितांची, वंचितांची संघटना असली पाहिजे, असं आमच्या मनाला सारखं वाटू लागलं. ती आमची तहान होती. पँथरच्या रुपानं आमची तहान भागली गेली. मी पँथरच्या सामाजिक चळवळीत स्वत:ला झोकून दिलं. पँथरच्या चळवळीत मी विद्यार्थी म्हणून सामील झालो होतो. पुढं जिल्ह्याचा सचिव राहिलो. राज्याचं



शंकरराव काकळीज

सचिव पदही दिलं गेलं. उत्तर महाराष्ट्राचा संघटक, अशा पद-ावरही काम करायला मिळालं. मात्र, हे पदे केवळ नाममात्र होतं. पँथरमध्ये 'कार्यकर्ता' हेच पद सर्वोच्च होतं. जेव्हा गवई बंधूंचे डोळे काढण्यात आले, तेव्हा मी स्वत: राजा ढाले यांना हॉस्टेलवर ५० नंबरच्या रूममध्ये भेटलो होतो. गवई बंधूंची अवस्था बघून मी खूपच अस्वस्थ झालो होतो. तेव्हा गवई बंधूंचे नव्हे, तर माझेच डोळे काढले की काय, अशी भावना माझ्या मनात आली. आपला समाज जर असाच अन्याय-अत्याचार सहन करीत असेल, तर आपण शिकून-सवरून काय उपयोग? असाही प्रश्न सारखा सतावत होता. आई-वडिलांना वाटायचं, की आपल्या मुलानं उच्चशिक्षण घेऊन साहेब व्हावं. आई-वडिलांची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्याकाळी इंग्रजी विषयात पदवीधर झालो; पण समाजाची अवस्था बघून आपल्या शिक्षणाचा फायदा त्यांच्यासाठी करावा, असं मनोमन वाटायचं. त्यामुळंच पँथरलाच सर्वस्व समजून समाजसेवेत स्वत:ला झोकून दिलं.

**...आम्हाला मुंबईच्या एकाही कारागृहात जागा मिळाली नाही**

१९८२ साली नामांतर चळवळीसाठी जो लढा द्यावा लागला, तो जशास तसा डोळ्यासमोर उभा राहतो. कारण आमचं बरंच आयुष्य नामांतराच्या लढ्यात खर्च झालं. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा काळारामाचा सत्याग्रह, महाडचा सत्याग्रह देशभर गाजला. तसाच नामांतराचा लढाही देशभर गाजला. नामांतरासाठी अनेक लोकांचे संसार उद्‌ध्वस्त झाले. या लढ्यात अनेकांची घरं जाळली गेली. अनेकांवर अन्याय-अत्याचार केले गेले. अनेकांची हत्याही झाली. पँथरच्या कार्यकर्त्यांनी प्रचंड कष्ट वेचून नामांतराचा लढा यशस्वी केला. रामदास आठवले, प्रा. अरुण कांबळे, गंगाधर गाढे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही जेलभरो आंदोलन केलं. त्यावेळी आम्हाला हर्सूल जेलमध्ये बंद करण्यात आलं. जेव्हा मुंबई येथे नामांतरासाठी आंदोलन केलं, तेव्हा माझ्यासोबत नाशिक जिल्ह्यातील ५०

कार्यकर्ते होते. त्यामुळं आम्हाला मुंबईच्या एकाही कारागृहात जागा मिळाली नाही. सर्व कारागृहे पँथरच्या कार्यकर्त्यांनी भरली होती. त्यामुळं आम्हाला ठाणे येथील कारागृहात हलविण्यात आलं. ठाणे कारागृहात जेव्हा आम्ही पोहोचलो तेव्हा आमचं भाग्य इतकं थोर होतं, की याठिकाणी आम्हाला महाराष्ट्रातील विचारवंत लोकांचा सहवास लाभला. या मंडळींसोबत आम्ही तब्बल १५ दिवस ठाणे कारागृहात बंद होतो. या कारागृहातच आम्ही पँथरचा दहावा वर्धापन दिनही साजरा केला. त्यावेळी प्रा. अरुण कांबळे, कॉम्रेड शरद पाटील, बाबा आढाव, हरी नरके, नरेंद्र दाभोलकर, रावसाहेब कसबे, कुमार सप्तर्षी, पार्थ पोळके, गोविंद पानसरे, लक्ष्मण माने, अशा थोर विचारवंत मंडळींसोबत आम्ही कारागृहात होतो. तब्बल दोन दिवस आम्हा सर्वांना या मंडळींचे विचार ऐकायला मिळाले. ते दिवस आजही मी माझ्यासाठी भाग्याचेच समजतो. कारण अशा समतावादी लोकांचे विचार ऐकायला मिळणे, त्यांच्या सहवास लाभणे यासाठी भाग्यच असावं लागतं, असं मी मानतो.

**त्यामुळं नोकरी गेल्याचा पश्चात्ताप नव्हता**

कारागृह भोगून जेव्हा मी बाहेर पडलो, तेव्हा नामांतराचा लढा आम्ही आणखी प्रखर केला. नाशिक जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने कार्यकर्त्यांची एकजूट करण्यास आम्ही यशस्वी झालो होतो. एखाद्या ठिकाणी मोर्चा काढायला असल्यास, रेल्वे भरून आम्ही सर्व निघायचो. नाशिक जिल्ह्यातही नामांतरासाठी अनेक मोर्चे, निर्देशनं, घेराव आंदोलनं, धरणे केली गेली. नामांतराबरोबरच झोपडपट्टीचे प्रश्न, राखीव जागेचे प्रश्न यावरही आम्ही काम करीत होतो. हे आंदोलन करीत असतानाच मला १९८२ मध्ये नोकरीला मुकावं लागलं. केवळ पँथर असल्याकारणानं मला माझ्या रोजीरोटीपासून दूर केलं गेलं. त्यावेळी ऊर्जामंत्री डॉ. बळीराम हिरे होते. मालेगाव तालुक्यात पिंपळगाव, दाभाडी इथं राजवाड्यावर बहिष्कार टाकण्यात आला होता. तेथील मराठा समाजाचे टी.झेड. पाटील हे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. ते पिंपळगावचे होते. त्यांच्या नेतृत्वाखाली हा बहिष्कार होता. आमच्या लोकांना दळण देत नव्हते, किराणा माल दिला जात नव्हता. दाढी, कटिंगसुद्धा करू नये, अशी दवंडी पिटवण्यात आली होती. जो कोणी या लोकांना मदत करेल त्याला दंड ठोठावण्यात येईल, अशी दवंडी पिटवण्यात आली होती. त्यासंदर्भात आम्ही मालेगाव तालुक्यातून प्रचंड अशा स्वरूपाचं आंदोलन केलं. ऊर्जामंत्री डॉ. बळीराम हिरे यांचं पितळ उघडं पाडलं. त्याचा परिणाम असा झाला, की माझी अशा ठिकाणी बदली केली गेली, जिथून मला पँथरचं काम करणं शक्यच नव्हतं. त्यामुळं मला नोकरी सोडावी लागली. खरं तर नोकरी नुसतीच सही करण्यापुरती होती. कारण मी सर्व वेळ पँथरचं काम करायचो. त्यामुळं नोकरी गेल्याचा पश्चात्ताप नव्हता. उलट, समाजासाठी पूर्ण जोमानं काम करता येईल, हाच विचार मनात होता. पुढं मी संघटनावर भर दिला. जिल्हाभरातून कार्यकर्ते जोडण्यास सुरुवात केली.

नाशिकरोडच्या बाबासाहेबांच्या पुतळ्यासाठी जेव्हा माझ्या नेतृत्वाखाली आंदोलन केलं, तेव्हा जिल्हाभरातील कार्यकर्त्यांची फळी माझ्यासोबत होती. हे आंदोलन यशस्वी झालं. नाशिकरोडला बाबासाहेबांचा पुतळा बसविला गेला. येवल्यातील क्रांती भूमीसाठीदेखील आम्ही लढा दिला. या आंदोलनात माझ्यासोबत कळवणमधून इक्बाल शेख, चर्मकार समाजाचे जगन राजगुरू, मुरली केदार हे आमचे प्रमुख कार्यकर्ते होते. मालेगावला दीपक निकम, प्रकाश पवार यांच्यामुळं भारतीय दलित पँथरची स्थापना झाली. बागलाण तालुक्यात रत्नाकर बच्छाव, सुरेश बच्छाव हे बागलाण तालुक्याचा गड सांभाळत होते. नांदगाव तालुक्यात देवीदास मोरे, पंडित खरे हे कार्यकर्ते होते. येवल्याला भीमराव गांगुर्डे आणि पापाजी जावळे होते. पापाजी जावळे हे वाल्मीकी समाजाचे होते. ते श्रीमंत तर होतेच; पण त्यांची स्वत:ची तालीम होती. त्या तालमीमध्ये भंगी समाजाचे ३५ पहिलवान होते. त्यावेळी त्यांनी संपूर्ण कुटुंबच पँथरच्या चळवळीत झोकून दिलं होतं. त्यामुळं आम्हाला त्यांचा सार्थ अभिमान वाटायचा. त्यावेळी पापाजी जावळे येवल्याचे नगराध्यक्षदेखील झाले होते. पँथरच्या चळवळीचे नगराध्यक्ष होणं ही महत्त्वाची बाब आहे. चांदवडला मनोहर बनकर, प्रकाश जाधव हे आमचे कार्यकर्ते होते. सिन्नरला पोपटराव जाधव, बाळासाहेब अढांगळे, काशीनाथ भालेराव होते. भारतीय दलित पँथरमध्ये इगतपुरीला वसंत पवार, शशी उबाळे, के.बी. बनकर दादा हे अपंग व्यक्ती आमच्या पँथरचे काही काळ अध्यक्ष होते. अपंग असतानाही त्यांना अध्यक्षपद द्यावं, ही माझीच सूचना रामदास आठवले यांनी मान्य करून त्यांना जिल्हाध्यक्ष बनविलं होतं. नाशिकला जयंत भालेराव, बाळासाहेब दिघोटे, विराज जाधव, प्रकाश लोंढे होते. नाशिकरोडला बी.जी. पगारे, मधुकर शेजवळ, संघर्षण अहिरे हे कार्यकर्ते होते. निफाडला भालचंद्र शेजवळ हे कार्यकर्ते होते.

नाशिकरोडला जेव्हा दंगल झाली, तेव्हा दंगलीत माझ्यासह माझे कार्यकर्ते दंगलीत लढायला पुढं होते. आमच्याकडं कोणत्याही प्रकारची हत्यारं नव्हती. सरपणातील लाकडं घेऊन आम्ही दंगलीत सहभागी झालो होतो. अशा परिस्थितीत आम्ही आमच्या लोकांचं संरक्षण केलं. अशोक दिवेंसारखे महापौर जरी पँथर नव्हते, तरी प्रत्येकवेळी ते त्यांची माणसं घेऊन समाजासाठी उभे राहिले. भीमशक्तीचे लोक आमच्याबरोबर प्रत्यक्ष लढायला सोबत असायचे. अरुण गायकवाड खून खटल्यात आपली जनता हतबल झाली होती. सवर्ण गुंड रात्रीचे आमच्या वस्त्यांवर हल्ले करायचे आणि आमच्या लोकांना उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करायचे. मात्र, त्यांच्यासोबत लढण्यासाठी आपल्या समाजाकडून फक्त पँथर उभी होती. आमच्या विरोधात त्यावेळी पोलीस होते, आरपीआयचे नेतेही होते. मात्र, अशातही आम्ही एकाकी लढत दिली. समाजासाठी उभं राहिलो. हे करीत असताना माझ्याबरोबरचे जे काही कार्यकर्ते जिवंत आहेत, त्यामध्ये जयंत भालेराव, नांदगावचे नागसेन चव्हाण यांचा उल्लेख करता येईल. दलित कार्यकर्ता हा चळवळीत उद्ध्वस्त होतो. त्याचा अंत हा अण्णासाहेब साठेसारखा होतो, असा जो आमचा समज होता, तो समज चुकीचा आहे. आमचा समाज आमची दखल घेतो. आज पण आमच्या समाजातील चांगले लोक आमची विचारपूस करीत आहेत. स्वाभिमानानं बोलत आहेत, हेच आमच्या पँथरमधील लढ्याचं फलित...

**पँथरचं भवितव्य**

पँथरचं भवितव्य गटातटांत वाटण्यापेक्षा पँथरची संघटना

असावी, असं मला वाटतं. हा जो बाबासाहेबांच्या आंबेडकर चळवळीला फुटीचा छाप आहे. ही फूट टाळण्यासाठी स्वत: नेत्यांनी तयार व्हायला हवं. जनतेनं त्यांना जाब विचारायला हवा. जनता जोपर्यंत जाब विचारत नाही, तोपर्यंत फूट ही अटळ आहे. पँथरसारखं संघटन निर्माण व्हावं, अशी माझी इच्छा आहे. डॉ. बाबासाहेबांचा अनुयायी म्हणून मी पुनर्जन्म मानत नाही; पण यदाकदाचित जर पुनर्जन्म असेल, तर पँथर म्हणूनच जन्माला यावं आणि या समाजाची सेवा करावी, अशी माझी इच्छा आहे. पँथर ही महाराष्ट्रातच नाही, तर देशातील जो दलित, वंचित समाज आहे. जो बाबासाहेबांच्या व्याख्येत बसतो, त्या समाजासाठी पँथर हीच गरज आहे. नामदेव ढसाळांनी जरी पँथर स्थापन केली, राजा ढाले हे जरी पँथरचे पहिले अध्यक्ष असले, तरी रामदास आठवले यांचं योगदान विसरून चालणार नाही. कारण त्यांचं योगदान सर्वश्रेष्ठ आहे, असं मी मानतो. रामदास आठवले जेव्हा सिद्धार्थ हॉस्टेलला शिकण्यासाठी आले तेव्हा त्यांची आई धुण्याभांड्याचं काम करीत होती. पुढं हाच तरुण पँथरमध्ये काम करीत, पुढं देशात नावारूपास आला. त्यामुळं पँथर हा विचार जिवंत ठेवण्यासाठी पुन्हा पँथरची निर्मिती झाली पाहिजे, अन्याय-अत्याचाराला वाचा फुटली पाहिजे.

**पँथरमधील राजकारण**

पँथर ही राजकीय संघटना नव्हती. आम्ही पँथरमध्ये सहभागी झालो ते अन्याय, अत्याचाराची चीड म्हणून. त्यामुळं मी मंत्री होईल, आमदार होईल, नगरसेवक होईल ही आम्हाला अपेक्षा नव्हती. जे निष्ठावान पँथर आहेत, त्यांनी कधीही निवडणूक लढली नाही, असं माझं मत आहे. नाशिक जिल्ह्यात असे अनेक पँथर आहेत, जे महापालिकेच्या कधी शरणी गेले नाहीत किंवा आमदारकीसाठी लढले नाहीत. पँथरमध्ये स्वार्थी लोक होते; पण आमच्यासारखे ध्येयवादानं प्रेरित झालेल्या तरुणांचं एकच ध्येय होतं, आपला दलित समाज आणि त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणं. आज मी ७० वर्षांचा आहे. मात्र, अजूनही जर कोणी अन्याय करीत असेल, तर त्याच्या नरडीचा घोट घ्यावा, अशी माझ्या मनात भावना निर्माण होते. पँथरच्या मनात बाबासाहेबांचं एकच वाक्य होतं, 'अन्याय आणि अत्याचाराच्या गर्तेत खितपत पडलेल्या ज्या समाजात मी जन्मलो आणि वाढलो त्या समाजाची दैन्यावस्था आणि गुलामगिरी नष्ट करण्यास मी जर अपयशी ठरलो, तर माझ्या छातीत बंदुकीची गोळी घालून मी माझं जीवनकार्य संपवून टाकेन.' हे जे बाबासाहेबांचं वाक्य होतं, तीच पँथरच्या कार्यकर्त्यांची घोषणा होती. उद्ध्वस्त होताना आम्ही हसतहसत उद्ध्वस्त झालो. आजही मला त्या पँथर कार्यकर्त्यांची आठवण येते जे उद्ध्वस्त झाले; पण पँथर सोडली नाही. मला एकच सागावसं वाटेलं, की 'जगावं तर असं, की इतिहासानं आपल्यासाठी पानं राखून ठेवावीत.' ●●●

**(शब्दांकन : सतीश डोंगरे)**

# पँथरची आजही आवश्यकता

## फकिरा जगताप

तुटपुंज्या आरक्षणामुळं का होईना; पण हक्काची नोकरी मिळाल्यामुळं लाचारीचं, अवलंबित्वाचं जिणं सोडून दलित माणूस समाजात ताठ मानेनं व स्वाभिमानानं वावरू लागला होता. हे स्वाभिमानी जगणं समाजातील काही सरंजामी, जातीयवादी मानसिकता बाळगणाऱ्या मुखंडांना, बड्या धेंडांना खटकू लागलं. दलितांनी आपल्या 'पायरीनं' वागावं या अपेक्षेमुळं, दलितांना जाच होऊ लागला. जुन्या अवमानकारक गोष्टींना दलितांनी नकार दिल्यानं सामाजिक तणाव वाढू लागला, दलितांवर या जातीयवाद्यांकडून वाढते हल्ले होऊ लागले, दलितांवरील अमानुष अत्याचारांच्या घटना अस्वस्थ करू लागल्या. चीड यायची मात्र मार्ग गवसत नव्हता. अशात शंकरराव काकळीजसारख्या ध्येयवेड्या माणसाची भेट झाली. समाजासाठी त्यांची तळमळ बघून आपण समाजासाठी योगदान देण्यास कमी पडतो, याचीही जाणीव व्हायची. अखेर त्यांनी मला पँथरची वाट दाखवली. लगेचच मी शंकरराव काकळीज यांना गुरू माणून त्या वाटेवर चालण्याचा निश्चिय केला. १९७८ मध्ये मी पँथरमध्ये आलो. तेव्हाचा काळ खरोखरच आव्हानात्मक होता. तत्पूर्वी, १९७४ ते १९७८ दरम्यान गवई गटाचं



फकिरा जगताप

काम करीत असल्यानं, समाजाचे प्रश्न जाणून होतो. त्यामुळं पँथरमध्ये आल्यानंतर सामाजिक प्रश्नांवर लगेचच सक्रिय होता आले.

**जयभीम म्हटलं तरी दोन गट एकमेकांसमोर उभे ठाकायचे**

आंदोलनं, निर्दशनं, मोर्चे हे जणू काही आमच्या जीवनाचा अविभाज्य भागच बनले होते. दलितांच्या प्रत्येक प्रश्नाला वाचा फोडणं हाच आयुष्याचा हेतू होता अन् आहे. पुढं १९८४ ते १९८६ अशी तीन वर्षं पँथरचं जिल्हाध्यक्षपद मिळाल्यानं जबाबदारी आणखीनच वाढली होती. वास्तविक मी मूळचा पुण्यातील. अशातही मला नाशिक जिल्ह्याचं जिल्हाध्यक्षपद दिल्यानं आजही मी स्वत:ला कृतघ्न समजतो. एकदा निवडणुकीतून, तर दोनदा मला बिनविरोध निवडून देत या पदाची जबाबदारी माझ्यावर सोपविली



पँथरच्या कार्यकर्त्यांसमेवत रामदास आठवले

गेली. त्यावेळी हे पद म्हणजे एखाद्या काटेरी मुकुटाप्रमाणे होतं. कारण त्यावेळी पँथरसाठी किंचितही अनुकूल काळ नव्हता. १९७८ च्या दंगलीत जयभीम म्हटलं तरी दोन गट एकमेकांसमोर उभे ठाकायचे. पोलिसांकडून गुन्हे नोंदविले जायचे. त्यावेळी बऱ्याचशा कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले गेले होते. मलाही पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. तेव्हा बाबूराव रूपवते, अशोक दिवे आमच्यासोबत होते. त्यावेळी पोलिसांनी गुन्हा न नोंदविता, समज देऊन आम्हाला सोडलं. या प्रकारानंतर आमचा लढा आणखीनच प्रखर झाला होता. जातीयवाद्यांना जशास तसे उत्तर देऊ, जातीय दंगल घडविणाऱ्यांचा चेहरा उघडा करू हा निर्धार आम्ही केला होता.

**जेव्हा पँथर रस्त्यावर उतरायचा**
**तेव्हा प्रशासनही दचकून राहायचं**

जिल्हाभरात फक्त पँथरचाच झंझावात होता. येवल्यातील डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्यासाठी जेव्हा लढा द्यावा लागला तेव्हा रामदास आठवले हेसुद्धा आमच्यासोबत होते. त्यावेळी मनमाड ते येवला, असा आम्ही सायकल मार्च काढला होता. आमचा हा मार्च पुढं यशस्वी ठरला. त्यानंतर लासलगाव येथील डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्यासाठीसुद्धा लढा द्यावा लागला. याठिकाणी असलेल्या ‘पारधी’ नावाच्या हॉटेलसमोर डॉ. बाबासाहेबांचा अगोदरच पुतळा होता. मात्र, तो पुतळा उभारण्यास विरोध केला जात होता. अशात पँथरनं हा लढा हाती घेऊन त्याठिकाणी बाबासाहेबांचा पुतळा उभारला. १९८४ साली जेव्हा इंदिरा गांधी यांची हत्या झाली, तेव्हा आम्ही मनमाड शहरात मोठा मोर्चा काढला होता. अर्थातच हा मोर्चा दलितांच्या प्रश्नांवर होता. त्यावेळी मनमाड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पालीवाल होते. त्यांनी आम्हाला मोर्चा न काढण्याचं आवाहन केलं. मात्र, इंदिरा गांधी यांची हत्या झाली, याबाबतची कोणतीच माहिती त्यांनी आम्हाला दिली नव्हती. त्यामुळं आम्ही मोर्चा काढण्यावर ठाम होतो. पँथरच्या कार्यकर्त्यांचा रोष बघून पोलीस प्रशासनास आम्हाला रोखणं अशक्य झालं होतं. इंदिरा गांधी यांची हत्या झाल्याचं सांगितल्यास, कदाचित कार्यकर्त्यांचा रोष वाढेल, अशी भीती पोलिसांना होती. त्यामुळं मोर्चा काढू देणं, हा एकच पर्याय पोलिसांसमोर होता. अशात त्यांनी आम्हाला मूक मोर्चा काढण्यास परवानगी दिली. आम्ही मोर्चा काढला अन् पोलिसांना निवेदन सादर केलं. त्यानंतर दुपारी ३ वाजता इंदिरा गांधी यांची हत्या झाल्याची माहिती आम्हाला मिळाली. तात्पर्य असे, की जेव्हा पँथर रस्त्यावर उतरायचा तेव्हा प्रशासनही दचकून राहायचं.

**पँथरच्या माध्यमातून आम्ही अनेकांना रोजगार उपलब्ध**

पँथरच्या माध्यमातून आम्ही अनेकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले. ईएसआयसीमध्ये नोकरीस असल्याकारणानं बऱ्याचशा शासकीय योजना जाणून होतो. या योजनांचा लाभ

आपल्या दलित बांधवांना करून देता यावा, यासाठी मी बरेच प्रयत्न करायचो. त्यावेळी रोजगारासाठी पाच हजार रुपयांचं कर्ज मिळायचं. हे कर्ज शंभर लोकांना उपलब्ध करून दिलं. मात्र, याचा अर्थ पँथरच्या माध्यमातून समाजाचे सर्वच प्रश्न सुटले, असंही नाही. बऱ्याचदा अधिकारी निवेदनं स्वीकारायची. मात्र, त्यावर कृती होत नव्हती. अधिकाऱ्यांवरही सवर्णांचा दबाव असल्याकारणानं ते एका मर्यादेपर्यंतच आमच्या आंदोलनांचा, निवेदनांचा विचार करायचे; पण पँथरचा त्यावेळी दरारा होता, हेही नाकारता येत नाही. आमच्या आंदोलनाची भणक जरी लागली तरी प्रशासनाची त्रेधातिरपीट उडायची. पँथरमध्ये असताना आम्ही रामदास आठवले यांचं नेतृत्व मान्य केलं होतं. त्यामुळं १९८९ मध्ये मी रिपब्लिकन पार्टीत गेलो. नोकरीचा राजीनामा देऊन पूर्णवेळ पक्षासाठी काम करण्यास सुरुवात केली. रामदास आठवले यांना जवळून बघितल्यामुळं त्यांचं नेतृत्व आम्हाला ऊर्जा द्यायचे.

पँथरमध्ये राजकारण नव्हतं. केवळ समाजासाठी, अन्याय-अत्याचारासाठी लढा देणं हा एकमेव उद्देश होता. मात्र, प्रत्येकानं धम्मकारण करावं, अशी अपेक्षा होती. समाज संघटित करण्याचा धम्मकारण हा एकमेव प्रभावी मार्ग होता. पुढं पँथरमध्ये राजकारण घुसलं. पँथरमधील कार्यकर्ते नेते झाले. आम्हीही पँथरमधून राजकीय पक्षात गेलो होतो. मात्र, आम्ही आमच्यातील पँथर कधीही संपवू दिला नाही. अख्खं आयुष्य पँथरसाठी वेचूनदेखील आम्ही कोणतीच अपेक्षा केली नाही. ज्यांचं आम्ही नेतृत्व स्वीकारले होतं, ते रामदास आठवले राज्यात पाच वर्षं मंत्री होते. गेल्या १५ वर्षांपासून ते खासदार आहेत. केंद्रात मंत्री आहेत. मात्र, आम्ही त्यांच्याकडून कधीही पदाची अपेक्षा केली नाही. तेव्हाही नाही अन् आजही नाही. सद्यःस्थितीत माझं वय ७४ वर्षं इतकं आहे. मागं वळून बघताना आपण काय मिळवलं, असा जेव्हा मनात विचार येतो, तेव्हा आपण 'पँथर' म्हणून जगलो याचंच अधिक समाधान वाटतं.

**पँथरची पुन्हा स्थापना व्हावी**

दलितांची परिस्थिती आजही निराळी नाही. खोटा राष्ट्रवाद व खोट्या देशप्रेमाची चलती असताना, महाराष्ट्रात व देशात दलितांवरील अत्याचारांत वाढच होत असताना, आजची पिढी त्यावर बोलण्यासाठी पुढं येत नाही. शिक्षणानं बुद्धीमत्ता वाढली. मात्र, अन्यायाविरुद्ध लढा देण्याची हिंमत कमी झाली. आज जर देशाचा विचार केला तर अजूनही जातीयवादी दलितांचे शोषण करताना दिसून येतात. आजही दलित कुटुंबीयांना समाजातून बहिष्कृत करण्याचे प्रकार समोर येतात. दलित तरुणांवर चाबकाचे आसूड ओढले जातात. महिलांची नग्न धिंड काढली जाते. या घटना जेव्हा कानी पडतात, तेव्हा तळपायाची आग मस्तकात जाते. त्यामुळं आजही दलित पँथरची आठवण येते. पुन्हा पँथरची स्थापना व्हावी, असं मनोमन वाटतं. ●●●

**(शब्दांकन सतीश डोंगरे)**



POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2020-22
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460





# ACHIEVING EXCELLENCE IN INFRASTRUCTURE CONSTRUCTION THROUGH INNOVATION

**Afcons Infrastructure Ltd is part of the Shapoorji Pallonji Group**

- **Six decades of consistently delivering complex projects on, or, ahead of schedule**
- **A leader in Marine, Metro rail and LNG segments in India**
- **Focus areas include Marine works, Highways, Bridges, Railway, Metro, Tunnels, Oil & Gas, LNG terminals**
- **Present in over 25 countries across Asia, Africa and the Middle East**
- **Ranked in top 150 contractors globally; 6th in Marine & Ports and 21st in Bridges (as per latest ENR Survey)**
- **First out of 16 packages to complete overall work (PKG-2) ahead of schedule in Samruddhi Mahamarg project**
- **Completed India's widest road tunnels at Igatpuri (PKG-14) ahead of schedule in Samruddhi Mahamarg project**

**Contact:** Afcons Infrastructure Limited
Afcons House, 16, Shah Industrial Estate, Veera Desai Road,
Azadnagar, Andheri (W), Mumbai – 400 053, India
**Tel No:** +91 (0)22 67191000 **Fax:** +91 (0) 22 2673 0026 / 0047 / 1031
**CIN:** U45200MH1976PLC019335 **Website:** www.afcons.com